सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

कार्यक्रम अंदाजपत्रक

२०२६-२०२७

नगरविकास विभाग

PERFORMANCE BUDGET
2026-2027

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

२०२६

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

कार्यक्रम अंदाजपत्रक

२०२६-२०२७

नगरविकास विभाग

PERFORMANCE BUDGET
2026-2027

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

अनुक्रमणिका

		पृष्ठे
१.	समग्र कार्यक्रम	१
२.	महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगर पंचायती दर्शविणारे विवरणपत्र	२
३.	कार्यक्रमावरील खर्च (बाह्य सहाय्यित प्रकल्प)	१६
४.	कार्यक्रमावरील खर्च (केंद्र पुरस्कृत)	१६
५.	कार्यक्रमावरील खर्च (राज्य स्तर)	१९
६.	कार्यक्रमावरील खर्च (जिल्हा स्तर)	२४
७.	अनिवार्य खर्च	२५
८.	इतर महत्त्वाचे निर्णय/कार्यक्रम	२८
९.	अग्निसंरक्षण	३१
१०.	नगरपालिका प्रशासन	५१
११.	नगर आणि प्रादेशिक नियोजन	६३
१२.	नवीन नगरांचा विकास	१२९
१३.	नागपूर सुधार प्रन्यास	१३३
१४.	नागरी परिवहन	१३९
१५.	नागरी जमीन कमाल मर्यादा	१४९
१६.	मंत्रालय (नगरविकास विभाग)	१५१
१७.	कार्यक्रमावरील खर्चाच्या तरतुदी	१५५

समग्र कार्यक्रम

सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ४५ टक्के इतकी लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करते. हे प्रमाण देशातील इतर राज्यांपेक्षा सर्वात अधिक आहे. महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२३ कोटी असून नागरी क्षेत्रातील लोकसंख्या ५.०८ कोटी आहे.

राज्यातील शहरी विभागाचा शास्त्रशुद्ध पायावर विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे सोपविण्यात आली आहे. या विभागाचा संबंध मुख्यत्त्वे खालील गोष्टींशी येतो :—

(१) नगरपालिका प्रशासन (अग्निसंरक्षण व नियंत्रण तसेच नगरपालिका व नगरपरिषद यांना देय असलेले वित्तीय सहाय्य जमेस धरून).

(२) नगर व प्रादेशिक नियोजन

(३) नवीन शहरांचा व इतर विभागांचा विकास

(४) नागरी परिवहन योजना

(५) वरील सर्व बाबींवर मंत्रालयीनस्तरावर प्रशासकीय नियंत्रण.

राज्यात सध्या २९ महानगरपालिका अस्तित्वात आहेत. त्यांची यादी पृ. ३ वरील प्रपत्र १ येथे दिली आहे. मुंबई महानगरपालिकेचा कारभार " मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ " नुसार चालतो. उर्वरित महानगरपालिकांचा कारभार " महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९" नुसार चालतो.

राज्यात सध्या ३९४ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत. त्यांचा दर्जानिहाय (अ, ब व क वर्ग) यादी पृ.-४ वरील प्रपत्र-२ येथे दिली आहे. नगरपरिषदांचा कारभार, " महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ " नुसार चालतो.

थोडक्यात राज्यात सध्या एकूण ४२३ नागरी संस्था अस्तित्वात आहेत.

या शिवाय राज्यात सध्या खालील " विशेष नियोजन प्राधिकरणे " अस्तित्वात आहेत :—

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(२) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(३) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(४) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(५) छ. संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(६) शहर व औद्योगिक विकास महामंडळ

(७) नागपूर सुधार प्रन्यास

(८) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण

(९) तुळजापूर शहर विकास प्राधिकरण

(१०) पैठण आपेगांव शहर विकास प्राधिकरण

(११) पंढरपूर शहर विकास प्राधिकरण

(१२) सिंधूदुर्ग नवनगर विकास प्राधिकरण

२. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये नगरविकास विभागाचे एकूण अर्थसंकल्पाचे आकारमान रु. ५४५०८ कोटी इतके आहे. यामध्ये अनिवार्य (Commited) अनुदानाचा रु. ३७०५५कोटी तर कार्यक्रमावरील खर्च (Scheme) अनुदान रु. १७४५३ कोटी समावेश होतो.

३. नगरविकास विभागाने सन २००२-२००३ वर्षापासून विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी आमूलाग्र बदल केले असून आर्थिक विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरून विभागाच्या अर्थसंकल्पातील बहुतांश अनुदाने ही खालील स्तरावरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केलेली आहेत :—

(अ) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय.

(ब) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(क) संचालक, अग्निशमन सेवा.

(ड) विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी.

(इ) राज्य अभियान संचालक.

(फ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

प्रास्ताविक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे नगरविकास विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय कार्यालय आहे. राज्यातील नगरपरिषदांच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र संचालनालयाची गरज विचारात घेऊन या संचालनालयासाठी स्वतंत्र आयुक्त तथा संचालकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या पदावर भारतीय प्रशासन सेवेतील सचिव दर्जाच्या अधिका-याची नियुक्ती ७ डिसेंप्रार, १९९३ पासून करण्यात येते. दि. ७ डिसेंबर, १९९३ पूर्वी सचिव, नगरविकास विभाग हेच पदसिद्ध संचालक होते.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे कामकाज नियंत्रित केले जात आहे. यातील कलम ४ अन्वये प्रत्येक नगरपरिषदेच्या क्षेत्रांचे त्यांच्या लोकसंख्येच्या आधारे खालीलप्रमाणे " अ ", " ब ", " क " वर्ग व नगरपंचायत असे वर्गीकरण केलेले आहे :-

(अ) १.००.००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे " अ " वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(ब) ४०.००० पेक्षा अधिक असेल परंतु, १.००.००० पेक्षा अधिक नसेल इतकी लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे " ब ", वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(क) ४०,००० इतकी किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे " क " वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(ड) २५,००० इतकी किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेले क्षेत्र हे नगरपंचायत क्षेत्र असेल.

महाराष्ट्रात आज अस्तित्त्वात असलेल्या विभागनिहाय अ, ब व क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती खालीलप्रमाणे आहेतः-

विभाग	अ-वर्ग	ब-वर्ग	क-वर्ग	नगरपंचायती	एकूण
कोकण	२	५	१५	२२	**४४**
नाशिक	२	१६	२७	१६	**६१**
पुणे	३	१३	३४	२५	**७५**
छत्रपती संभाजीनगर	३	१४	३२	२६	**७५**
अमरावती	२	१८	२१	१६	**५७**
नागपूर	३	११	२७	४२	**८३**
एकूण	**१५**	**७७**	**१५६**	**१४७**	**३९५**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे राज्यस्तरीय कार्यालय असून या संचालनालयाद्वारे ३९५ नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवले जाते. संचालक, नगरपरिषद प्रशासन, नगरपरिषदांना/नगरपंचायतींना मार्गदर्शन करतात. त्याच प्रमाणे नगरपरिषदांच्या वित्त व कार्यप्रणालीची सांख्यिकी माहिती गोळा करून शासनास वेळोवेळी पुरविली जाते,

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या वतीने प्रामुख्याने खालीलप्रमाणे कार्ये पार पाडली जातात :-

- राज्यातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील पदांना मंजुरी देणे.
- राज्यातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती विहित करणे.
- नगरपरिषदांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
- नगरपरिषदांची प्रशासकीय तपासणी करणे.
- मुख्याधिका-यांच्या आस्थापनाविषयक कामकाज करणे.
- शासनामार्फत नगरपरिषदांना विविध अनुदाने वितरित करणे.
- नगरपरिषद प्रशासनामध्ये सुधारणा प्रकल्प

  उदा. वित्तीय व्यवस्थापन सुधारणा, संगणकीकरण, बी.ओ.टी. तत्त्वावरील प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, नगरोत्थान, अमृत, स्वच्छ भारत अभियान, वैशिष्ट्यपूर्ण, Accrual Based Double Entry Accounting System इत्यादी योजनांची अंमलबजावणी करणे.
- महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाखालील कामे.

नगरपरिषदांची तपासणी

राज्यातील नगरपरिषदांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला असता असे दिसून येते की, बहुतांशी नगरपरिषद सध्या आर्थिकदृष्ट्या दुबळ्या अवस्थेत आहेत. त्यापैकी काही नगरपरिषदा तर केवळ कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च इतकेच उत्पन्न मिळवित आहेत. अशा बिकट आर्थिक अवस्थेमध्ये स्थानिक रहिवाशांच्या अपेक्षेप्रमाणे नगरपरिषदा सेवा पुरविण्यास असमर्थ ठरत आहेत. नागरिकांना पुरवावयाच्या मूलभूत सेवा एक तर पुरविल्या जात नाहीत किंवा जेथे पुरविल्या जात आहेत तेथे त्यांचा दर्जा चांगला नसतो. सेवेचा दर्जा चांगला नाही म्हणून बहुतांश नागरिक या सेवांकरिता वाढीव दराने कर किंवा फी भरण्यास तयार होत नाहीत. कर व फी यांच्यापासून मिळणारे उत्पन्न कमी असल्याने सेवेचा दर्जा सुधारण्याकरिता नगरपरिषदांकडे पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे नगरपरिषदेच्या सेवेचा दर्जा आणखीच खालावत जातो आणि नगरपरिषद सेवेचा दर्जा सुधारण्यामागे यशस्वी होत नाही. नगरपरिषदांना आर्थिक दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न होऊन उपाययोजना हाती घेणे अत्यावश्यक झाले आहे.

नगरपरिषदेच्या दैनंदिन कारभारावर प्रशासकीय नियंत्रण ठेवता यावे आणि प्रभावी पर्यवेक्षण करता यावे यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ७४ मधील तरतुदानुसार जिल्हाधिकारी, प्रादेशिक संचालक, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय अशा प्राधिकाऱ्यांची साखळी निर्माण करण्यात आलेली आहे. नगरपरिषदेच्या कारभारांचे आर्थिकदृष्ट्या विश्लेषण व मीमांसा करण्याकरिता पुरेशी उपयुक्त माहिती उपलब्ध करून नगरपरिषदांना वेळीच योग्य मार्गदर्शन करता यावे आणि नगरपरिषदांच्या कारभारामध्ये ज्या अनियमितता घडतात,त्यावर प्रभावी नियंत्रण आणणे शक्य व्हावे.तसेच बेकायदेशीर व अनियमित होणाऱ्या नेमणुका यामध्ये नगरपरिषदांमध्ये बऱ्याच प्रमाणात खर्चात होत असलेली उधळपट्टी यावर बंधन आणणे शक्य होण्याच्या दृष्टीने नगरपरिषदांचे वार्षिक तपासणी सुधारित नमुने तयार करण्यात आले आहेत. या नमुन्यांमध्ये नगरपरिषदांच्या कारभाराची सखोल व निश्चित माहिती त्यांच्याकडून प्राप्त होणार आहे. त्यामुळे नगरपरिषदांच्या कारभारावर पर्यवेक्षण व नियंत्रण प्रभावी करण्यामध्ये मदत होईल. त्यामुळे नगरपरिषदांना आर्थिकदृष्ट्या सबळ करणे, त्यांच्याकडून पुरविल्या जाणाऱ्या मूलभूत सेवेचा दर्जा सुधारणे, तेथील कर्मचा-यांचे तंत्रज्ञान (कौशल्य) आणि कार्यक्षमतेमध्ये वाढ करणे आणि नगरपरिषदांच्या खर्चात काटकसर करून एकंदरीत कारभारामध्ये शिस्त निर्माण करणे शक्य होणार आहे.

राज्यातील विभागनिहाय, जिल्हानिहाय महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती दर्शविणारे विवरणपत्र

विभाग	जिल्हा	महानगरपालिका	'अ' वर्ग नगरपरिषदा	'ब' वर्ग नगरपरिषदा	'क' वर्ग नगरपरिषदा	नगरपंचायती	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
कोकण	मुंबई शहर व मुंबई उपनगर	१	०	०	०	०	१
	ठाणे	६	२	०	०	२	१०
	पालघर	१	०	२	१	४	८
	रायगड	१	०	१	९	६	१७
	रत्नागिरी	०	०	२	२	५	९
	सिंधुदुर्ग	०	०	०	३	५	८
	एकूण ..	९	२	५	१५	२२	५३
नाशिक	नाशिक	२	०	४	७	६	१७
	अहमदनगर	१	०	३	८	४	१६
	नंदुरबार	०	१	१	२	१	५
	धुळे	१	०	२	१	२	५
	जळगाव	१	१	५	१०	३	२०
	एकूण ..	५	२	१५	२८	१६	६४
पुणे	पुणे	२	१	५	८	४	१९
	सांगली	१	०	२	४	५	१२
	सातारा	०	१	२	६	७	१६
	सोलापूर	१	१	३	७	६	१८
	कोल्हापूर	२	०	१	९	३	१५
	एकूण ..	६	३	१३	३४	२५	८०
छ. संभाजीनगर	छ. संभाजीनगर	१	०	४	२	२	९
	परभणी	१	०	३	४	१	९
	हिंगोली	०	०	२	१	२	५
	जालना	१	०	०	३	५	९
	नांदेड	१	०	१	११	४	१७
	लातूर	१	१	१	२	५	१०
	धाराशीव	०	१	०	७	२	१०
	बीड	०	१	३	२	५	११
	एकूण ..	५	३	१४	३२	२६	८०
अमरावती	बुलढाणा	०	०	७	४	२	१३
	अमरावती	१	१	२	७	४	१५
	यवतमाळ	०	१	४	५	७	१७
	वाशीम	०	०	२	२	२	६
	अकोला	१	०	३	२	२	७
	एकूण ..	२	२	१८	२०	१७	५८
नागपूर	नागपूर	१	०	४	११	१३	२८
	भंडारा	०	०	२	२	३	७
	गोंदिया	०	१	०	२	५	०८
	वर्धा	०	२	१	३	४	१०
	चंद्रपूर	१	०	३	७	७	१८
	गडचिरोली	०	०	१	२	९	१२
	एकूण ..	२	३	११	२७	४१	७९
	एकूण बेरीज ..	२९	१५	७६	१५६	१४७	४२३

प्रपत्र १

महानगरपालिकांची यादी

अ. क्र.	महानगरपालिकेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
	महानगरपालिका—२९			
१	बृहन्मुंबई महानगरपालिका	. .	. .	मुंबई आणि मुंबई उपनगर
२	ठाणे महानगरपालिका	. .	. .	ठाणे
३	कल्याण-डोंबिवली महानगरपालिका	. .	. .	ठाणे
४	नवी मुंबई महानगरपालिका	. .	. .	ठाणे
५	उल्हासनगर महानगरपालिका	. .	. .	ठाणे
६	भिवंडी-निजामपूर महानगरपालिका	. .	. .	ठाणे
७	मिरा-भाईंदर महानगरपालिका	. .	. .	ठाणे
८	पनवेल महानगरपालिका	. .	. .	रायगड
९	वसई-विरार महानगरपालिका	. .	. .	पालघर
१०	नाशिक महानगरपालिका	. .	. .	नाशिक
११	मालेगाव महानगरपालिका	. .	. .	नाशिक
१२	अहिल्यानगर महानगरपालिका	. .	. .	अहिल्यानगर
१३	धुळे महानगरपालिका	. .	. .	धुळे
१४	जळगाव महानगरपालिका	. .	. .	जळगाव
१५	पिंपरी-चिंचवड महानगरपालिका	. .	. .	पुणे
१६	पुणे महानगरपालिका	. .	. .	पुणे
१७	सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिका	. .	. .	सांगली
१८	सोलापूर महानगरपालिका	. .	. .	सोलापूर
१९	कोल्हापूर महानगरपालिका	. .	. .	कोल्हापूर
२०	इचलकरंजी महानगरपालिका	. .	. .	कोल्हापूर
२१	छ. संभाजीनगर महानगरपालिका	. .	. .	छ. संभाजीनगर
२२	नांदेड-वाघाळा महानगरपालिका	. .	. .	नांदेड
२३	अमरावती महानगरपालिका	. .	. .	अमरावती
२४	अकोला महानगरपालिका	. .	. .	अकोला
२५	नागपूर महानगरपालिका	. .	. .	नागपूर
२६	परभणी महानगरपालिका	. .	. .	परभणी
२७	लातूर महानगरपालिका	. .	. .	लातूर
२८	चंद्रपूर महानगरपालिका	. .	. .	चंद्रपूर
२९	जालना महानगरपालिका	. .	. .	जालना

प्रपत्र २

नगरपरिषदांची यादी

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
	‘ अ ’ वर्ग नगरपरिषदा—१५			
१	अचलपूर नगरपरिषद	...	...	अमरावती
२	धाराशीव नगरपरिषद	...	...	धाराशीव
३	गोंदिया नगरपरिषद	...	...	गोंदिया
४	भुसावळ नगरपरिषद	...	...	जळगाव
५	अंबरनाथ नगरपरिषद	...	...	ठाणे
६	कुळगाव-बदलापूर नगरपरिषद	...	...	ठाणे
७	नंदुरबार नगरपरिषद	...	...	नंदुरबार
८	बारामती नगरपरिषद	...	...	पुणे
९	बीड नगरपरिषद	...	...	बीड
१०	यवतमाळ नगरपरिषद	...	...	यवतमाळ
११	उदगीर नगरपरिषद	...	...	लातूर
१२	हिंगणघाट नगरपरिषद	...	...	वर्धा
१३	वर्धा नगरपरिषद	...	...	वर्धा
१४	सातारा नगरपरिषद	...	...	सातारा
१५	बार्शी नगरपरिषद	...	...	सोलापूर

नगरपरिषदांची यादी—चालू

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
	'ब' वर्ग नगरपरिषदा—७७			
१	अकोट नगरपरिषद	...	...	अकोला
२	बाळापूर नगरपरिषद	...	...	अकोला
३	मुर्तिजापूर नगरपरिषद	...	...	अकोला
४	अंजनगांव सुर्जी नगरपरिषद	...	...	अमरावती
५	वरुड नगरपरिषद	...	...	अमरावती
६	कोपरगाव नगरपरिषद	...	...	अहिल्यागर
७	संगमनेर नगरपरिषद	...	...	अहिल्यानगर
८	श्रीरामपूर नगरपरिषद	...	...	अहिल्यानगर
९	कन्नड नगरपरिषद	...	...	छत्रपती संभाजीनगर
१०	पैठण नगरपरिषद	...	...	छत्रपती संभाजीनगर
११	सिल्लोड नगरपरिषद	...	...	छत्रपती संभाजीनगर
१२	गंगापूर नगरपरिषद	...	...	छत्रपती संभाजीनगर
१३	जयसिंगपूर नगरपरिषद	...	...	कोल्हापूर
१४	गडचिरोली नगरपरिषद	...	...	गडचिरोली
१५	बल्लारपूर नगरपरिषद	...	...	चंद्रपूर
१६	भद्रावती नगरपरिषद	...	...	चंद्रपूर
१७	वरोरा नगरपरिषद	...	...	चंद्रपूर
१८	अमळनेर नगरपरिषद	...	...	जळगाव
१९	चाळीसगाव नगरपरिषद	...	...	जळगाव
२०	चोपडा नगरपरिषद	...	...	जळगाव
२१	जामनेर नगरपरिषद	...	...	जळगाव
२२	पाचोरा नगरपरिषद	...	...	जळगाव
२३	दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद	...	...	धुळे
२४	शिरपूर वरवाडे नगरपरिषद	...	...	धुळे
२५	शहादा नगरपरिषद	...	...	नंदुरबार
२६	देगलूर नगरपरिषद	...	...	नांदेड
२७	कामठी नगरपरिषद	...	...	नागपूर
२८	काटोल नगरपरिषद	...	...	नागपूर
२९	उमरेड नगरपरिषद	...	...	नागपूर
३०	वाडी नगरपरिषद	...	...	नागपूर
३१	मनमाड नगरपरिषद	...	...	नाशिक
३२	ओझर नगरपरिषद	...	...	नाशिक
३३	सिन्नर नगरपरिषद	...	...	नाशिक
३४	येवला नगरपरिषद	...	...	नाशिक

नगरपरिषदांची यादी—चालू

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
	'ब' वर्ग नगरपरिषदा—७७—चालू			
३५	पिंपळगाव प्रसवंत नगरपरिषद	...	...	नाशिक
३६	गंगाखेड नगरपरिषद	...	...	परभणी
३७	जिंतूर नगरपरिषद	...	...	परभणी
३८	सेलू नगरपरिषद	...	...	परभणी
३९	डहाणू नगरपरिषद	...	...	पालघर
४०	पालघर नगरपरिषद	...	...	पालघर
४१	चाकण नगरपरिषद	...	...	पुणे
४२	दौंड नगरपरिषद	...	...	पुणे
४३	लोणावळा नगरपरिषद	...	...	पुणे
४४	तळेगाव दाभाडे नगरपरिषद	...	...	पुणे
४५	फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषद	...	...	पुणे
४६	अंबेजोगाई नगरपरिषद	...	...	बीड
४६	माजलगाव नगरपरिषद	...	...	बीड
४८	परळी वैजनाथ नगरपरिषद	...	...	बीड
४९	बुलढाणा नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५०	चिखली नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५१	खामगाव नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५२	मलकापूर नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५३	मेहकर नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५४	नांदुरा नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५५	शेगाव नगरपरिषद	...	...	बुलढाणा
५६	भंडारा नगरपरिषद	...	...	भंडारा
५७	तुमसर नगरपरिषद	...	...	भंडारा
५८	दिग्रस नगरपरिषद	...	...	यवतमाळ
५९	पुसद नगरपरिषद	...	...	यवतमाळ
६०	उमरखेड नगरपरिषद	...	...	यवतमाळ
६१	वणी नगरपरिषद	...	...	यवतमाळ
६२	चिपळूण नगरपरिषद	...	...	रत्नागिरी
६३	रत्नागिरी नगरपरिषद	...	...	रत्नागिरी
६४	खोपोली नगरपरिषद	...	...	रायगड
६५	अहमदपूर नगरपरिषद	...	...	लातूर
६६	आर्वी नगरपरिषद	...	...	वर्धा
६७	कारंजा-लाड नगरपरिषद	...	...	वाशिम
६८	वाशिम नगरपरिषद	...	...	वाशिम

नगरपरिषदांची यादी—चालू

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
	'ब' वर्ग नगरपरिषदा—७६—समाप्त			
६९	उरूण-ईश्वरपूर नगरपरिषद	...	...	सांगली
७०	विटा नगरपरिषद	...	...	सांगली
७१	कराड नगरपरिषद	...	...	सातारा
७२	फलटण नगरपरिषद	...	...	सातारा
७३	अक्कलकोट नगरपरिषद	...	...	सोलापूर
७४	अकलूज नगरपरिषद	...	...	सोलापूर
७५	पंढरपूर नगरपरिषद	...	...	सोलापूर
७६	बसमतनगर नगरपरिषद	...	...	हिंगोली
७७	हिंगोली नगरपरिषद	...	...	हिंगोली

नगरपरिषदांची यादी

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
	'क' वर्ग नगरपरिषदा—१५५			
१	नरखेड नगरपरिषद	..	..	नागपूर
२	कळमेश्वर नगरपरिषद	..	..	नागपूर
३	मोहपा नगरपरिषद	..	..	नागपूर
४	सावनेर नगरपरिषद	..	..	नागपूर
५	खापा नगरपरिषद	..	..	नागपूर
६	रामटेक नगरपरिषद	..	..	नागपूर
७	कन्हान पिंपरी नगरपरिषद	..	..	नागपूर
८	मोवाड नगरपरिषद	..	..	नागपूर
९	वानाडोंगरी नगरपरिषद	..	..	नागपूर
१०	बुटीबोरी नगरपरिषद	..	..	नागपूर
११	डिगडोह (देवी) नगरपरिषद	..	..	नागपूर
१२	सिंदी-रेल्वे नगरपरिषद	..	..	वर्धा
१३	पुलगांव नगरपरिषद	..	..	वर्धा
१४	देवळी नगरपरिषद	..	..	वर्धा
१५	पवनी नगरपरिषद	..	..	भंडारा
१६	साकोली नगरपरिषद	..	..	भंडारा
१७	तिरोडा नगरपरिषद	..	..	गोंदिया
१८	आमगांव नगरपरिषद	..	..	गोंदिया
१९	मूल नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२०	राजूरा नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२१	नागभिड नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२२	ब्रम्हपूरी नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२३	गडचांदूर नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२४	चिमूर नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२५	घुग्घुस नगरपरिषद	..	..	चंद्रपूर
२६	देसाईगंज नगरपरिषद	..	..	गडचिरोली
२७	आरमोरी नगरपरिषद	..	..	गडचिरोली
२८	चांदूरबाजार नगरपरिषद	..	..	अमरावती
२९	मोर्शी नगरपरिषद	..	..	अमरावती
३०	शेंदूरजनाघाट नगरपरिषद	..	..	अमरावती
३१	दर्यापूर नगरपरिषद	..	..	अमरावती
३२	चांदूररेल्वे नगरपरिषद	..	..	अमरावती
३३	धामणगाव-रेल्वे नगरपरिषद	..	..	अमरावती
३४	चिखलदरा नगरपरिषद	..	..	अमरावती
३५	जळगांव जामोद नगरपरिषद	..	..	बुलडाणा
३६	देऊळगांव राजा नगरपरिषद	..	..	बुलडाणा
३७	सिंदखेडराजा नगरपरिषद	..	..	बुलडाणा
३८	लोणार नगरपरिषद	..	..	बुलडाणा

‘ क ’ वर्ग नगरपरिषदा-१५५—चालू

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
३९	तेल्हारा नगरपरिषद	..	..	अकोला
४०	पातूर नगरपरिषद	..	..	अकोला
४१	मंगळूरपीर नगरपरिषद	..	..	वाशिम
४२	रिसोड नगरपरिषद	..	..	वाशिम
४३	घाटंजी नगरपरिषद	..	..	यवतमाळ
४४	आर्णी नगरपरिषद	..	..	यवतमाळ
४५	दारव्हा नगरपरिषद	..	..	यवतमाळ
४६	नेर नबाबपूर नगरपरिषद	..	..	यवतमाळ
४७	पांढरकवडा नगरपरिषद	..	..	यवतमाळ
४८	गंगापूर नगरपरिषद	..	..	छ. संभाजीनगर
४९	खुलताबाद नगरपरिषद	..	..	छ. संभाजीनगर
५०	भोकरदन नगरपरिषद	..	..	जालना
५१	अंबड नगरपरिषद	..	..	जालना
५२	परतूर नगरपरिषद	..	..	जालना
५३	मानवत नगरपरिषद	..	..	परभणी
५४	पाथरी नगरपरिषद	..	..	परभणी
५५	सोनपेठ नगरपरिषद	..	..	परभणी
५६	पुर्णा नगरपरिषद	..	..	परभणी
५७	कळमनूरी नगरपरिषद	..	..	हिंगोली
५८	गेवराई नगरपरिषद	..	..	बीड
५९	किल्ले धारुर नगरपरिषद	..	..	बीड
६०	उमरी नगरपरिषद	..	..	नांदेड
६१	धर्माबाद नगरपरिषद	..	..	नांदेड
६२	हदगांव नगरपरिषद	..	..	नांदेड
६३	मुदखेड नगरपरिषद	..	..	नांदेड
६४	कुंडलवाडी नगरपरिषद	..	..	नांदेड
६५	बिलोली नगरपरिषद	..	..	नांदेड
६६	कंधार नगरपरिषद	..	..	नांदेड
६७	मुखेड नगरपरिषद	..	..	नांदेड
६८	भोकर नगरपरिषद	..	..	नांदेड
६९	लोहा नगरपरिषद	..	..	नांदेड
७०	किनवट नगरपरिषद	..	..	नांदेड
७१	परांडा नगरपरिषद	..	..	धाराशीव
७२	भूम नगरपरिषद	..	..	धाराशीव
७३	कळंब नगरपरिषद	..	..	धाराशीव
७४	तुळजापूर नगरपरिषद	..	..	धाराशीव
७५	नळदूर्ग नगरपरिषद	..	..	धाराशीव
७६	मुरुम नगरपरिषद	..	..	धाराशीव
७७	उमरगा नगरपरिषद	..	..	धाराशीव
७८	औसा नगरपरिषद	..	..	लातूर

‘ क ’ वर्ग नगरपरिषदा-१५५—चालू

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
७९	निलंगा नगरपरिषद	..	..	लातूर
८०	सटाणा नगरपरिषद	..	..	नाशिक
८१	नांदगांव नगरपरिषद	..	..	नाशिक
८२	भगुर नगरपरिषद	..	..	नाशिक
८३	इगतपूरी नगरपरिषद	..	..	नाशिक
८४	चांदवड नगरपरिषद	..	..	नाशिक
८५	त्र्यंबक नगरपरिषद	..	..	नाशिक
८६	नवापूर नगरपरिषद	..	..	नंदुरबार
८७	तळोदा नगरपरिषद	..	..	नंदुरबार
८८	पिंपळनेर नगरपरिषद	..	..	धुळे
८९	यावल नगरपरिषद	..	..	जळगांव
९०	फैजपूर नगरपरिषद	..	..	जळगांव
९१	सावदा नगरपरिषद	..	..	जळगांव
९२	रावेर नगरपरिषद	..	..	जळगांव
९३	एरंडोल नगरपरिषद	..	..	जळगांव
९४	धरणगांव नगरपरिषद	..	..	जळगांव
९५	पारोळा नगरपरिषद	..	..	जळगांव
९६	वरणगांव नगरपरिषद	..	..	जळगांव
९७	भडगांव नगरपरिषद	..	..	जळगांव
९८	नशिराबाद नगरपरिषद	..	..	जळगांव
९९	राहाता नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१००	पाथर्डी नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०१	राहुरी नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०२	देवळाली प्रवरा नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०३	शेवगांव नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०४	जामखेड नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०५	श्रीगोंदा नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०६	शिर्डी नगरपरिषद	..	..	अहिल्यानगर
१०७	जव्हार नगरपरिषद	..	..	पालघर
१०८	कर्जत नगरपरिषद	..	..	रायगड
१०९	उरण नगरपरिषद	..	..	रायगड
११०	पेण नगरपरिषद	..	..	रायगड
१११	अलीबाग नगरपरिषद	..	..	रायगड
११२	मुरुड जंजिरा नगरपरिषद	..	..	रायगड
११३	रोहा नगरपरिषद	..	..	रायगड
११४	श्रीवर्धन नगरपरिषद	..	..	रायगड
११५	महाड नगरपरिषद	..	..	रायगड
११६	माथेरान नगरपरिषद	..	..	रायगड
११७	खेड नगरपरिषद	..	..	रत्नागिरी
११८	राजापूर नगरपरिषद	..	..	रत्नागिरी
११९	वेंगुर्ला नगरपरिषद	..	..	सिंधुदुर्ग
१२०	सावंतवाडी नगरपरिषद	..	..	सिंधुदुर्ग

‘ क ’ वर्ग नगरपरिषदा-१५५—समाप्त

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
१२१	मालवण नगरपरिषद	..	..	सिंधुदुर्ग
१२२	जुन्नर नगरपरिषद	..	..	पुणे
१२३	शिरुर नगरपरिषद	..	..	पुणे
१२४	आळंदी नगरपरिषद	..	..	पुणे
१२५	सासवड नगरपरिषद	..	..	पुणे
१२६	जेजूरी नगरपरिषद	..	..	पुणे
१२७	इंदापूर नगरपरिषद	..	..	पुणे
१२८	राजगुरूनगर नगरपरिषद	..	..	पुणे
१२९	भोर नगरपरिषद	..	..	पुणे
१३०	वाई नगरपरिषद	..	..	सातारा
१३१	म्हसवड नगरपरिषद	..	..	सातारा
१३२	रहिमतपूर नगरपरिषद	..	..	सातारा
१३३	महाबळेश्वर नगरपरिषद	..	..	सातारा
१३४	पांचगणी नगरपरिषद	..	..	सातारा
१३५	मलकापूर नगरपरिषद	..	..	सातारा
१३६	आष्टा नगरपरिषद	..	..	सांगली
१३७	तासगांव नगरपरिषद	..	..	सांगली
१३८	पलुस नगरपरिषद	..	..	सांगली
१३९	जत नगरपरिषद	..	..	सांगली
१४०	करमाळा नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४१	कुर्डुवाडी नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४२	सांगोला नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४३	मंगळवेढा नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४४	मैंदर्गी नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४५	दुधनी नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४६	मोहोळ नगरपरिषद	..	..	सोलापूर
१४७	मलकापूर नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१४८	वडगांव कसबा नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१४९	कुरुंदवाड नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१५०	कागल नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१५१	मुरगुड नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१५२	गडहिंग्लज नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१५३	पन्हाळा नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१५४	हुपरी नगरपरिषद	..	..	कोल्हापूर
१५५	शिरोळ नगरपरिषद	..	..	कोल्हापूर

नगरपंचायती-१४७

अ. क्र. (१)	नगरपंचायतीचे नाव (२)			जिल्हा (३)
१	महादुला नगरपंचायत	..	..	नागपूर
२	भिवापूर नगरपंचायत	..	..	नागपूर
३	मौदा नगरपंचायत	..	..	नागपूर
४	कुही नगरपंचायत	..	..	नागपूर
५	हिंगणा नगरपंचायत	..	..	नागपूर
६	पारशिवनी नगरपंचायत	..	..	नागपूर
७	कांद्री (कन्हान) नगरपंचायत	..	..	नागपूर
८	बेसा-पिपळा नगरपंचायत	..	..	नागपूर
९	बहादुरा नगरपंचायत	..	..	नागपूर
१०	कोंढाळी नगरपंचायत	..	..	नागपूर
११	निलडोह नगरपंचायत	..	..	नागपूर
१२	बिडगांव-तरोडी (खुर्द)-पांढुर्णा नगरपंचायत	..	..	नागपूर
१३	गोधनी (रेल्वे) नगरपंचायत	..	..	नागपूर
१४	समुद्रपूर नगरपंचायत	..	..	वर्धा
१५	सेलू नगरपंचायत	..	..	वर्धा
१६	आष्टी नगरपंचायत	..	..	वर्धा
१७	कारंजा नगरपंचायत	..	..	वर्धा
१८	लाखणी नगरपंचायत	..	..	भंडारा
१९	लाखांदूर नगरपंचायत	..	..	भंडारा
२०	मोहाडी नगरपंचायत	..	..	भंडारा
२१	अर्जुनी नगरपंचायत	..	..	गोंदिया
२२	देवरी नगरपंचायत	..	..	गोंदिया
२३	सडकअर्जुनी नगरपंचायत	..	..	गोंदिया
२४	गोरेगांव नगरपंचायत	..	..	गोंदिया
२५	सालेकसा नगरपंचायत	..	..	गोंदिया
२६	सिंदेवाही नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
२७	सावली नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
२८	गौंडपिंपरी नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
२९	पोभूर्णा नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
३०	कोरपणा नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
३१	जिवती नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
३२	भिसी नगरपंचायत	..	..	चंद्रपूर
३३	चार्मोशी नगरपंचायत	..	..	गडचिरोली
३४	अहेरी नगरपंचायत	..	..	गडचिरोली
३५	सिरोंचा नगरपंचायत	..	..	गडचिरोली
३६	कुरखेडा नगरपंचायत	..	..	गडचिरोली
३७	एटापल्ली नगरपंचायत	..	..	गडचिरोली
३८	धानोरा नगरपंचायत	..	..	गडचिरोली

नगरपंचायती-१४७—चालू

अ. क्र.	नगरपंचायतीचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
३९	कोरची नगरपंचायत	..	..	गडचिरोली
४०	भामरागड नगरपंचायत	..	..	गडचिरोली
४१	मुलचेरा नगरपंचायत	..	..	गडचिरोली
४२	तिवसा नगरपंचायत	..	..	अमरावती
४३	धारणी नगरपंचायत	..	..	अमरावती
४४	नादगांव खंडेश्वर नगरपंचायत	..	..	अमरावती
४५	भातकुली नगरपंचायत	..	..	अमरावती
४६	मोताळा नगरपंचायत	..	..	बुलडाणा
४७	संग्रामपूर नगरपंचायत	..	..	बुलडाणा
४८	बार्शी टाकळी नगरपंचायत	..	..	अकोला
४९	हिवरखेड नगरपंचायत	..	..	अकोला
५०	मालेगांव जहागिंर नगरपंचायत	..	..	वाशिम
५१	मानोरा नगरपंचायत	..	..	वाशिम
५२	राळेगांव नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५३	कळंब नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५४	महागांव नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५५	मारेगांव नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५६	बाभुळगांव नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५७	झरीजामणी नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५८	ढाणकी नगरपंचायत	..	..	यवतमाळ
५९	फुलंब्री नगरपंचायत	..	..	छ. संभाजीनगर
६०	सोयगांव नगरपंचायत	..	..	छ. संभाजीनगर
६१	मंठा नगरपंचायत	..	..	जालना
६२	जाफ्राबाद नगरपंचायत	..	..	जालना
६३	बदनापूर नगरपंचायत	..	..	जालना
६४	घनसावंगी नगरपंचायत	..	..	जालना
६५	तिर्थपूरी नगरपंचायत	..	..	जालना
६६	पालम नगरपंचायत	..	..	परभणी
६७	औंढा नागनाथ नगरपंचायत	..	..	हिंगोली
६८	सेनगांव नगरपंचायत	..	..	हिंगोली
६९	केज नगरपंचायत	..	..	बीड
७०	पाटोदा नगरपंचायत	..	..	बीड
७१	वडवणी नगरपंचायत	..	..	बीड
७२	आष्टी नगरपंचायत	..	..	बीड
७३	शिरुरकासार नगरपंचायत	..	..	बीड
७४	माहूर नगरपंचायत	..	..	नांदेड
७५	अर्धापूर नगरपंचायत	..	..	नांदेड
७६	नायगांव नगरपंचायत	..	..	नांदेड
७७	हिमायतनगर नगरपंचायत	..	..	नांदेड
७८	वाशी नगरपंचायत	..	..	धाराशीव

नगरपंचायती-१४७—चालू

अ. क्र.	नगरपंचायतीचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
७९	लोहारा (बु.) नगरपंचायत	..	..	धाराशीव
८०	चाकुर नगरपंचायत	..	..	लातूर
८१	देवणी नगरपंचायत	..	..	लातूर
८२	रेणापूर नगरपंचायत	..	..	लातूर
८३	शिरुर अनंतपाळ नगरपंचायत	..	..	लातूर
८४	जळकोट नगरपंचायत	..	..	लातूर
८५	दिंडोरी नगरपंचायत	..	..	नाशिक
८६	कळवण नगरपंचायत	..	..	नाशिक
८७	निफाड नगरपंचायत	..	..	नाशिक
८८	देवळा नगरपंचायत	..	..	नाशिक
८९	पेठ नगरपंचायत	..	..	नाशिक
९०	सुरगणा नगरपंचायत	..	..	नाशिक
९१	शिंदखेडा नगरपंचायत	..	..	धुळे
९२	साक्री नगरपंचायत	..	..	धुळे
९३	धडगाव वडफळ्या नगरपंचायत	..	..	नंदुरबार
९४	बोदवड नगरपंचायत	..	..	जळगांव
९५	मुक्ताईनगर नगरपंचायत	..	..	जळगांव
९६	शेंदूर्णी नगरपंचायत	..	..	जळगांव
९७	कर्जत नगरपंचायत	..	..	अहिल्यानगर
९८	अकोले नगरपंचायत	..	..	अहिल्यानगर
९९	पारनेर नगरपंचायत	..	..	अहिल्यानगर
१००	नेवासा नगरपंचायत	..	..	अहिल्यानगर
१०१	तलासरी नगरपंचायत	..	..	पालघर
१०२	मोखाडा नगरपंचायत	..	..	पालघर
१०३	विक्रमगड नगरपंचायत	..	..	पालघर
१०४	वाडा नगरपंचायत	..	..	पालघर
१०५	मुरबाड नगरपंचायत	..	..	ठाणे
१०६	शहापूर नगरपंचायत	..	..	ठाणे
१०७	माणगांव नगरपंचायत	..	..	रायगड
१०८	तळा नगरपंचायत	..	..	रायगड
१०९	खालापूर नगरपंचायत	..	..	रायगड
११०	पोलादपूर नगरपंचायत	..	..	रायगड
१११	म्हसळा नगरपंचायत	..	..	रायगड
११२	पाली नगरपंचायत	..	..	रायगड
११३	दापोली नगरपंचायत	..	..	रत्नागिरी
११४	देवरुख नगरपंचायत	..	..	रत्नागिरी
११५	लांजा नगरपंचायत	..	..	रत्नागिरी
११६	मंडणगड नगरपंचायत	..	..	रत्नागिरी
११७	गुहागर नगरपंचायत	..	..	रत्नागिरी
११८	देवगड जमसंडे नगरपंचायत	..	..	सिंधुदुर्ग
११९	कणकवली नगरपंचायत	..	..	सिंधुदुर्ग

नगरपंचायती-१४७—समाप्त

अ. क्र.	नगरपंचायतींचे नाव			जिल्हा
(१)	(२)			(३)
१२०	कुडाळ नगरपंचायत	..	..	सिंधुदुर्ग
१२१	वाभवे-वैभववाडी नगरपंचायत	..	..	सिंधुदुर्ग
१२२	कसई दोडामार्ग नगरपंचायत	..	..	सिंधुदुर्ग
१२३	वडगाव-मावळ नगरपंचायत	..	..	पुणे
१२४	देहू नगरपंचायत	..	..	पुणे
१२५	माळेगांव (बु.) नगरपंचायत	..	..	पुणे
१२६	मंचर नगरपंचायत	..	..	पुणे
१२७	कोरेगांव नगरपंचायत	..	..	सातारा
१२८	मेढा नगरपंचायत	..	..	सातारा
१२९	पाटण नगरपंचायत	..	..	सातारा
१३०	वडुज नगरपंचायत	..	..	सातारा
१३१	खंडाळा नगरपंचायत	..	..	सातारा
१३२	दहीवडी नगरपंचायत	..	..	सातारा
१३३	लोणंद नगरपंचायत	..	..	सातारा
१३४	कवठे महाकाळ नगरपंचायत	..	..	सांगली
१३५	कडेगांव नगरपंचायत	..	..	सांगली
१३६	खानापूर नगरपंचायत	..	..	सांगली
१३७	शिराळा नगरपंचायत	..	..	सांगली
१३८	आटपाडी नगरपंचायत	..	..	सांगली
१३९	माळशिरस नगरपंचायत	..	..	सोलापूर
१४०	माढा नगरपंचायत	..	..	सोलापूर
१४१	महाळुंग-श्रीपुर नगरपंचायत	..	..	सोलापूर
१४२	वैराग नगरपंचायत	..	..	सोलापूर
१४३	नातेपुते नगरपंचायत	..	..	सोलापूर
१४४	अनगर नगरपंचायत	..	..	सोलापूर
१४५	आजरा नगरपंचायत	..	..	कोल्हापूर
१४६	हातकणंगले नगरपंचायत	..	..	कोल्हापूर
१४७	चंदगड नगरपंचायत	..	..	कोल्हापूर

नगरविकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

(अ) कार्यक्रमावरील खर्च

(I) बाह्य सहाय्यीत प्रकल्प (EXTERNAL AIDED PROJECT)

(१) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP).

(२) मुंबई मेट्रो रेल्वे मार्ग प्रकल्प

(३) पुणे/पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कायमस्वरूपी नागरी परिवहन प्रकल्पाकरिता जागतिक बँकेकडून कर्ज व अनुदान.

(४) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प

(५) पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प

(६) एमआरयुआयपी कार्यक्रमासाठी केएफडब्ल्यु बँकेकडून प्राप्त अनुदानाचे एमएमआरडीएला वितरण

(७) मुंबई मेट्रो IIA, IIB, VII साठी एशियन डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज १३०

(८) मुंबई मेट्रो IIA, IIB, VII साठी न्यु डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज १२०

(९) मुंबई मेट्रो IV, IVA साठी KWF बँकेचे कर्ज - RIL

(१०) मुंबई मेट्रो IV & IVA साठी KWF बँकेचे कर्ज - ODA plus

(११) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प

(१२) मुंबई प्रादेशिक नागरी पायाभूत सुविधा सुधार कार्यक्रम (केएफडब्लू कर्ज)

(१३) नागरी पायाभूत सुविधा विकास निधी योजना (UIDF).

(II) कार्यक्रमावरील खर्च (केंद्र पुरस्कृत)

(१) दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

(२) स्वच्छ भारत अभियान

(३) अमृत अभियान

(४) स्मार्ट सिटी अभियान

दीनदयाळ जन आजीविका योजना-शहरी (पथदर्शी) (DJAY-S)

केंद्र पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) संपुष्टात येऊन त्याऐवजी देशात 'दीनदयाळ जन आजीविका योजना-शहरी' (DJAY-S) ही योजना (पथदर्शी स्वरुपात) दि.०१.१०.२०२४ पासून सर्वत्र लागू करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून त्यानुसार, या योजनेकरीता गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाद्वारे (MoHUA) राज्यातील पथदर्शी शहर निवडण्याच्या दिलेल्या निर्देशास अनुसरुन राज्यात 'कल्याण डोंबिवली महानगरपालिका' या महानगरपालिकेची निवड करण्यात आली असून कल्याण डोंबिवलीमध्ये ही योजना पथदर्शी स्वरूपात राबविण्यात येत आहे. सदर योजनेस सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता २२३०ए९०६ (केंद्र हिस्सा-६०%) आणि २२३०ए९१५ (राज्य हिस्सा-४०%) या लेखाशिर्षांतर्गत सद्यःस्थितीत निरंक (शून्य) तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

- दीनदयाळ जन आजीविका योजना-शहरी या पथदर्शी योजनेचे महत्वाचे घटक व इतर माहिती खालीलप्रमाणे आहे :
- शहरी गरिब व धोकादायक क्षेत्रामधील व्यक्तींसाठी स्थानिक स्तरावरील समुदाय संस्थांचे बळकटीकरण करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, सामाजिक पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच त्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.
- योजनेंतर्गत महत्वाचे घटक
  १. समुदाय संचालित संस्थात्मक विकास (Community Led Institutional Development-CLED) (स्वयंसहाय्यता बचतगट स्थापना व इतर सहाय्य)
  २. वित्तीय समावेशन व व्यवसाय विकास (Financial Inclusion & Enterprise Development-FI&ED) (लाभार्थी व बचतगट कर्ज व उद्योग सहाय्य)
  ३. नाविन्यपूर्ण व विशिष्ट प्रकल्प (Innovative & Special Project-I&SP)
  ४. सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure-SI) (बेघर निवारा , कामगार चौक , शहर उपजीविका केंद्र, पाळणा घर)
  ५. कृतीसंगम (Convergence) (विविध योजनांचा लाभ योजनेतील लाभार्थ्यांना देणे)
  ६. क्षमता बांधणी व प्रशिक्षणे (Capacity Building & Training-CB&T) (मनुष्यबळ व प्रशिक्षण)
- लाभार्थी म्हणून NFSA नुसार PHH & AYY (रेशन कार्ड) नोंदणीकृत कुटुंबाव्यतिरिक्त प्राधान्य देण्यात येणारे लाभार्थी घटकः
  १. बांधकाम कामगार (Construction workers)
  २. घरकाम कामगार (Domestic Workers)
  ३. वाहतूक कामगार (Transportation workers)
  ४. गिग कामगार (Gig Workers)
  ५. व्यक्तिगत सेवा कामगार (Care Workers)
  ६. स्वच्छता कामगार (Waste workers)

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) :—

केंद्र शासनाच्या " स्वच्छ भारत अभियान (नागरी) " च्या धर्तीवर राज्यात " स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) " ची अंमलबजावणी दिनांक १५ मे, २०१५ पासून करण्यात आली. तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान २.० (नागरी) च्या धर्तीवर राज्यात " स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) " २.० ची अंमलबजावणी १५/७/२०२२ पासुन सुरू आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या अभियानांतर्गत शहरांमधील ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ती कुटुंबे उघड्यावर शौचास जातात अशा कुटुंबांना वैयक्तिक घरगुती शौचालय अथवा सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून शहरे " हागणदारी मुक्त " करणे व नागरी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरात निर्माण होणाऱ्या १०० टक्के कचऱ्याचे निर्मितीच्या जागी विलगीकरण, वाहतूक व प्रक्रिया करून शहरे " स्वच्छ " करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश होता. तर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानात सातत्य राखणे, वापरलेले पाणी व मैला यांची संपूर्ण प्रक्रिया करणे व सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यात येऊन राज्यातील सर्व शहरं कचरामुक्त करणे या प्रमुख बाबींचा समावेश आहे.

(१) शहरे हागणदारी मुक्त करणे :

राज्यातील शहरांमध्ये ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ते उघड्यावर शौचास जातात अशा कुटुंबांना वैयक्तिक घरगुती शौचालय अथवा सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यातील नागरी भागात जानेवारी २०२६ अखेरपर्यंत एकूण ८,८२,८९८ इतक्या शौचालयांचे (सीट्स) बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

कालावधी	बांधकाम पूर्ण झालेली वैयक्तिक घरगुती शौचालये	बांधकाम पूर्ण झालेली सामुदायिक शौचालये (सीट्स)	बांधकाम पूर्ण झालेली सार्वजनिक शौचालये (सीट्स)	एकूण
जानेवारी, २०२६ अखेर	७,२२,५८१	१,०४,९५६	५५,३६३	८,८२,९००

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी राज्यामध्ये मिशनमोडमध्ये करून राज्याचा नागरी भाग हागणदारी मुक्त झाल्याची घोषणा मा. राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीत दिनांक २ ऑक्टोबर २०१७ रोजी करण्यात आली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत १.८८ लक्ष वैयक्तिक शौचालये, १६,९०५ सीट्स सामुदायीक शौचालये, ४,२९२ सीट्स सार्वजनिक शौचालये, ३,२३८ सीट्स आकांक्षी शौचालये व ६,८३० युनिट मुत्रालये बांधण्याच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

(२) घनकचरा व्यवस्थापन :

नागरी स्थानिक संस्थांमध्ये विलगीकरण केलेल्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून कंपोस्ट खताची निर्मिती करण्यात येत आहे. या कंपोस्ट खताची विक्री करण्यासाठी "हरित महासिटी कंपोस्ट" ब्रँड नोंदणीकृत केलेला आहे. जानेवारी, २०२६ अखेर राज्यातील २७९ शहरातील कंपोस्ट खतास या ब्रँडने प्रमाणित करण्यात आले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत राज्यातील शहरांचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महसुली विभागनिहाय एजन्सिज ची नियुक्ती करण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यातील एकूण ३५६ शहरांच्या रुपये ९३५ कोटी किंमतीचे सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून यातील कामे प्रगतीपथावर आहेत.

राज्यातील घनकचरा व्यवस्थापनाची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	दरदिवशी निर्मिती होणारा कचरा शौचालये (TPD)	संकलन (%)	विलगिकरण (%)	प्रक्रिया (%)
२०२५	२५,५३४	९९.३०	९९.५०	८८

(३) कचरा मुक्त शहरे (GFC) Garbage Free City :

कचरा व्यवस्थापनाशी निगडीत २४ निकषांवर आधारीत पहाणी करून शहरांना कचरा मुक्त शहरे तारांकित मानांकन (GFC Star rating) दिले जाते. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये महाराष्ट्रातील १४८ शहरांचा समावेश आहे. त्यापैकी ७ स्टार मानांकन प्राप्त २ शहरे, ५स्टार मानांकन प्राप्त ४ शहरे, ३ स्टार मानांकन प्राप्त २२ शहरे, १ स्टार मानांकन प्राप्त १२० शहरे आहेत.

राज्यातील ३४० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १००५६ कि.मी च्या मलजल वाहिन्याचा कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी ४२.७८ कि.मी च्या मलजल वाहिन्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून ३४.४ कि.मी.चे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

राज्यातील २११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मैला उपसा वाहने खरेदी करणे करिता कार्यादेश दिले असून २७ मैला उपसा वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. उर्वरित मेला उपसा वाहने उपलब्ध करुन देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीच्या १८६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी १०८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. बृन्हमुंबई महानगरपालिका वगळता उर्वरित ७८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जुन्या साठलेल्या कचऱ्यावर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२६ पूर्वी शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याचे नियोजित आहे.

राज्यात एकूण २,४०० टन प्रतिदिन क्षमतेचे १० बांधकाम व पाडकाम प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. याशिवाय २२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये १२४ यांत्रिक रस्ता सफाई वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

(४) ODF/ODF+ODF++ :

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये राज्यातील ३० शहरे वॉटर प्लस, २५७ शहरे ODF++, ८२ शहरे ODF+ तर ४२ शहरे ODF म्हणून प्रमाणित करण्यात आली आहेत. तसेच राज्यातील ४११ शहरे सफाई मित्र सुरक्षित शहरे म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ :

सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यामध्ये महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक.

- राष्ट्रीय स्तरावर आयोजित स्वच्छ सर्वेक्षण (नागरी)-२०२४ मध्ये देशातील ५८ कटक मंडळांसह एकूण ४,५८९ शहरांनी भाग घेतला, त्यापैकी ४१४ सहभागी शहरे राज्यातील होती.
- राज्यातील (नवी मुंबई, मीरा भाईंदर, पिंपरी-चिंचवड, लोणावळा, विटा, सासवड, देवळाली प्रवरा, पांचगणी, पन्हाळा, कराड) या १० शहरांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला.
- राज्यातील एकूण १४८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्टार रेटिंग प्रमाणपत्र प्राप्त झाली आहेत. नवी मुंबई आणि पिंपरी चिंचवड शहराला ७ स्टार रेटिंग, ४ शहरांना (मीरा भाईंदर, पुणे, लोणावळा आणि विटा) ५ स्टार रेटिंग, २२ शहरांना ३ स्टार रेटिंग व १२० शहरांना १ स्टार रेटिंग प्राप्त झाली आहेत.
- राज्यातील (नवी मुंबई, लोणावळा, विटा, सासवड, देवळाली प्रवरा, पांचगणी, पन्हाळा) या ७ शहरांना सुपर स्वच्छ लीग अंतर्गत पुरस्कार प्राप्त झाला आहे.
- राज्यातील ४११ शहरांपैकी ४२ शहरे ओडीएफ, ८२ शहरे ओडीएफ अ आहेत, २५७ शहरे ओडीएफ अअ, आणि ३० शहरे वॉटर प्लस झाले आहेत.

३. अमृत अभियान :—

नागरीकरण ही समस्या न मानता संधी मानून धोरणे आखण्यात येत आहेत. नागरी क्षेत्रातील पाणीपुरवठा, मलनिःस्सारण व नागरी परिवहन, सांडपाण्याचा पुनर्वापर, हरित पट्टे या मुलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने "अटल मिशन फॉर रिज्युविनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन" (अमृत) ही योजना अंमलात आणली आहे. या योजनेचा लाभ राज्यातील ४४ शहरे व ७६ टक्के नागरी लोकसंख्येस मिळत आहे.

या अभियाना अंतर्गत ३७ पाणीपुरवठा प्रकल्प, ३० मलनिःस्सारण प्रकल्प व १२८ हरित क्षेत्र विकास प्रकल्प मंजूर असून पाणीपुरवठा व मलनिःस्सारणाचे एकूण रु. ४९९२ कोटी किंमतीचे ४६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. तसेच रु. १७९ कोटी किंमतीचे हरित क्षेत्र विकासाचे १२८ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उर्वरित प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

४. अमृत २.० अभियान :—

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाची दिनांक १४ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अभियान राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये राबविण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतलेला आहे. शहरातील घरांना नळ जोडणी देऊन पाणी पुरवठ्याच्या बाबतीत १०० टक्के स्वयंपूर्ण करून स्वच्छ व शाश्वत पाणीपुरवठा करणे, जलस्त्रोत पुनरुज्जीवन व शहरातील मोकळ्या जागेमध्ये उद्याने व हरित क्षेत्र विकसित करणे आणि ४४ अमृत १.० शहरांमध्ये १०० टक्के मल प्रक्रिया व मलनिःस्सारण जोडणी देणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

सदर अभियानांतर्गत राज्याच्या रु. २७,१६१.६९ कोटी प्रकल्प किंमतीच्या राज्य जलकृती आराखडयास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर अभियानंतर्गत आजमितीस रुपये २३,२९७.६२ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, सरोवर पुनरुज्जीवन व हरित क्षेत्र विकास अशा एकूण २३८ प्रकल्पांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(III) **कार्यक्रमावरील खर्च राज्यस्तर**

(१) मुलभूत नागरी सुविधा विकसित करण्यासाठी महानगरपालिकांना विशेष अनुदान.

(२) तीर्थक्षेत्र विकास योजना.

(३) (पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपालिकांना उत्कृष्ट कामासंदर्भात प्रोत्साहनपर बक्षिस योजना.) नगरविकास दिन.

(४) पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यातील गिरीस्थान नगरपरिषदांना पर्यटन विकास अनुदान.

(५) राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्याची योजना.

(६) नगरोत्थान महाअभियान.

(७) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान.

(८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना.

(९) नवीन स्थापन होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायती यांचा विकासासाठी विशेष अर्थसहाय्य करणे.

(१०) महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोय-सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य करणे.

(११) नागरी आदिवासी वस्ती सुधारणा योजना.

(१२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात स्मारकांची उभारणी.

(१३) केवळ महिलांकरिता तेजस्विनी बस योजना.

(१४) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP-2)

(१५) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ (MUTP-3)

(१६) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3A)

(१७) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग -२अ

(१८) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-२ब

(१९) मुंबई-मेट्रो मार्ग-३

(२०) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-४

(२१) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-४अ

(२२) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-५

(२३) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-६

(२४) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-७

(२५) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-८

(२६) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-९ व ७अ

(२७) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-१०

(२८) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-११

(२९) मुंबई-मेट्रो रेल्वे मार्ग-१२

(३०) नागपूर-मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-१

(३१) नागपूर-मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२

(३२) पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प

(३३) पिंपरी-चिंचवड (पी.सी.एम.सी.) ते निगडी कॉरीडॉर क्र-१ए

(३४) स्वारगेट ते कात्रज (कॉरीडॉर क्र-२ए)

(३५) माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे प्रकल्प

(३६) वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी)मेट्रो रेल्वे प्रकल्प

(३७) खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मेट्रो रेल्वे प्रकल्प

(३८) ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प

(३९) स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक.

१. मूलभूत नागरी सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी महानगरपालिकांना विशेष अनुदान

राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांपैकी बहुतांशी महानगरपालिकांची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे वाढत्या नागरीकरणाबरोबर येथील नागरिकांना पुरविण्याच्या नागरी सुविधांमध्ये आवश्यक ती वाढ ध्यानात घेऊन राज्यातील महानगरपालिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देता याव्यात म्हणून उपलब्ध अनुदानाचे महानगरपालिका निहाय वितरण करण्यात येते.

या योजनेअंतर्गत महानगरपालिकांचा हिस्सा २५ टक्के व शासनाचा हिस्सा ७५ टक्के अट यामध्ये विहित करण्यात आलेली आहे.

२. तीर्थक्षेत्र विकास योजना

राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या/यात्रास्थळांच्या ठिकाणी भेट देणाऱ्या यात्रेकरूंची संख्या फार मोठ्या प्रमाणात असते. बऱ्याच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षाच्या काही ठराविक कालावधीमध्ये फार मोठ्या संख्येने यात्रेकरू भेट देतात अशी तीर्थक्षेत्र/यात्रास्थळे ज्या स्थानिक नागरी संस्थांच्या क्षेत्रात आहेत, उदा. नगरपालिका, ग्रामपंचायती यांच्यावर यात्रेकरूंसाठी सोयी करण्यासाठी व्यवस्थापनाचा अत्यंत मोठा भार पडतो. अशा स्थानिक संस्थांची आर्थिक परिस्थिती देखील जेमतेम स्वरूपाची असते व त्यामुळे मोठ्या प्रमाणात येणाऱ्या यात्रेकरूंना मूलभूत नागरी सुविधा पुरविणे या संस्थांच्या आवाक्याबाहेर असते. पर्यायाने गैरसोयीची झळ यात्रेकरूंना सोसावी लागते. याचा गांभीर्याने विचार केल्यानंतर शासनाने सन १९९०-९१ पासून प्रमुख तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक मुलभूत सोयी पुरविण्यासाठी व त्या अनुषंगाने विकासाची कामे करण्यासाठी प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या विकास योजना शासनस्तरावर मंजूर केलेल्या आहेत.

३. नगरविकास दिन

"नागरी स्थानिक संस्थांना अधिक स्वायत्तता देण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या ७४ व्या घटना दुरूस्तीत मा. राष्ट्रपती महोदयांनी दिनांक २० एप्रिल १९९३ रोजी मान्यता दिली आहे. त्यास अनुसरून दरवर्षी दिनांक २० एप्रिल हा दिवस "नगरविकास दिन" म्हणून साजरा करण्याबाबत दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे."

४. गिरीस्थान नगरपरिषदांना पर्यटन विकास अनुदान

पहिल्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यातील प्रत्येक गिरीस्थान नगरपरिषदेस दरवर्षी रुपये १० लाख पर्यटन विकास अनुदान द्यावयाचे आहे. या शिफारशी सन १९९९-२००० पासून लागू करण्यात आल्या असून नगरपरिषद क्षेत्रात येणाऱ्या पर्यटकांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी सदर विशेष अनुदान देण्यात येते. त्यानुसार राज्यातील माथेरान, पाचगणी, महाबळेश्वर, पन्हाळा, खुलताबाद व चिखलदरा या ६ गिरीस्थान नगरपरिषदांना पर्यटन विकासाच्या अनुषंगाने भरीव अनुदान देण्यासाठी सन २०१०-२०११ पासून सदर योजना जिल्हास्तरीय करण्यात आलेली आहे.

५. राज्यातील नगरपरिषदांना "वैशिष्ट्यपूर्ण" कामासाठी विशेष अनुदान देण्याची योजना

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. राज्यातील नगरपरिषदांसाठी लागू असलेल्या "वैशिष्ट्यपूर्ण" या योजनेची सुधारित मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत.

राज्यातील अस्तित्वातील सर्व नगरपरिषदा "वैशिष्ट्यपूर्ण" या योजनेअंतर्गत अनुदानास पात्र आहेत.

योजनेतअंतर्गत घ्यावयाच्या कामाचे स्वरूप :—

"वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत मंजूर नियतव्ययामधून वितरित करण्यात येणाऱ्या निधीमधून (२२१७ १३०१) नाविन्यपूर्ण अभिनव अशा स्वरूपाचे कामकाज नगरपरिषदेने हाती घेणे अपेक्षित असून अशा कामास प्राधान्य द्यावयाचे आहे. सदरहू काम नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सदर योजनेंतर्गत हाती घेतलेले काम सर्वसाधारणपणे भांडवली स्वरूपांचे असावे ज्यायोगे भविष्यात नगरपालिकांना आर्थिक स्वयंपूर्ण होण्यासाठी कायम स्वरूपी उत्पनाचा स्त्रोत मिळून देण्याच्या दृष्टीने फायदेशीर राहील.

या योजनेअंतर्गत खालील प्रकारची कामे अनुज्ञेय आहेत :—

१. प्रशासकीय इमारत-नवीन बांधकाम, विस्तारीकरण, नुतनीकरण, फर्निचर इ. बाबी.

२. बहुपयोगी सभागृहे – सामाजिक सभागृह, समाजमंदिर, वाचनालय, अभ्यासिका, लोकसेवा केंद्र इ. समाजपयोगी बांधकामे.

३. नाट्यगृह – नाट्यगृह/प्रेक्षागृह/सांस्कृतिक केंद्र इ. चे नवीन बांधकाम/विस्तारीकरण/नुतनीकरण या कामाच्या प्रकाराच्या अनुषंगाने संबंधित नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये नाट्यगृह/सांस्कृतिक केंद्र चालण्याची व्यवहार्यता प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी तपासण्यात यावी.

४. व्यापारी संकुल - सदर योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या गाळ्यांचे बाजारभावाने मूल्य निश्चित करण्यात यावे व लिलाव पद्धतीने भाडेतत्वावर देण्यात येतील. याबाबतची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी. या अटीवरच या प्रयोजनासाठी निधी अनुज्ञेय राहील.

५. आठवडी बाजार - यामध्ये ओटे, भाजी मंडई, मच्छीमार्केट, मटण मार्केट, फेरीवाला क्षेत्र इ.

६. स्मशानभूमी - सर्व धर्म/समाज यांच्या स्मशानभूमी.

७. हरीतपट्टे/अमृतवने - बगीचा, वृक्षारोपण, हरीतपट्टे विकसित करणे इ. हरीतपट्टे विकसित करताना शासन निर्णय दिनांक १५ जुलै २०१७ मधील मार्गदर्शनक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. क्रीडांगण - खेळाची मैदाने, जॉगिंग ट्रक, व्यायामशाळा इ.

९. पाणीपुरवठ्याच्या अत्यावश्यक सेवा - पाण्याची टाकी, जलकुंभ, पाणी मीटर, वितरण व्यवस्था, जलशुद्धीकरण याच्याशी संबंधित अत्यावश्यक बाबी इ.

१०. प्रलंबित व रेंगाळलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी (Gap Funding) केंद्र/राज्य शासनाच्या योजनेमधून हाती घेतलेले प्रकल्प कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव त्या योजनेमधून निधी उपलब्ध होऊ शकत नसल्यास असे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर योजनेमधून निधी अनुज्ञेय राहील.

वर नमूद केलेल्या अनुज्ञेय कामांव्यतिरिक्त एखादे काम सदर योजनेअंतर्गत घ्यावयाचे असल्यास तसा प्रस्ताव संबंधित नगरपरिषदेने जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास सादर करणे आवश्यक असते अशा सदर प्रकरणी प्रशासकीय मान्यतेचे निश्चित अधिकार शासनास राहतील.

योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरिता तांत्रिक मान्यता देणे—

(अ) सदर योजनेअंतर्गत निश्चित करण्यात येणाऱ्या कामांकरिता संबंधित कार्यान्वयन यंत्रणेने सविस्तर प्रस्ताव बनवून तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

(ब) स्थापत्य कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरिता प्रशासकीय मान्यता देणे—

(अ) जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावित कामाची जागा ताब्यात असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावित काम विकास आराखडा व विकास नियमावली तसेच, प्रचलित नियमांशी सुसंगत असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावाची सविस्तर छाननी करून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे **अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.**

(ब) अनुज्ञेय कामांव्यतिरिक्त एखादे काम सदर योजनेअंतर्गत घ्यावयाचे असल्यास तसा प्रस्ताव संबंधित नगरपरिषदेने जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावा. अशा प्रकरणी प्रशासकीय मान्यतेचे **अधिकार शासनास राहतील.**

योजनेचा वित्तीय आकृतीबंध—

(अ) " वैशिष्ट्यपूर्ण " योजनेअंतर्गत विभागाच्या मंजूर नियतव्ययामधून वितरित करण्यात येणाऱ्या निधीकरिता (२२१७ १३०१) वित्तीय आकृतीबंध राज्य शासन ९० टक्के व नगरपरिषद १० टक्के असा राहील.

(ब) ज्या प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा नगरपरिषद असेल, अशा प्रकरणी नगरपरिषदेने त्यांचा स्वःहिस्सा भरणे बंधनकारक राहील.

(क) ज्या प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा नगरपरिषद व्यतिरिक्त अन्य (सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, विद्युत विभाग इ.) निश्चिती करण्यात येईल अशा प्रकरणीही नगरपरिषदेने वित्तीय आकृत्तीबंधानुसार स्वःहिस्सा (१० टक्के हिस्सा) भरणे आवश्यक राहील.

(ड) अशा सर्व प्रकरणी आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे देणे नगरपरिषदेस बंधनकारक राहील.

योजनेअंतर्गत निधी वितरणाची कार्यपद्धत—

(अ) शासनास प्राप्त झालेल्या निवेदन/प्रस्ताव यांच्या अनुषंगाने, सदर योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांकरिता नगरपरिषदनिहाय निधी मंजूर करण्यात येईल. उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूद व मागणीचे प्रस्ताव विचारात घेऊन आवश्यकतेनुसार नगरपरिषदांना अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(ब) सदरचे अनुदान मंजूर करतेवेळी पुढील बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात येईल, नगरपरिषदेची वित्तीय परिस्थिती, स्थानिक गरज व प्राथमिकता, पूरक विकास प्रकल्पाकरिता, भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, नागरीकरणाचा दर, पूरक

योजनेच्या अन्य अटी व शर्थी—

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत. कामाचे स्वरूप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरूपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे. हाती घ्यावयाची कामे सर्वसाधारणपणे नागरिकांच्या ठळकपणे लक्षात येतील किंवा नागरिकांना त्या कामांचा स्पष्ट बोध होईल अशा स्वरूपांच्या कामांनाच प्राधान्य देण्यात यांवेत.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखड्याशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना " ई-निविदा " कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. " ई-निविदा " कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टांसाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणाऱ्या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही. तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकारांचा भंग होणार नाही हे पाहणे.

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापूर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

(ड) पायाभूत सुविधाअंतर्गतच्या कोणत्याही कामांची दुरुस्ती होणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

निधी वितरणविषयक कार्यपद्धती

शासनास सादर करण्यात आलेले परिपूर्ण प्रस्ताव, उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद, योजनेचे निकष, कामाचे स्वरूप इत्यादीं बाबींचा एकत्रित विचार करून निधीचे वितरण करण्यात येईल. या योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधी मुख्याधिकारी व अध्यक्ष यांच्या संयुक्त बँक खात्यावर ठेवण्यात यावा. या निधीचे विनियोग प्रमाणपत्र एक वर्षाच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील.

६. नगरोत्थान महाअभियान

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायती संस्थांमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याच्या अनुषंगाने नगरोत्थान महाभियान राज्यामध्ये सन २०१० पासून राबविण्यात येत आहे.

सदर अभियानाची अंमलबजावणी आता २२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत सर्व महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषद/नगरपंचायतमध्ये पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पर्जन्य जल निचरा वाहिनी, रेल्वे ओव्हर ब्रीज, राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक भूसंपादन, प्रमुख विमानतळ व प्रमुख रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे भूसंपादन प्रकल्प यांचा समावेश आहे. तसेच, ड वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषद/नगरपंचायतमध्ये वरील नमूद प्रकल्पासोबतच नागरी दळणवळण, सौर ऊर्जा उपांग, सामाजिक सोयी व सुविधांचा विकास यांचा समावेश आहे.

या अभियानांतर्गत रु. ३५४५८ कोटी किंमतीच्या ४९९ प्रकल्पांना मंजूर देण्यात आलेली आहे.

७. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णोत्सवी वर्षात दिनांक ३१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील "ड" महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" नावाची योजना सुरू करण्यात आलेली आहे.

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत राज्यातील नगरपालिकेतील/महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास मालकी तत्त्वावर २६९ चौ. फूट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत उपलब्ध करून देण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अनुदान वितरित करण्यात येते.

महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या सध्याच्या सेवानिवासस्थानांच्या ठिकाणी, सफाई कर्मचाऱ्यांची सेवानिवासस्थाने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेच्या निकषानुसार मोफत सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी ४.०० या कमाल चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५० टक्के सदनिका सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५० टक्के सदनिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जे सफाई कामगार दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत अथवा त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाला आहे अशा सफाई कामगारांचे पात्र वारस सेवेत असतील व त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळेस त्यांची पात्र सेवा २५ वर्षे होत नसेल तर, असे सफाई कर्मचारी ज्यांचे वारस म्हणून सेवेत लागले आहेत त्या सेवानिवृत्त अथवा मृत झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी यापूर्वी केलेल्या पात्र सेवेचा कालावधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत लाभ देण्यासाठी २५ वर्षांची पात्रता ठरविण्याकरिता विचारात घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. दिनांक २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असताना ज्या सफाई कामगारांना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुढील सेवेसाठी वैद्यकीय कारणास्तव असमर्थ ठरवून रुग्णता सेवानिवृत्त केले आहे, अशा सफाई कामगाराचा पात्र वारस सेवेत असेल व त्या पात्र वारसाच्या सेवानिवृत्तीच्या वेळेस त्यांची पात्र सेवा २५ वर्षे होत नसेल तर रुग्णता सेवानिवृत्त केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी केलेल्या पात्र सेवेचा कालावधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी २५ वर्षांची पात्रता ठरविण्याकरिता विचारात घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

९. नवीन स्थापन होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या विकासासाठी विशेष अर्थसहाय्य करण्याबाबत

दिनांक २७ जून २०१२ च्या शासन निर्णयानुसार, नव्याने स्थापन होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतींचा सुनियोजित विकास करता यावा, यासाठी त्यांना स्थापन झाल्यापासून ३ वर्षांपर्यंत पायभूत सुविधा व विविध लोकोपयोगी कामे हाती घेण्यासाठी १०० टक्के शासन अनुदान देण्याचे सन २०१२-१३ पासून निश्चित केले आहे. सदर शासन निर्णय हा निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी ३ वर्षांच्या कालावधीत स्थापन झालेल्या नगरपरिषदा/नगरपंचायती यांनाही लागू राहील. याकरिता नगरपरिषदा/नगरपंचायतींनी शहरात ज्या बाबींची कमतरता आहे, अशा आवश्यक असलेल्या नागरी सोयी-सुविधांशी संबंधित प्रकल्पांचा समावेश असलेला शहर विकास आराखडा तयार करून संबंधित जिल्हाधिकारी व आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर करणे क्रमप्राप्त आहे.

१०. महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य करण्याबाबत :

दिनांक २७ जून २०१२ च्या शासन निर्णयानुसार, महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी त्यांची हद्दवाढ झाल्यापासून ३ वर्षांपर्यंत पायाभूत सुविधा व विविध लोकोपयोगी कामे हाती घेण्यासाठी अनुदान देण्याचे सन २०१२-१३ पासून निश्चित केले आहे. या योजनेअंतर्गत हद्दवाढ झालेल्या महानगरपालिकांना प्रकल्प किमतीच्या ८० टक्के व नगरपरिषदांना ९० टक्के याप्रमाणात अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. सदर शासन निर्णय हा निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी ३ वर्षांच्या कालावधीत हद्दवाढ झालेल्या महानगरपालिका/नगरपरिषदा यांनाही लागू राहील. याकरिता महानगरपालिका/नगरपरिषदा यांनी हद्दवाढ झालेल्या भागात, ज्या बाबींची कमतरता आहे अशा आवश्यक असलेल्या नागरी सोयी-सुविधांशी संबंधित प्रकल्पांचा समावेश असलेला शहर विकास आराखडा तयार करून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर करणे क्रमप्राप्त आहे.

११. नागरी आदिवासी वस्ती सुधारणा योजना

राज्यातील नागरी क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येच्या कल्याणासाठी "आदिवासी वस्ती सुधारणा योजना" नावाची योजना सन २००६-२००७ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांसाठी १०० टक्के राज्य शासकीय अनुदान अनुज्ञेय आहे. आदिवासी उपयोजनेच्या जिल्हास्तरीय वार्षिक योजनेमधून तरतूद होणे आवश्यक राहील. सदरची योजना राज्यातील केवळ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील (१) जव्हार नगरपरिषद, जि. ठाणे, (२) डहाणू नगरपरिषद, जि. ठाणे, (३) त्रिंबकेश्वर नगरपरिषद, जि. नाशिक, (४) इगतपूरी नगरपरिषद, जि. नाशिक, (५) नंदूरबार नगरपरिषद, जि. नंदूरबार, (६) तळोदा नगरपरिषद (७) नवापूर नगरपरिषद, जि. नंदूरबार, (८) चिखलदरा नगरपरिषद, जि. अमरावती, (९) पांढरकवडा नगरपरिषद, जि. यवतमाळ, (१०) किनवट नगरपरिषद, जि. नांदेड, (११) शहापूर नगरपंचायत, जि. ठाणे, (१२) कळवण नगरपंचायत, जि. नाशिक, (१३) सुरगणा नगरपंचायत, जि. नाशिक, (१४) पेठ नगरपंचायत, जि. नाशिक, (१५) धडगाव नगरपंचायत, जि. नंदुरबार, (१६) सिरोंचा नगरपंचायत, जि. गडचिरोली, (१७) अहेरी नगरपंचायत, जि. गडचिरोली, (१८) एट्टापली नगरपंचायत, जि. गडचिरोली, (१९) धानोरा नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२०) कुरखेडा नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२१) कोरची नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२२) भामरागड नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२३) विक्रमगड नगरपंचायत, जि. पालघर, (२४) तलासरी नगरपंचायत, जि. पालघर, (२५) वाडा नगरपंचायत, जि. पालघर, (२६) मोखाडा नगरपंचायत, जि. पालघर, (२७) धारणी नगरपंचायत, जि. अमरावती, या नगरपरिषदांतील नागरी भागासाठी लागू आहे. या योजनेअंतर्गत आदिवासी वस्त्यांमधील रस्ते, गटारे, सांडपाण्याची व्यवस्था, वीजेची सोय, आरोग्यविषयक सोयी, शिक्षणविषयक सोयी इ. कामे अनुज्ञेय आहेत. या योजनेखालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. या योजनेकरिता आदिवासी विकास विभागाकडून नगरविकास विभागास तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.

१२. नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्याबाबत :

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ अन्वये नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्मारक उभारण्याची कार्यवाही नगरविकास विभागाने करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रात राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती /स्वातंत्र्य सैनिक/इतिहास प्रसिध्द व्यक्ती/संत महात्मे/राजकारणातील प्रसिध्द व्यक्ती यांची स्मारके उभारण्याबाबत नगर विकास विभाग , शासन निर्णय दिनांक ४ जानेवारी , २०१६ अन्वये प्रत्येक जिल्हयात खालीलप्रमाणे समिती गठीत करावयाची आहे :-

(१) जिल्ह्याचे पालकमंत्री	:	अध्यक्ष
(२) जिल्हाधिकारी	:	सदस्य
(३) जिल्हा पोलीस आयुक्त/अधीक्षक	:	सदस्य
(४) जिल्ह्याचे नगररचनाकार	:	सदस्य
(५) अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग	:	सदस्य
(६) आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी , नगरपालिका.	:	सदस्य-सचिव

उपरोक्त सदस्यांव्यतिरिक्त अध्यक्षांच्या मान्यतेने अन्य सदस्यांनाही आवश्यकता असल्यास बैठकीस आमंत्रित करता येईल.

०२. स्मारकास मान्यता देताना स्मारकाच्या प्रगतीचे टप्पे निश्चित करण्यात यावेत. प्रत्येक टप्प्यासाठी लागणारा निधी निश्चित करण्यात यावा व त्यानुसारच उभारणी होईल याकडे काटेकोरपणे लक्ष द्यावे. स्मारकाची उभारणी जास्तीतजास्त अडीच वर्षांच्या आत पूर्ण करण्यात यावी. स्मारके उभारताना सर्व शासकीय नियमांचे पालन करण्यात यावे. सदर समितीने मंजुरी दिलेल्या स्मारकांबाबतचा सर्वकष प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनास सादर करावा. स्मारकाकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीचे विनियोजन प्रमाणपत्र शासनास विहित कालावधीत सादर करावे. सदर स्मारकाच्या देखभालीची जबाबदारी संबंधित महानगरपालिका/नगरपालिकेची राहील. याकरिता शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी उपलब्ध करण्यात येणार नाही.

०३. नागरी भागात स्मारके उभारण्यासाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान २२१७-६०३८ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रु.२०.०० कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

नागरी भागात स्मारके उभारण्यासाठी नगरपरिषदांना सहाय्यक अनुदान २२१७ए०४७ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रु.१०००/- इतक्या निधीची लाक्षणिक मागणी करण्यात आली आहे.

नागरी भागात स्मारके उभारण्यासाठी नगरपंचायतींना सहाय्यक अनुदान २२१७ए०५६ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रु.१०००/- इतक्या निधीची लाक्षणिक मागणी करण्यात आली आहे.

राज्यातील "अ" व "ब" वर्ग महानगरपालिका वगळता "क" व "ड" वर्ग महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषद/नगरपंचायती क्षेत्रातील कोविड विरोधी मोहिमेमध्ये कर्तव्य पार पाडतना कोरोनाची लागण होऊन मृत्यूमुखी पडलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना केंद्र शासन व राज्य शासनाच्या धर्तीवर सानुग्रह सहाय्यक अनुदान वितरीत करण्याबाबत.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. २९ मे, २०२० अन्वये कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावतांना कोव्हिडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह अनुदान करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कोव्हिड-१९ शी संबंधित कर्तव्य बजावतांना कोव्हिडमुळे मृत्यू होणाऱ्या क व ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगपालिका/नगरपंचायती येथे काम करणाऱ्या कर्मचारी वृंद यांना रु. ५०.०० लक्षचे सानुग्रह सहाय्य नगर विकास विभाग शासन निर्णय, दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ अन्वये लागू करण्यात आले असून वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २९ मे २०२० मधील सर्व अटी/शर्ती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्या आहेत.

या योजनेंतर्गत २२१७ए३९७ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रु. ५०,००,००० इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कार्यक्रम

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता या लेखाशीर्षाखाली निधी उपलब्ध करुन दिला जातो. दरवर्षी मुख्याधिकारी व नगरपरिषद संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते.

शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता २२५१०९९१ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रु. ४,०५,८५,६०० इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

१३. केवळ महिलांकरिता तेजस्विनी बस सेवा :

राज्यातील २७ महानगरपालिका क्षेत्रात औद्योगिकीकरण व जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिला नोकरदार व व्यावसायिकांचे प्रमाण वाढत आहे. त्यांच्या सोईसाठी उत्तम दर्जाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक आहे. महिलांना सुखकर व सुरक्षित प्रवास सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महिलांकरिता स्वतंत्र बस व्यवस्था "तेजस्विनी बस" या नावाने सुरू करण्याचा निर्णय दिनांक ३ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये खालील अटी शर्तींच्या अधीन घेतला आहे.

१. राज्यातील २७ महानगरपालिकांपैकी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे व नागपूर या सहा महानगरपालिका क्षेत्रात केवळ महिलांसाठी स्वतंत्र बस सेवा "तेजस्विनी बस" योजना या नावाने प्रथम टप्प्यात कार्यान्वित करण्यात येत आहे.

२. "तेजस्विनी बस" योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या बसेसमध्ये सकाळी ७ ते ११ व सायंकाळी ५ ते रात्रौ ९ या कालावधीकरिता संबंधित बसेसमध्ये महिलांसाठी १०० टक्के आसने राखीव राहतील. या व्यतिरिक्त उर्वरित काळात नियमित आसन व्यवस्थेनुसार बसेस चालविण्याची मुभा महानगरपालिकेस राहील. तथापि, स्थानिक परिस्थितीनुसार यामध्ये बदल करण्याची मुभा योजना अंमलबजावणी समितीस राहील.

३. महिलांकरिता १०० टक्के आसने आरक्षित केलेल्या सकाळी ७ ते ११ व सायंकाळी ५ ते रात्रौ ९ या कालावधीकरिता संबंधित बसेसमध्ये महिला वाहक प्राथम्याने उपलब्ध होईल याची दक्षता महानगरपालिकेने घ्यावी.

४. सदर योजनेतील बसेसचा तिकीट दर संबंधित महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रचलित तिकीट दराइतका राहील.

५. सदर योजनेतील बसेसचा रंग केशरी राहील. तसेच प्रत्येक बसवर "महाराष्ट्र शासन सहाय्यीत-तेजस्विनी बस" असा उल्लेख ठळक मोठ्या अक्षरात करण्यात यावा. त्याचे संकल्पचित्र शासन स्तरावरून निश्चित करून देण्यात येईल.

६. संबंधित महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदरच्या योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता खालीलप्रमाणे अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत आहे.

महानगरपालिका आयुक्त	:	अध्यक्ष
अपर आयुक्त/उप आयुक्त (परिवहन)	:	सदस्य
प्रमुख वित्त व लेखा अधिकारी	:	सदस्य
महाव्यवस्थापक (परिवहन)	:	सदस्य-सचिव

७. या योजनेअंतर्गत बसेस खरेदीकरण्याकरिता एकवेळचा भांडवली खर्च म्हणून प्रती बस रुपये ३० लक्षपर्यंत १०० टक्के अनुदान शासन महानगरपालिका देईल. सदर निधीमध्ये स्थानिक गरजेनुसार बसचे मॉडेल अंमलबजावणी समितीच्या मान्यतेने महापालिकेने खरेदी करावे. खरेदी ई-निविदा पद्धतीने असावी. मंजूर निधीमधून अंशतः निधी शिल्लक राहिल्यास महानगरपालिका स्वतःच्या स्रोतातून रक्कम भर घालून अतिरिक्त बस खरेदी करू शकेल. मात्र अधिकची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येणार नाही.

सिंहस्थ कुंभमेळा

नाशिक व त्रंब्यकेश्वर येथे सन २०२७-२०२८ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येत असून यादृष्टीने मोठ्या प्रमाणावर दळणवळण, परिवहन, पाणी पुरवठा, राहण्याची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, विद्युत व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था, वाहनतळ व्यवस्था, इत्यादी सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने नियोजन व त्याची प्रभावशाली अंमलप्राजावणी यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने दिनांक १४.१२.२०२३ आणि दिनांक ०३.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २८ सदस्यांची शिखर समिती तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली १८ सदस्यांची उच्चाधिकार समिती व मा. मंत्री (**तात्कालीन** ग्रामविकास व पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांची जिल्हास्तरीय समिती आहे. याशिवाय विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे.

महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत महिलांसाठी वसतीगृह बांधणेः-

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी अर्थसहाय्य २०२४-२५ योजनेंतर्गत ठाणे, कल्याण डोंप्रिवली, नागपूर, पिंपरी चिंचवड, सोलापूर, नवी मुंप्रई, छत्रपती संभाजीनगर या महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत महिलांकरता वसतिगृहाचे प्रांधकाम करण्यात येणार आहे. त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला असून त्याकरिता राज्याला रुपये २१५ कोटी निधी उपलप्रब्ध होणार आहे. सदर वसतीगृहाची मालकी शासनाची राहील व त्याचे संचालन / देखभाल दुरुस्ती सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर करण्यात येणार आहे.

(IV 222222) कार्यक्रमावरील खर्च (जिल्हास्तर)

(I) विशेष घटक योजना

१. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना.

(१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना (विशेष घटक योजना)

राज्यातील नागरी क्षेत्रातील विशेष घटक (अनुसूचित जाती व नवबौद्ध) लोकांच्या कल्याणासाठी शासनाने नागरी दलित वस्ती सुधारणा नावाची योजना सन १९९५-९६ पासून सुरू केली आहे. या योजनेचे नाव दिनांक २१ ऑगस्ट २०१९ पासून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना असे करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत नागरी क्षेत्रातील ज्या वस्त्यांमध्ये विशेष घटक लोकसंख्येचे प्रमाण ५० टक्केपेक्षा अधिक आहे तसेच जे प्रभाग विशेष घटकांसाठी राखीव आहेत अशा वस्त्यांमध्ये/प्रभागांमध्ये नागरी सोयी सुविधांविषयक कामे घेण्यासाठी १०० टक्के अनुदान राज्य शासनाकडून देण्यात येते.

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिकोनातून तसेच शासनाच्या प्रचलित विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरून सन २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून या योजनेचे सनियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करून जिल्हास्तरावर देण्याचा शासनाने निर्णय दिनांक ५ मार्च २००२ च्या शासन निर्णयाद्वारे घेतला आहे.

या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक संस्थांना खालील नमूद किमान मर्यादेपर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे :—

अ. क्र.	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था	कमाल अनुज्ञेय अनुदान
१	महानगरपालिका	रु. १००.०० लक्ष
२	" अ " वर्ग नगरपरिषद	रु. ५०.०० लक्ष
३	" ब " व " क " वर्ग नगरपरिषद	रु. २५.०० लक्ष

विशेष घटक योजनेच्या लाभार्थ्यांना अधिकाधिक नागरी सुविधा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौद्धांसाठी ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध (विशेष घटक) लोकसंख्येच्या आधारावर विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत तरतुदी उपलब्ध कराव्यात अशा सूचना सर्व संबंधितांना शासनाने दिल्या आहेत. या योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे :—

(अ) रस्ते, पोच रस्ते, जोड-रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंटीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत व रस्त्याकरिता कच्चे रस्ते), नाली बांधकाम, लहान नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरुस्ती तसेच उघड्या विहिरीवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती; तसेच कठडे बांधणे, छोटे पूल, पिण्याच्या पाण्यासाठी सोईसुविधा, (हापसा, पाण्याची टाकी), सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या, शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे, बगीच्यांमध्ये पक्क्या स्वरूपाचे बसवावयाचे खेळाचे साहित्य, समाजमंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र, दुकाने, स्मशानभूमीचा विकास यासारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

वरील कामाच्या व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस स्थानिक गरजेनुसार एखादे काम योजनेंतर्गत हाती घ्यावयाचे असल्यास व ते योजनेच्या अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास असे काम शासनाच्या पूर्वसंमतीने घेता येऊ शकेल.

(ब) या योजनेंतर्गत कामे हाती घेताना " पायाभूत सेवा सुविधांच्या " कामांना प्राधान्य असणे आवश्यक राहील.

(क) शहरांच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजनेंतर्गत कामे या योजनेंतर्गत हाती घेता येतील.

(ड) या योजनेंतर्गत हाती घेतलेल्या कामांची भविष्यातील दुरुस्ती व देखभाल याचा खर्च स्थानिक संस्थेने स्वतःच्या निधीतून करावा. प्राप्त अनुदान कोणत्याही परिस्थितीत देखभाल अथवा दुरुस्तीसाठी वापरू नये.

" लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार " या योजनेसाठी उपलब्ध जिल्हानिहाय तरतुदीचे वितरण प्रत्येक आर्थिक वर्षासाठी स्वतंत्रपणे शासनाकडून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येईल. शासनाने वितरित केलेल्या जिल्हानिहाय तरतुदी प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चित करण्यासाठी मा. पालक मंत्री यांचे अध्यक्षतेखाली " जिल्हास्तरीय समिती " नियुक्त करण्यात आली आहे.

(ब) अनिवार्य खर्च

(B) Committed Expenditure

(१) नगरपालिकांना सहायक अनुदान

(२) जमीन महसूल व बिनशेतीसारा अनुदान

(३) मुद्रांक शुल्क अनुदान

(४) गौण खनिज अनुदान

(५) करमणूक कर अनुदान

(६) नवी दिल्ली येथील राष्ट्रीय नागरी कार्य संस्थेस सहायक अनुदान व सदस्यत्व फी

(७) रस्ता अनुदान

(८) कटक मंडळे अनुदान

(९) यात्रा कर अनुदान

(१०) नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायातून सोयी सुविधा निर्माण करणे.

(११) नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांच्या वेतनावरील खर्च

(१२) १५ वा वित्त आयोग.

(१३) वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान.

१. नगरपालिका सहायक अनुदान :

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२००९/प्र.क्र. १०६/०९/नवि-४, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ अन्वये सन २००९-२०१० या आर्थिक वर्षापासून राज्यातील नगरपरिषद कर्मचाऱ्यांना शासनाकडून देण्यात येणारे जकात अनुदान व महागाई भत्ता अनुदान बंद करून नगरपालिका सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक २ ऑगस्ट २०१९ अन्वये राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयात नमूद केल्यानुसार माहे सप्टेंबर २०१९ पासून ७ वे वेतन आयोगानुसार सहायक अनुदान वितरित करण्यात येत आहे.

२. जमीन महसूल व बिनशेतीसारा अनुदान :

महाराष्ट्र राज्य पहिल्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार (शिफारस क्रमांक १३.८१) ज्या " क " वर्ग नगरपरिषदांची लोकसंख्या १५००० पेक्षा कमी आहे अशा नगरपरिषदांना त्यांच्या क्षेत्रात वसूल झालेल्या नागरी संस्थांना जमीन महसूल अनुदान १५ऽ ऐवजी ७५ऽ दराने देण्यात येत आहे.

३. नगरपरिषद क्षेत्रामध्ये असलेल्या स्थावर संपत्तीच्या विवक्षित हस्तांतरणाकरिता मुद्रांक शुल्क बसविण्यासाठी नगरपरिषदांना सहायक अनुदान :

शासन अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक एमसीओ-२४९३/प्र. क्र. ८१/९३/नवि-३२, दिनांक ३० जुलै १९९३ अन्वये राज्यातील सर्व नगरपरिषदांना दिनांक १ ऑगस्ट १९९३ पासून नगरपरिषद क्षेत्रात यावर सविस्तर मालमत्तेचे हस्तांतरणावरील जमा झालेली अर्धा टक्का रक्कम अधिभाराची रक्कम मुद्रांक शुल्क अनुदान म्हणून देण्यात येत होती. पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सदर अनुदान अर्धा टक्क्यावरून १ टक्का करण्यात आला आहे. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार अनुदान वितरित करण्यात येते.

४. गौण स्वरूपाच्या खनिजावरील स्वामित्व धनासाठी 'क' वर्गीय नगरपरिषदांना सहायक अनुदान :

शासन निर्णय, क्रमांक गौखनि-१०९९/प्र. क्र. २०५/ख, दिनांक ११ जुलै, २००० अन्वये राज्यातील ' क ' वर्ग नगरपरिषद क्षेत्रातून वसूल झालेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाचे संदर्भातील महसुलाबाबत अनुदानाची १ लाखाची मर्यादा रुपये ५ लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे.

५. नगरपरिषदांना करमणूक कर शुल्काच्या अभिहस्तांकित रकमा देणे :

करमणूक करावरील मिळणारे अनुदान सन १९७५-१९७६ पासून सर्व महानगरपालिका व सर्व नगरपरिषदांना त्यांचे हद्दीत मागील वर्षी वसूल झालेल्या करमणूक करापैकी शासन निर्णय क्रमांक एमयूएन-११७५/३०१३५ (१)/एमयूएन-२, दिनांक १ ऑगस्ट, १९७५ पासून खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते :—

'अ' वर्ग नगरपरिषदा . . ५० टक्के
'ब' वर्ग नगरपरिषदा . . ७० टक्के
'क' वर्ग नगरपरिषदा . . ९० टक्के

६. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय नागरी कार्यसंस्थेस सहायक अनुदान व सदस्यत्व फी :—

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था भारत सरकारचे प्रशिक्षण केंद्र ही संस्था चालविते. कन्व्हेन्सड लोकल गव्हर्नमेंट डिप्लोमा शिक्षणक्रम चालविण्याबद्दल शासनाकडून दरवर्षी रुपये १०,००० शैक्षणिक अनुदान दिले जाते.

७. महाबळेश्वर रस्ता अनुदान :–

नगरपालिकेच्या सीमाबाहेरील विवक्षित रस्त्यांची व पुलांची व्यवस्था ठेवण्यासाठी महाबळेश्वर नगरपालिकेस दरवर्षी रु. १०,००० अनुदान देण्यात येते.

८. कटक मंडळे अनुदाने :

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोकऱ्यांवरील कर अधिनियम १९७५ (व्यवसाय कर कायदा) च्या कलम २९ नुसार कराच्या नुकसान भरपाई म्हणून राज्यातील पुणे, खडकी, देहू, छ. संभाजीनगर, अहमदनगर व कामटी या कटक मंडळांना अनुदान वितरित करण्यात येते.

९. यात्राकर रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना नुकसानभरपाई :

शासन निर्णय, नगरविकास व आरोग्य विभाग क्रमांक जीएनटी-१४७७/१८२०/नवि-१०, दिनांक १ जानेवारी १९७८ अन्वये यात्राकर सन १९७७-१९७८ पासून बंद करण्यात आलेला आहे. नगरपरिषदांना सन १९७७-१९७८ पर्यंत ज्या ज्या शहरात येणाऱ्या यात्रेकरूंकडून यात्राकर वसूल करता येत होता, दिनांक १२ मे १९७८ रोजी राज्य शासनाने यात्रा कर वसूल न करता त्या ऐवजी या नगरपरिषदांनी आधीच्या तीन वर्षांत सरासरी जो यात्रा कर वसूल केला असेल त्याच्या ७५ टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. शासन, नगरविकास विभाग, क्रमांक जीएनटी-३०८७/सीआर ६८/८९/नवि-१६, दिनांक ४ नोव्हेंबर १९८९ अन्वये सन १९८९-९० पासून पूर्वी देण्यात येत असलेल्या अनुदानात तिप्पटीने वाढ करण्यात आली आहे. दिनांक ४ ऑगस्ट २००४ रोजी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार त्रिंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर व रामटेक या सहा नगरपरिषदांना पुढीलप्रमाणे अनुदानात वाढ करण्यात आली आहे :—

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	पूर्वीची रक्कम	वाढीनंतरची रक्कम
१.	त्रिंबक	२,३३,७८८	१०,००,०००
२.	आळंदी	२,०३,७६६	१०,००,०००
३.	जेजुरी	१,७६,२१५	१०,००,०००
४.	पंढरपूर	२५,००,०००	५०,००,०००
५.	तुळजापूर	१,७०,६४६	५०,००,०००
६.	रामटेक	६१,२९९	५,००,०००
	एकूण . .	**३३,३५,७६४**	**१,३५,००,०००**

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक याकअ-१००६/प्र. क्र. ३४/

नवि-१६, दिनांक २९ मार्च २००७ अन्वये पंढरपूर नगरपरिषदेस देण्यात येत असलेल्या यात्राकर अनुदानात रुपये ५०,००,००० वरून रुपये १,००,००,००० इतकी वाढ मंजूर करण्यात आली आहे. तसेच नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईएन-२००७/प्र. क्र. १०९/नवि-१६, दिनांक १७ डिसेंबर २००७ अन्वये पैठण नगरपरिषदेस रुपये १६,५०,००० इतके यात्राकर अनुदान मंजूर झाले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षापासून शासन निर्णय क्रमांक याकअ-२०११/प्र. क्र. १३८/२०११/नवि-१६, दिनांक ६ जुलै, २०११ अन्वये वरील ७ नगरपरिषदांच्या अनुदानात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे :—

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	पूर्वीची रक्कम	वाढीनंतरची रक्कम
१.	त्रिंबक	१०,००,०००	५०,००,०००
२.	आळंदी	१०,००,०००	६५,००,०००
३.	जेजुरी	१०,००,०००	७५,००,०००
४.	पंढरपूर	१,००,००,०००	२,००,००,०००
५.	तुळजापूर	५०,००,०००	१,५०,००,०००
६.	रामटेक	५,००,०००	२५,००,०००
७.	पैठण	१६,५०,०००	५०,००,०००
	एकूण . .	**२,०१,५०,०००**	**६,१५,००,०००**

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षापासून शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र. क्र. १७४/नवि-१६, दिनांक ३ ऑक्टोबर २०१६ अन्वये वरील ७ नगरपरिषदांच्या अनुदानात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे :—

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	यापूर्वी अनुज्ञेय यात्राकर अनुदान रक्कम (रुपये)	सुधारित यात्राकर अनुदान रक्कम (रुपये)
१.	त्रिंबक	५०,००,०००	१,२५,००,०००
२.	आळंदी	६५,००,०००	१,६२,५०,०००
३.	जेजुरी	७५,००,०००	१,८७,५०,०००
४.	पंढरपूर	२,००,००,०००	५,००,००,०००
५.	तुळजापूर	१,५०,००,०००	३,७५,००,०००
६.	रामटेक	२५,००,०००	६२,५०,०००
७.	पैठण	५०,००,०००	१,२५,००,०००
	एकूण . .	**६,१५,००,०००**	**१५,३७,५०,०००**

१०. नगर विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे :—

राज्यात वेगाने विस्तारित होत असलेल्या नागरी भागाचे योग्य नियोजन व विकासाचे कामकाज पाहणाऱ्या नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कार्यालय व क्षेत्रिय कार्यालयाच्या इमारती, प्रशिक्षण संस्था, निवासी संकुल इत्यादी शासकीय इमारतींची मोठी बांधकामे तसेच लहान बांधकामे हाती घेण्याकरीता नगर विकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे या नवीन योजनेस मंजुरी देण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत नगरविकास संकुलाचे बांधकाम हाती घेण्यात येणार असून त्यामध्ये नगरविकास विभागाच्या (नगररचना विभागासह) सर्व क्षेत्रीय यंत्रणांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र तसेच, प्रशिक्षणार्थी व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधींसाठी निवास व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

११. नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांच्या वेतनावरील खर्च :—

पहिल्या वित्त आयोगाच्या शिरफारशीनुसार सर्व ‘ क ’ वर्ग नगरपरिषदांना मुख्याधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च नगरपरिषदांना देण्याचा निर्णय झालेला आहे. तसेच राज्यामधील कोकण, नाशिक, पुणे, छ. संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडून त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या रजा राखीव मुख्याधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च भागविण्यासाठी अनुदान दिले जाते.

१२. १५वा वित्त आयोग :

सन २०२०-२१ या वर्षापासून १५वा वित्त आयोग लागु झालेला आहे. १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना Million Plus Cities व Non-Million Plus Cities यासाठी स्वतंत्र निधी मंजूर करण्यात येणार आहे. Million Plus Cities अंतर्गत राज्यातील पुढील महानगरपालिका/Urban Agglomeration यांचा समावेश आहे. बृहन्मुंबई (Greater Mumbai Agglomeration), पुणे (Pune Agglomeration) नागपूर (Nagpur Agglomeration) नाशिक (Nashik Agglomeration) औरंगाबाद (Aurangabad Agglomeration) वसई-विरार शहर या नागरी समूहाचा समावेश करण्यात आलेला आहे. इतर सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश Non-Million Plus Cities गटात करण्यात आलेला आहे. सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठी रु. ११,६११ कोटी इतका निधी चिन्हांकित करण्यात आलेला आहे.

१३. वस्तू व सेवाकर भरपाई :

केंद्र शासनाने अधिसूचित केल्यानुसार संपूर्ण देशात वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी दिनांक १ जुलै २०१७ पासून सुरू झाली आहे. भारताच्या संविधानाच्या राज्यसूचीच्या सूची-दोन मधील नोंद क्र. ५२ वगळण्यात आल्यामुळे प्रवेश कर, जकात कर, स्थानिक संस्था कर, उपकर बंद करण्यात आले असल्याने स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७ प्रसिद्ध करण्यात आला आहे. वस्तू व सेवा कर प्रणाली लागू केल्यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नांमध्ये येणारी तूट भरून काढण्यासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येते.

(क) इतर महत्त्वाचे निर्णय व कार्यक्रम—

(१) गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१

(२) अधिनियमातील महत्त्वाच्या सुधारणा

(३) नागरी संस्थांमध्ये दुहेरी लेखा पद्धती

(४) महाराष्ट्र नागरी मूलभूत सुविधा निधी (MUIF)

(५) महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे ध्येय.

१. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियत्रंण) अधिनियम, २००१ :

अधिनियमात सुधारणा

व्याख्या—अतिक्रमणाखाली जमिन वगळून खाजगी मालकीच्या जमिनीची, तसेच नागरी (कमाल मर्यादा व विनियमन), १९७६ याखालील राज्य शासनाकडे विहिती नसलेल्या अतिरिक्त रिकाम्या जमिनीसह, अशा भूखंडावरील इमारतीसह जमिनीची अनधिकृतपणे पोटविभागणी करून तयार केलेले भूखंड.

पार्श्वभूमी—खाजगी जमिनींची अनधिकृतपणे पोटविभागणी करून भूखंड तयार करणे आणि निवासी गाळ्यांचे बांधकाम करण्याकरिता ते गरजू व्यक्तींकडे हस्तांतरित करणे ही प्रवृत्ती वाढीस लागली होती. जरी गुंठेवारी विकास बेकायदेशीर असला आणि अशा विकासास पायबंद घालणे अत्यंत गरजेच आहे असे असले तरी त्याचवेळी अशा भूखंडावर मोठ्या प्रमाणात असलेली जुनी व दीर्घकालीन अस्तित्त्वात असलेली बांधकामे पाडून टाकणे व्यवहार्य नाही किंवा इष्टही नाही. औपचारिक गृहनिर्माण बाजारपेठ दर्जा व किंमत या दोन्ही बाबतीत समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करण्यास अपयशी ठरल्यामुळे अशा गोष्टी घडतात. गुंठेवारी विकास हा अनौपचारिक गृहनिर्माणाचा प्रकार असून तो सदोष आणि अपूर्ण असला तरी सामान्य लोकांना त्यांच्या निवाऱ्याच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने पाहिले गेले आणि महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मंजूर होवून दिनांक ३० एप्रिल २००१ पासून अंमलात आणला गेला.

अधिनियमाची व्याप्ती—मुंबई महानगर प्रदेश, अनुसूचित क्षेत्रे, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभाग, गिरीस्थाने, विशेष पर्यटन क्षेत्रे वगळता दिनांक १ जानेवारी २००१ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेला गुंठेवारी विकास या अधिनियमान्वये नियमितीकरण्यासाठी पात्र असेल.

अधिनियमाची अंमलबजावणी—अधिनियमातील तरतूदीनुसार गुंठेवारी अंतर्गत झालेला विकास नियमित करण्याची कार्यवाही संबंधीत **नियोजन प्राधिकरणे** (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती) व जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त व नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात मुख्याधिकारी आणि इतर क्षेत्रात जिल्हाधिकारी यांच्यावर या अधिनियमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे.

अधिनियमात सुधारणा करण्याची आवश्यकता :

(१) सदर अधिनियमाची अंमलबजावणी राज्याच्या काही भागात परिणामकारकरित्या झालेली नाही. बरेच भूखंडधारक या लाभापासून वंचित आहे.

(२) आर्थिक दुर्बल घटक व सामान्य लोकांच्या निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करणे हा सकारात्मक दृष्टीकोण ठेवून सदर बदल करण्यात आला आहे.

(३) गुंठेवारी नियमितीकरणाअभावी अल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटातील लोकांना शासकीय योजनांचे लाभ घेण्यावर मर्यादा येत आहेत. त्यामुळे या गटातील लोकांची मागणी विचारात घेता सदर बदल करण्यात आला आहे.

(४) दिनांक १ जानेवारी २००१ नंतरही गुंठेवारी पद्धतीचा विकास झालेला असून सदर विकास हा अधिनियमातील उपरोक्त तरतुदीमुळे नियमानुकूल होऊ शकलेला नाही. त्यामुळे सदर विकास हा अनधिकृत स्वरूपाचा ठरत आहे.

(५) या भूखंडांना सार्वजनिक सुविधा देण्यास नियोजन प्राधिकरणास अडचणी येत असल्याने त्यानुषंगाने गुंठेवारी विकास नियमितीकरणाबाबतचा दिनांक वाढविण्याबाबतची मागणी सातत्याने नियोजन प्राधिकरणांकडून शासनास करण्यात येत होती.

मंत्रिमंडळ निर्णय—उपरोक्त वस्तुस्थिती तसेच नियोजन प्राधिकरणांची विनंती विचारात घेऊन बुधवार, दिनांक ६ जानेवारी २०२१ च्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील कलम ३ (१) व त्याच्या परंतुकामध्ये सुधारणा करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळाली. त्यानुसार गुंठवारी विकास नियमित करणेबाबतचा पायाभूत दिनांक १ जानेवारी २०२१ ऐवजी तो दिनांक ३१ डिसेंबर २०२० अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

अधिनियमात सुधारणा—'महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१' अधिनियमातील कलम ३ (१) व त्याच्या परंतुकामध्ये नमूद दिनांकात १ जानेवारी २००१ ऐवजी **दिनांक ३१ डिसेंबर २०२०** अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर सुधारणा **दिनांक १२ मार्च २०२०** पासून अंमलात आलेली आहे.

'महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१' मधील कलम ३ (३) नुसार गुंठेवारी विकास नियमित करताना आकारावयाचे विकास शुल्क आणि प्रशमन शुल्क निश्चित करण्यात आले असून याबाबतचे आदेश **दिनांक १८ ऑक्टोबर २०२१** रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२. अधिनियमातील महत्त्वाच्या सुधारणा :

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, यांचा कारभार मुख्यत्वे खालील नमूद केलेल्या अधिनियमांनुसार चालतो.

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी (Double entry system on Accrual Basis) :

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने दिनांक ६ जुलै, २००५ रोजी शासन निर्णय काढला असून सर्व महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिकेमध्ये दिनांक १ एप्रिल, २००५ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे. तसेच "ब" व "क" वर्ग नगरपालिकांमध्ये सन २००६-०७ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे.

या लेखा पद्धतीची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी व समन्वय नियंत्रण ठेवण्यासाठी समन्वय संस्था (Nodal Agency) म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांची नियुक्ती केली आहे.

सदर पद्धतीची अंमलबजावणीकरिता तांत्रिक सहाय्य व इतर आवश्यक मदत करण्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयांतर्गत लेखा सुधारणा कक्षाची स्थापना केली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार विनिर्दिष्ट नियम पुस्तिका तयार करणे

नगरपालिका/महानगरपालिका कायद्यात आवश्यक त्या सुधारणा सुचविणे इत्यादीसाठी मा. प्रधान सचिव (नवि) यांचे अध्यक्षतेखाली कर्णधार समिती (Steering Committee) गठीत करण्यात आली असून समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे निश्चित केली आहे :—

(१) राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता मान्य करणे.

(२) दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणी संदर्भात दुहेरी लेखा कक्षाकडून प्रस्तावित केलेल्या/करण्यात येणाऱ्या सुधारणांबाबत निर्णय घेणे.

(३) राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांच्या दुहेरी लेखा नोंदपद्धत अंमलबजावणी कामकाजाचा आढावा घेणे.

कार्यक्रमाची ठरविलेली उद्दिष्टे —

* राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये नगरपरिषद स्तरावर नेमण्यात आलेल्या सनदी लेखापालाकडून दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी करणे.

* २८ महानगरपालिकांमध्ये उपार्जित तत्त्वावरील दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणी कामाचे संनियंत्रण करणे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार करण्याचे काम नगरपरिषद प्रशासन संचालनालयाअंतर्गत कार्यरत लेखा सुधारणा कक्षातर्फे हाती घेण्यात आले. राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार करण्यासाठी संचालनालयाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक केली. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहितेचे प्रारूप तयार केले व ते कर्णधार समितीने मान्य केले असून दिनांक २३ जानेवारी २०१३ च्या अधिसूचनेनुसार राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर लेखासंहिता दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ पासून लागू करण्यात आली आहे.

४. महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधी (MUIF) :

महाराष्ट्र नागरी लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परंतु नागरी सुविधांचा विकास मात्र त्याच वेगाने होऊ शकलेला नाही. नागरी भागातील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी निधीची एकंदर उपलब्धता ही मोठी अडचण नसून बहुतांशी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे प्रकल्प तयार करण्याचे आणि वित्तिय संस्था व भांडवली बाजारातून निधी उभा करण्यासाठी लागणारे कौशल्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जरी अधिक भांडवली गुंतवणूक मिळविण्याची संभाव्य क्षमता असली तरी उत्पन्नात वाढ आणि सुविधा पुरविण्यातील कार्यक्षमता यामध्ये सुधारणा करण्याची त्यांची क्षमता मर्यादित आहे. त्यांच्या अडचणीवर मात करण्यासाठी आणि त्यांच्या भांडवली गुंतवणूक क्षमतेचा विकास करण्यासाठी व प्रोत्साहन देण्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्त्वात नव्हती. अशी यंत्रणा उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधी (MUIF) नावाची एक स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्यानुसार महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधी (MUIF) मध्ये एक विश्वस्थ निधी (Trust Fund) व महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. नावाची एक विश्वस्थ कंपनी (Trustee Company) व महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लि. नावाची एक मत्ता व्यवस्थापन कंपनी (Asset Management Company) यांचा समावेश आहे."

५. महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे ध्येय—

सार्वजनिक, खाजगी व सामूहिक क्षेत्रातील सहभागाद्वारे राज्यातील नागरी क्षेत्रात पुरेशा, कार्यक्षेम, परवडण्याजोगा, आधुनिक आणि कायमस्वरूपी अशा नागरी मूलभूत सुविधांच्या विकासासाठी सहाय्य करणे.

महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीची उद्दिष्टे —

(अ) वित्तीय सहाय्यासाठी योग्य अशा प्रकल्पांच्या निर्मितीद्वारे नागरी मूलभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढविण्यासाठी भांडवली बाजारातून निधी उपलब्ध करण्यास आणि वित्तीय संस्थांकडून प्रत्यक्ष निधी मिळविण्यास सहाय्य करणे.

(आ) योग्य अशा पतवृद्धी उपाययोजनांद्वारे (Credit Enhancement) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राप्त करावयाच्या भांडवलाचा व्याजदर कमी करण्यास मदत करणे.

(इ) नागरीक हा केंद्रबिंदू मानून नागरी सेवांचा पुरवठा व त्यासाठीचे वित्त सहाय्य यामधील खाजगी व सामूहिक क्षेत्रांच्या सहभागास उत्तेजन देणे.

(ई) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पत क्षमतेमध्ये सुधारणा करणे.

(उ) क्षमतेच्या विकास, प्रात्यक्षिक उपाययोजना आणि धोरणविषयक सुधारणा यांच्याद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांत्मक सुधारणा करणे आणि त्या टिकवून ठेवणे.

अग्निसंरक्षण

Fire Adviser

महाराष्ट्र अग्मिशमन सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई

कार्यक्रम अंदाजपत्रक २०२६-२०२७

आगी लागण्याचे प्रसंग टाळावेत व आग लागल्यावर ती ताबडतोब विझविण्यासाठी व्यवस्था असावी म्हणून प्रत्येक विकसनशील देश अग्निशमन सेवा संघटीत करतो.

२. महाराष्ट्र राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा उपलब्ध नाहीत आणि अग्निशमनाचे काम प्रामुख्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे उदा.महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ, सिडको, इ. मार्फत केले जाते. एम.आय.डि.सी. व सिडको यांची स्वत:ची अग्निशमन सेवा आहे. राज्यात आता सुमारे १५० पेक्षा जास्त नवीन नगरपरिषदा/नगर पंचायती नव्याने निर्माण करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका/नगरपरिषदा यांचेकडे अग्निशमन सेवा आहेत/नाहीत त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :–

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	एकूण	अग्निशमन सेवा	
			आहेत	नाहीत
१	अ+वर्ग महानगरपालिका	०१	०१	००
२	अ-वर्ग महानगरपालिका	०२	०२	००
३	ब-वर्ग महानगरपालिका	०३	०३	००
४	क-वर्ग महानगरपालिका	०४	०४	००
५	ड-वर्ग महानगरपालिका	१९	१९	००
६	अ-वर्ग नगरपरिषदा	१५	१५	००
७	ब-वर्ग नगरपरिषदा	७५	७१	०४
८	क-वर्ग नगरपरिषदा	१५४	१४०	१४
९	नगरपंचायती	१४५	४३	१०२
	एकूण . .	**४१८**	**२९८**	**१२०**

३. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दि. ६.१२.२००८ पासून लागू झाला आहे. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९, दि.२३.०६.२००९ पासून अंमलात आले आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम, २००९ लागू झाल्याने अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांची नियुक्ती केली आहे. सदर अधिनियम व नियमामध्ये अनुक्रमे सन २०२४ व २०२५ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

४. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार कौन्सिलच्या शिफारशीनुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या अग्निशनम सेवेतील त्रुटींचा आढावा या कार्यालयाने घेतला असून त्यानुसार काही महानगरपालिका वगळता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन सेवेत मोठी तूट आहे. म्हणून ही तूट भरुन काढण्यासाठी शासनाने शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१.०८.२००९ नुसार **"महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान"** राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

५. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत शासन हिस्सा व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचा हिस्सा याबाबतचा वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे सुधारीत करण्यास शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र. अशसे-२०१९/प्र.क्र.६१/नवि-०४, दि.१२ मार्च,२०२१ आणि शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशसे-२०२३/प्र.क्र.८९/नवि-०४, दि. १ डिसेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच नागरी स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन सेवेतील जी अग्निशमन वाहने १० वर्षांपूर्वीची आहेत किंवा ज्या अग्निशमन वाहनांचा ५००० तास ऑपरेशनल वापर झालेला आहे अशी अग्निशमन वाहने विहित पध्दत अवलंबून निकामी करुन या अग्निशमन वाहनांच्या बदल्यात नवीन अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत शासन अनुदान देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय अनुदान उपलब्ध करून देण्याचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे :—

अ. क्र.	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था	शासन अनुदानाची टक्केवारी	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हिश्श्याची टक्केवारी
१	महानगरपालिका-ड वर्ग	७० %	३० %
२	नगरपरिषदा-अ वर्ग	८० %	२० %
३	नगरपरिषदा-ब वर्ग	९० %	१० %
४	नगरपरिषदा-क वर्ग	९० %	१० %
५	नगर पंचायती	९० %	१० %

६. ज्या "ड" वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतींकडून परिपूर्ण सविस्तर प्रकल्प प्राप्त होऊन मंजूर झाले आहेत अशा "ड" वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतीसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानामध्ये सन २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०, २०२१-२०२२, २०२२-२०२३ तसेच २०२३-२०२४ या मागील १० वर्षात मंडळनिहाय खालीलप्रमाणे शासन अनुदान वितरित करण्यात आले आहे :-

(रुपये लाखात)

अ. क्र.	वर्ष	मराठवाडा विकास मंडळ	विदर्भ विकास मंडळ	उर्वरित महाराष्ट्र मंडळ	एकूण वितरित अनुदान
१	२०१५-१६	००.००	७३.५०	६६.५०	१४०.००
२	२०१६-१७	६४.००	००.००	६४.००	१२८.००
३	२०१७-१८	००.००	००.००	६४.००	६४.००
४	२०१८-१९	२५६.००	४७२.५०	३९८.२५	११२६.७५
५	२०१९-२०	००.००	००.००	३२.००	३२.००
६	२०२०-२१	००.००	००.००	००.००	००.००
७	२०२१-२२	००.००	१३९.५०	४८८.५०	६२८.००
८	२०२२-२३	५३८.००	२७९.००	७८३.१०	१६००.१०
९	२०२३-२४	३४२.००	२६१.००	१६५६.००	२२५९.००
१०	२०२४-२५	००.००	६८०.००	२४७६.२२	३१५६.२२
	एकूण	**१२००.००**	**१९०५.५०**	**६०२८.५७**	**९१३४.०७**

७. सुमारे १५० पेक्षा जास्त नगरपरिषदा/नगर पंचायती नव्याने निर्माण झालेल्या आहेत. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.संकिर्ण-२०१६/ प्र.क्र.२७/नवि-२०, दि. १२ ऑगस्ट, २०१६ (प्रत सोबत जोडली आहे) अन्वये राज्यात नव्याने निर्माण झालेल्या/होणाऱ्या "ड" वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीमधील अग्निशमन सेवेची तूट भरुन काढण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान या योजनेत समावेश करण्यात मंजूरी दिलेली असून त्यांचा समावेश सन २०२४-२५ च्या वार्षिक योजनेमध्ये समावेश केला आहे. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.अशसे-२०१९/ प्र.क्र.६१/नवि-०४, दि. १२ मार्च, २०२१ आणि शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.अशसे-२०२३/प्र.क्र. ८९ /नवि-०४, दि. १ डिसेंबर, २०२३ (प्रत सोबत जोडली आहे) अन्वये महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत अग्निशमन केंद्र बांधणी व अग्निशमन वाहनाच्या खरेदीसाठी अनुज्ञेय खर्चाची सुधारित मर्यादा व सुधारित वित्तीय आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजनेमध्ये अनुज्ञेय अनुदानाची रक्कम सुधारित करण्यात आलेली आहे. त्यामुळे ही योजना एकूण रु.६४३.१० कोटीची झाली असून अनुज्ञेय खर्चाची सुधारित मर्यादा व सुधारित वित्तीय आकृतीबंधानुसार शासनाचा हिस्सा एकूण रु.५५४.४५ कोटी इतका आहे व ड-वर्ग महानगरपालिका/ नगरपरिषदां/नगरपंचायतींचा एकूण हिस्सा रु.९८.६५ कोटी इतका आहे. आतापर्यंत अकादमी तसेच ड-वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती रु. २०४.१० कोटीचे वितरण झालेले असून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उर्वरित ड-वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदां/ नगरपंचायतींकरीता अजून **रु. ३४०.३५ कोटी** शासन अनुदानाची तरतूद करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

८. या योजनेसाठी सन २०२५-२०२६ साठी मंजूर होणारे शासन अनुदान "ड" वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा तसेच नगरपंचायती यांचेकडून प्राप्त होणारे प्रस्ताव शासनास सादर करून शासन मान्यतेने वापरले जाणार आहे. विकास मंडळनिहाय सन २०२६-२७ साठी मागणी केलेले अनुदान खालीलप्रमाणे आहे :-

(रुपये कोटीत)

अ. क्र.	वर्ष	मराठवाडा विकास मंडळ	विदर्भ विकास मंडळ	उर्वरित महाराष्ट्र मंडळ	एकूण मागणी केलेल अनुदान
१	२०२६-२७	४५.४४	११५.५४	१७९.३७	**३४०.३५**

९. देशातील अग्निशमन सेवांच्या विस्तार आणि अत्याधुनिकीकरण करण्यासाठी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या (XV-FC) शिफारशींवर आधारित राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) अंतर्गत सज्जता आणि क्षमता निर्माण निधी खिडकीच्या नियोजित वाटपातून राज्यांमध्ये अग्निशमन सेवांच्या विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी सन २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षे कालावधीकरिता एकूण रु.६१५.४८ कोटी अनुदानाची तरतूद करण्यात आलेली आहे. यापैकी केंद्र शासनाचा हिस्सा ७५% म्हणजेच रु.४६१.६१ कोटी असून आणि राज्य शासनाचा हिस्सा २५% म्हणजेच रु.१५३.८७ कोटी असेल. सदर योजना आता २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यात येणार आहे. सदर योजनेस शासनाने मान्यता दिलेली असून ही योजना शासन निर्णय, न. वि. वि. दिनांक १९.६.२०२५ अन्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत राबविण्यात येणार आहे.

१०. विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८ येथील राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राच्या जागी **महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी** प्रस्थापित करण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता देवून हे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे डिपॉझिट कॉन्ट्रीब्यूशन तत्वावर पूर्ण केले असून ही अकादमी कार्यान्वित झालेली आहे.

११. आपत्कालीन व्यवस्थापनात अग्निशमन सेवा हा महत्त्वाचा व अविभाज्य भाग आहे. नैसर्गिक आपत्ती, रासायनिक आगी, उंच इमारतीच्या आगी, रेल्वे दुर्घटना, विमान अपघात अशाप्रकारच्या दुर्घटनेत अग्निशमन व विमोचनाचे कार्य कसे करावे याबाबत कॉम्प्रेस्ड एअर ब्रिथिंग ॲपरेट्स व ट्रेनिंग गॅलरी, यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे तसेच अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रगत आंतरराष्ट्रीय शहरातील अग्निशमन अकादमीच्या धर्तीवर हॉट फायर ड्रिल, सिम्युलेटर, रेस्क्यू ऑपरेशन इत्यादि सुविधांचे प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. परंतु **प्रगत अग्निशमन अकादमी** प्रस्थापित करण्यासाठी किमान ५० एकर जमीन मुंबईच्या जवळपास असणे गरजेचे आहे. मुंबईच्या जवळपास ५० एकर जागा मिळविण्याचा प्रयत्न सुरु आहे. या कामासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत रु.५०.०० कोटींचे नियतव्यय मंजूर झाले आहे.

१२. सन २००४ मध्ये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा-गट-अ या पदाची निर्मिती करुन दि.०१.०७.२००५ पासून या पदावर नियमितपणे नेमणूक करण्यात आली आहे. सध्या या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२४४/ नवि-२०, दि.३०.०७.२०१६ अन्वये महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी या कार्यालयासाठी अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या ऐवजी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. त्यानुसार लेखाशिर्षामध्ये आवश्यक ते बदल करण्यात आलेले आहेत.

(१) तांत्रिक माहितीचे संनियंत्रण :—

संगणकीकृत नियोजन प्रक्रिया साध्य करण्याकरिता, Digital Planning Cell मध्ये मुख्यत्वे माहितीचे संनियंत्रण (information Management), निर्णय घेण्यास सहायक प्रणाली- Decision Support System (DSS), भूनियोजन साहाय्यक प्रणाली Support System (SPSS), शहर माहिती मॉडेल - City Information Models (CIM) अशा व Spatial Planning इतर नगर नियोजन संबंधित तंत्रज्ञान यांचा समावेश अभिप्रेत आहे. सदर संनियंत्रणामध्ये मुख्यत्वे Geographic Information Systems (GIS), Remote Sensing (RS), Multifunctional २d/३d Visualization platforms, Business Intelligence (BI) and Multi- dimensional Analysis अशा संगणक प्रणालींचा वापर करून विविध माहिती (data) प्रदर्शन व आच्छादन होते.

(२) ऑनलाईन सुविधा :—

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या विविध कलमान्वये तयार व प्रसिध्द केलेल्या तसेच मंजूर केलेल्या प्रादेशिक योजना नकाशे, विकास योजना नकाशे, नगररचना योजना नकाशे यामध्ये अंतर्भूत असलेल्या जमिनीचा नियोजीत वापर दर्शविणारे भाग नकाशे, जमीन वापराचे दाखले हे जनतेस योग्य ते शुल्क आकारून उपलब्ध करून देण्याविषयी तरतुदी आहेत. भाग नकाशे घेण्याकरिता नागरीकांना सद्यस्थितीत सबंधित नियोजन प्राधिकरणाच्या अथवा स्थानिक नगररचना कार्यालयाकडे यावे लागत होते. तसेच अर्ज दिल्यानंतर ७ ते १५ दिवस एवढा कालावधी लागत आहे.

आता, प्रादेशिक योजनेचे भाग नकाशे ऑनलाईन अर्ज करून व योग्य त्या शुल्काचा भरणा करुन मिळविणे शक्य व्हावे, याकरिता ऑनलाईन संगणक प्रणाली कार्यान्वित झाली आहे. सदर संगणक प्रणालीद्वारे भाग नकाशे व विभाग दाखले जनतेस तात्काळ उपलब्ध होत आहेत. सदर सेवांकरिता दर आकारण्यात येणार असून, त्यातून विभागास महसूल निर्माण होणार आहे.

DPC च्या माध्यमातून जनतेस ऑनलाईन Part Plans देणे, झोन दाखले देणे, Scrutiny Fees for Technical Modules इ. प्रणाली टप्पा-टप्प्याने विकसित करून व अद्ययावत ठेऊन त्यांचे संनियंत्रण करण्यात येणार आहे. सदर सेवांकरिता योग्य ते शुल्क आकारण्यात येणार असून, त्यातून विभागास महसूल निर्माण होणार आहे.

(३) Geo-Spatial Database व पोर्टल :—

संगणकीकृत नियोजन कक्ष (DPC) च्या माध्यमातून सर्व Stakeholders करिता, म्हणजेच सामान्य जनता / ग्राहक, विभागातील अधिकारी, राज्य शासनाचे इतर विभाग इ. करिता एकच Geo-Spatial Database व पोर्टल तयार करण्यात येईल, ज्यावर GIS प्रणालीमध्ये विकास योजना, प्रादेशिक योजना तसेच त्याचेशी संबंधित राज्य शासनाच्या इतर विभागांची सर्व प्रकारची माहिती एकाच पोर्टलवर उपलब्ध होईल. त्यातून System Generated Analyses तसेच Specialized नकाशे, जमिनीसंबंधी ठराविक मुद्यांबाबतची नकाशा सहित माहिती इ. इतर Stakeholders यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(४) विकास परवानगीसाठी विकसित करण्यात आलेल्या प्रणालीचे BPMS संनियंत्रण :—

केंद्र शासनाच्या इज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत राज्य सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती, महानगरपालिका व इतर संबंधित विशेष नियोजन प्राधिकरणे यांचेकडील इमारतींच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विविध परवानगी प्रकरणात एकसूत्रता आणली आहे. यासाठी एक ऑनलाईन प्रणाली व या प्रयोजनासाठी संकेतस्थळ (Building Plan Management System) तयार करण्यात आलेले आहे. BPMS संगणक प्रणालीमध्ये विकास/ बांधकाम परवानगी प्रकरणी घ्यावयाच्या निर्णयामध्ये गती येण्याच्या दृष्टीने व प्रलंबित Online Tickets चे निराकरण तातडीने करण्यासाठी संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. BPMS/TICKET PENDING/टिपीव्ही - ७/४१५६, दि. २१/०८/२०२३ अन्वये BPMS CONTROL TEAM नेमणूक करून या कार्यालयास प्राधिकृत केलेले आहे. त्यानुसार संगणकीकृत नियोजन कक्ष (Digital Planning Cell) कार्यालयाच्या स्तरावर कामकाज प्रगतीपथावर आहे. तसेच, BPMS संगणक प्रणालीचे शासनाच्या इतर ऑनलाईन संगणक प्रणालींसोबत एकत्रिकरण (Integration) करणेच्या अनुषंगाने विविध शासकीय विभाग यांचेशी समन्वय साधण्याचे प्रगतीपथावर आहे.

(५) इतर तांत्रिक कामे :—

UDCPR मधील Appendix C अंतर्गत C-3 Engineer, C-4 Structural Engineer, C-5 Supervisor, C-6 Town Planner यांना नगररचना संचालनालयाच्या स्तरावरील राज्यस्तरीय परवाना निर्गमित करणे व त्याची नोंदणी करणे यासाठीची आवश्यक सर्व कार्यवाही करण्यासाठी संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. UDCPR/Appendix-C/ परवाना/२२६९, दि.१९.०५.२०२३ अन्वये या कार्यालयास प्राधिकृत केलेले आहे. त्या अनुषंगाने सदरची कार्यवाही संगणकीकृत नियोजन कक्ष कार्यालयामार्फत करणेत येत आहे.

(६) लहान व मध्यम शहरांची एकात्मिक शहर विकास योजना पूर्णत्व अहवालाबाबतची प्रलंबित विनियोग प्रमाणपत्राबाबतची माहिती :—

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक शहर विकास योजना (IDSMT Scheme) सन १९७९- ८० पासून अंमलात आली असून, राज्यातील १३४ शहरांना १७८ योजना लागू करण्यात आल्या आहेत. त्यापैकी २९ योजनांचे पुर्णत्व अहवाल शासनास सादर करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने दि. ३१.०३.२००५ पासून सदर योजना बंद करून Urban Infrastructure Development Scheme for small and Medium Towns (UIDSSMT) ही नवीन योजना सुरू केलेली आहे. दि.२२/०८/२००७ रोजीचे पत्रान्वये प्रलंबित योजनांना केंद्राचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार नसलेचे चीफ प्लॅनर TCPO, नवी दिल्ली यांनी कळविले आहे. त्यानुसार शासनाच्या नगरविकास विभाग कडील दि.१९/०८/२०१९ रोजीचे परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार प्रलंबित एकात्मिक शहर विकास योजना पुर्णत्वास नेणे, अखर्चीत निधी खर्च करणे / वसूल करणे, विनीयोग प्रमाणपत्रे / प्रकल्प पुर्णत्व अहवाल सादर करणे इत्यादी बाबतची कार्यवाही संगणकीकृत नियोजन कक्ष (Digital Planning Cell) कार्यालयामार्फत करणेत येत आहे. त्या बाबतचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे. (सोबत सविस्तर विवरणपत्र “अ” व “ब” जोडलेले आहे) :—

अ.क्र.	विभाग	विनियोग प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या नगरपरिषदा	पूर्णत्व अहवाल प्रलंबित असलेल्या नगरपरिषदा
(१)	(२)	(३)	(४)
१	पुणे	एकूण म.न.पा./न.प.-४ एकूण प्रलंबित वि.प्र.-९	एकूण न. प. -११ एकूण प्रलंबित पूर्णत्व अहवाल-११
२	कोकण	एकूण न.प.-७ एकूण प्रलंबित वि.प्र.-१८	एकूण न. प. -८ एकूण प्रलंबित पूर्णत्व अहवाल-८
३	नाशिक	एकूण न.प.-७ एकूण प्रलंबित वि.प्र.-९	एकूण न. प. -१४ एकूण प्रलंबित पूर्णत्व अहवाल-१४
४	औरंगाबाद	एकूण न.प.-१२ एकूण प्रलंबित वि.प्र.-१३	एकूण न. प. -१५ एकूण प्रलंबित पूर्णत्व अहवाल-१५
५	अमरावती	एकूण न.प.-१३ एकूण प्रलंबित वि.प्र.-२२	एकूण न. प. -१२ एकूण प्रलंबित पूर्णत्व अहवाल-१२
६	नागपूर	एकूण न.प.-११ एकूण प्रलंबित वि.प्र.-११	एकूण न. प. -४ एकूण प्रलंबित पूर्णत्व अहवाल-४

(७) केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजना :-

केंद्र शासनाच्या सन २०२५-२६ साठी " भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य " या योजनेंतर्गत राज्य शासनांना भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात संचालनालयास अर्थ सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. यासंदर्भात केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाने (Department of Expenditure) दिनांक ०६.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. या योजनेंतर्गत राज्यांना प्रदान करण्यात येणारे अर्थसहाय्य राज्याच्या दीर्घकालीन फायद्यासाठी नवीन आणि प्रगतीपथावर असलेल्या भांडवली प्रकल्पांसाठी वापरावयाचा आहे. राज्य शासनाने सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावांची केंद्र शासनाकडून छाननी करण्यात आली असून, त्या अंती मंजूर प्रकल्पांना बिनव्याजी कर्ज स्वरुपात काही रकमा प्राप्त झाल्या आहेत. तसेच काही रकमा प्राप्त होणार आहेत.

केंद्र शासनाकडून सदर योजनेंतर्गतच्या एकूण ७ भागांमध्ये अर्थसहाय्य प्रस्तावित असून, त्यापैकी भाग - १ : भांडवली खर्चासाठी विशेष निधी, भाग-२ : पंतप्रधान गतीशक्ती योजना, भाग-६-नागरी सुधारणा (Urban Reforms) निर्गुंतवणूक व मुल्यीकरण (Disinvestment and Monetization) या अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. सदर अर्थसहाय्य अर्थसंकल्पित करून वितरित करणेसाठी संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरचा निधी वितरणासाठी नगरपरिषदेकडील प्रस्ताव तपासून संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादरीकरण करण्याची कार्यवाही संगणकीकृत नियोजन कक्ष (Digital Planning Cell) कार्यालयामार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कार्यकारी अभियंता (बगीचा) आणि उपअभियंता यांच्यामार्फत प्रकल्पाच्या नियोजनातील तांत्रिक बाबी हाताळणे जसे की, प्रकल्पाची किंमत/रक्कमेच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांची तांत्रिक छाननी कामे, अंदाजपत्रकात समाविष्ट बाबी, राज्य दर सुचीनुसार पडताळून पाहणे, राज्य दरसुची बाहेरील दरांची व्यवहार्यता पडताळून पाहणे, तांत्रिक मंजुरीस्तव अंदाजपत्रकांची छाननी कामे, निविदेच्या प्रकल्पांची छाननी कामे पूर्ण होऊन बहुतांशी प्रस्तावामध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून उर्वरित प्रस्तावांमध्ये कार्यारंभ आदेश देणेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

कार्यान्वित प्रकल्पांना भेटी देऊन प्रकल्पांची प्रगती व गुणनियंत्रणाच्या दृष्टीने पाहणी कामे व सुधारणेसाठी आवश्यक सूचना देणे इ. कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यानुसार सद्यस्थितीत एकूण १३५ प्रकल्पांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, त्यापैकी ११५ प्रकल्पांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच सदर योजनेंतर्गत निधी वितरण झाल्यानंतर खर्च झालेल्या रकमेचे विनियोग प्रमाणपत्रे / प्रकल्प पुर्णत्व अहवाल प्राप्त करून घेणेबाबत या कार्यालयाच्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात येणार आहे. तसेच संबंधित नगरपंचायती/नगरपरिषदा यांचे मुख्याधिकारी यांना सदर रक्कम वितरीत झाल्यानंतर त्या रकमेतून केलेल्या खर्चाचा तपशील प्रत्येक महिन्यास सादर करणेबाबत या कार्यालयाच्या स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(८) संचालनालयातर्फे तयार करण्यात आलेले Online Unified GIS Portal :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम २०, कलम ३७ (१), कलम ३७ (१क), कलम ३७ (१कक), कलम ४९, कलम १२७ (१), कलम १२७ (२) व न्यायालयीन प्रकरणे यांच्या तरतूदींनुषंगाने कालबद्ध कार्यवाही ऑनलाईन पद्धतीने होणेकरिता Online Unified GIS Portal च्या माध्यमातुन कलम २० करिता रुपांतर, कलम ३७ (१), ३७(१क), कलम ३७ (१कक) करिता विमोचन कलम १२७(१) करिता विमुक्त व न्यायालयीन प्रकरणांकरिता विधी हे मॉड्युल्स तयार करण्यात आलेले आहेत. सदर मॉड्युल्स अंतर्गत कार्यवाही ऑनलाईन प्रणालीमध्ये होणेस्तव या कार्यालयाकडून संनियंत्रण करण्यात येते.

(९) संकेत स्थळ :- नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी माहिती अद्ययावत करणेसंबंधी या कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येते. विविध प्रकारचे नकाशे, भाग नकाशे, फोटो/ व्हीडीओ/ ऑडीओ इ. अपलोड करणे तसेच संकेतस्थळावरील लिखीत माहिती/ मजकुर, विभागाच्या कामकाजाबाबतची माहिती, FAQ मध्ये बदल/ सुधारणा, E-services च्या लिंक्समध्ये सुधारणा, संचालनालयामर्फत प्रसिद्ध झालेल्या टेंडरबाबतची माहिती, गॅलरीमधील फोटोंचे पुनर्विलोकन करणे,इ. बाबींमध्ये काही बदल आवश्यक असल्यास त्याबाबतची कार्यवाही या कार्यालयामार्फत करण्यात येते.

अ.क्र.	कार्यालय	कामकाजांचा संक्षिप्त तपशील
(३)	सहसंचालक, नगररचना (मूल्यांकन), पुणे वार्षिक मुल्यदर तक्ते दरवर्षी तयार करणे.—	मालमत्तेचे मूल्यांकन करणेसाठी नोंदणी महानिरीक्षक यांना सहाय्य करून शासनाच्या साधनसंपत्तीत वाढ करण्यासाठी सहाय्य करणे.
(४)	कोकण (नवी मुंबई) नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती व छ.संभाजीनगर या ठिकाणी **सहसंचालक, नगररचना यांची विभागीय कार्यालये.**	पर्यवेक्षण, नियंत्रण, समन्वय, मार्गदर्शन आणि शाखा कार्यालयाची तपासणी.
(५)	**बृहन्मुंबई येथे उप संचालकांचे कार्यालय** तसेच मुंबई, अलिबाग, ठाणे, जळगाव, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली अहमदनगर, नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, वाशीम, गोंदिया, नंदूरबार, नांदेड , पालघर आणि नव्याने अपग्रेड झालेली रत्नागिरी सिंधुदूर्ग, धुळे, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा, वर्धा, भंडारा, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, श्रीरामपूर आणि बारामती या ठिकाणी **सहायक संचालक, नगररचना यांची शाखा कार्यालये.**	नगर नियोजनाशी संबंधित जिल्ह्यातील कामकाज व महसूल प्राधिकरणास तसेच महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्या हद्दीतील विकास योजनांशी संबंधित कामकाज मूल्यनिर्धारणाशी संबंधित कामकाज.
(६)	उप संचालक, नगररचना **प्रादेशिक योजना,** डहाणू/ठाणे तसेच सहायक संचालक, नगररचना, प्रादेशिक योजना, रत्नागिरी-सिंधुदूर्ग येथे **कार्यालये.**	प्रादेशिक योजना तयार करणे.
(७)	**वाहतूक आणि परिवहन घटक**, उप संचालक, नगररचना, पुणे, उप संचालक, नगररचना, छ. संभाजीनगर.	महानगरे व इतर शहरे आणि याकरिता व्यापक स्वरूपाच्या वाहतूक व परिवहन योजना तयार करणे.
(८)	पिंपरी-चिंचवड, नाशिक या महानगर- पालिकांमध्ये एक **उप संचालक, नगररचना**	महानगरपालिकांच्या विकास योजनांचे कार्यान्वयन व त्यांचे क्षेत्रातील विकासाचे बाबतीत महानगरपालिकांना नगरनियोजनाच्या दृष्टीकोनातून सहाय्य करणे.
(९)	ठाणे, कल्याण, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, पुणे, छ. संभाजीनगर, नागपूर आणि नांदेड-वाघाळा, वाशी (नवी मुंबई), उल्हासनगर व भिवंडी-निजामपूर, अहमदनगर महानगरपालिकांमध्ये, प्रत्येकी एक प्रत्येकी एक **सहायक संचालक, नगररचना.**	महानगरपालिकांच्या विकास योजनांचे कार्यान्वयन व त्यांचे क्षेत्रातील विकासाचे बाबतीत महानगरपालिकांना नगरनियोजनांच्या दृष्टीकोनातून सहाय्य करणे.
(१०)	उल्हासनगर, सांगली मिरज-कुपवाडा, अहमदनगर, अकोला, धुळे, मालेगाव, नांदेड- वाघाळा, जळगाव म.न.पा., भिवंडी-निजामपूर, भुसावळ, सातारा, इचलकरंजी, परभणी, बीड, लातूर, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, अचलपूर, यवतमाळ, जालना, या **" अ " वर्ग नगरपरिषदांमधील नगररचनाकार.**	नगरपरिषदांच्या विकास योजनांचे कार्यान्वयन व त्यांच्या गावातील विकासाच्या बाबतीत नगरपरिषदांना नगर नियोजनाच्या दृष्टिकोनातून सहाय्य करणे.
(११)	पिंपरी -चिंचवड-मनपा, कल्याण-डोंबिवली मनपा, नागपूर म.न.पा., नांदेड-वाघाळा शहर म.न.पा., कोल्हापूर म.न.पा. व ठाणे म.न.पा.,अहिल्यानगर म.न.पा. साठी उप संचालक, नगररचना **विकास योजना विशेष घटक** यांचे प्रत्येकी एक **कार्यालय** आणि सहायक संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, भिवंडी निजामपूर म.न.पा. करिता एक कार्यालय.	महानगरपालिका क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे.
(१२)	**सहायक संचालक, नगररचना योजना क्र. १ व २ इचलकरंजी.**	नगररचना योजना १ व २ मध्ये फेरबदल करण्याकरिता इचलकरंजी मध्ये विशेष घटक स्थापना.
(१३)	**सहायक संचालक, नगर रचना, मुख्य कार्याल, पुणे.**	राज्यातील नगर विकास समस्यांचा सखोल अभ्यास करणे.
(१४)	जळगाव म.न.पा., पनवेल म.न.पा., धुळे म.न.पा., मालेगाव म.न.पा., सोलापूर म.न.पा. व लातूर म.न.पा., सातारा न.प., नेरुळ-ममदापूर न.प. येथे **नगर रचनाकार, विकास योजना, विशेष घटक** यांचे प्रत्येकी एक **कार्यालय.**	महानगरपालिका आणि 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदा असलेल्या शहराच्या विकास योजना तयार/सुधारित करणे.

(अ) मंजूर प्रादेशिक योजना

(A) SANCTIONED REGIONAL PLANS

मोठी गावे अथवा साधनसंपत्तीने समृद्ध असलेले प्रदेश अथवा विकासयोग्य प्रदेश यांच्या लगतच्या भागांची एकत्मिकृत आणि समन्वित आणि समन्वित वाढण्याचे दृष्टीने त्यांची वाढ, संभाव्य विकास क्षमता व प्रश्न यांची काळजीपूर्वक सर्वेक्षणे व पृथ:करण करून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार "प्रादेशिक योजना'' तयार केल्या जातात. नियोजन प्रदेश शासनाकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३ अन्वये अधिसूचित केले जातात आणि प्रादेशिक योजना तयार करण्यासाठी बहुशास्त्रीय प्रादेशिक नियोजन मंडळे स्थापन केली जातात. आजतागायत मंजूर प्रादेशिक योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

परिशिष्ट-१

मंजूर प्रादेशिक योजना

अ.क्र.	जिल्हा	प्रदेशाचे नांव	प्रदेशाचे स्वरूप जसे महानगरी, कृषीप्रधान	प्रादेशिक योजना शासनाने मंजूर केल्याची तारीख	प्रादेशिक योजना अंमलात आल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			पुणे विभाग		
१	सातारा	महाबळेश्वर-पाचगणी प्रादेशिक योजना (सुधारित)	पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभाग/प्रदेश	०७-०८-२०१५	०३-११-२०१५
		सातारा प्रदेशाची प्रादेशिक योजना	महाबळेश्वर - पांचगणी प्रादेशिक योजना क्षेत्र वगळून उर्वरित सातारा जिल्ह्याचे क्षेत्र - कृषीप्रधान	०८-०१-२०१८	०८-०४-२०१८
२	पुणे	पुणे प्रादेशिक योजना	महानगर	२५-११-१९९७	१०-०२-१९९८
३	कोल्हापूर	कोल्हापूर प्रादेशिक योजना	कृषीप्रधान	०४-०१-२०१८	०१-०४-२०१८
४	सांगली	सांगली मिरज	कृषीप्रधान	१५-०३-१९८५	३०-०५-१९८५
५	सोलापुर	सोलापूर जिल्हा प्रदेश	कृषीप्रधान	०९-०२-२०१५	२५-०६-२०१५
६	बारामती	पुणे	कृषीप्रधान	२५-११-१९९७	१०-०२-१९९८
			कोकण विभाग		
१	कोकण विभाग	ठाणे-रायगड-पालघर प्रादेशिक योजना	कृषिप्रधान	०६-०१-२०१८	०५-०३-२०१८
२		मुंबई महानगर प्रदेश	महानगर तसेच कृषीप्रधान	२०-०४-२०२१	२०-०६-२०२१
३		रायगड	कृषीप्रधान	०४-०७-१९९२	१५-०९-१९९२
४		रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हा प्रादेशिक योजना.	पर्यटन दृष्ट्या मंजूर झालेली प्रादेशिक योजना/ संशोधन स्वरूप (रिसोर्स टाईप)	२३-१२-१९८७	१५-०२-१९८८
५		प्रादेशिक योजना डहाणू	डहाणू तालुका क्षेत्र (डहाणू नगपरिषद क्षेत्र वगळून) पर्यावरण संवदेनशील विभाग/प्रदेश	२२-०७-१९९६	२२-०७-१९९६

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			नागपूर विभाग		
१	नागपूर	नागपूर	महानगर/कृषीप्रधान	०६-०५-२०००	१५-०७-२०००
२	वर्धा	प्रादेशिक योजना, वर्धा	कृषीप्रधान	०१-०१-२०१८	०१-०३-२०१८
३	गोंदिया	गोंदिया	कृषीप्रधान	०१-०१-२०१८	०५-०३-२०१८
४	भंडारा	भंडारा	कृषीप्रधान	०१-०१-२०१८	०२-०३-२०१८
५	चंद्रपूर	चंद्रपूर-बल्लारपूर प्रादेशिक योजना	कृषीप्रधान	१८-११-१९९१	०१-०२-१९९२
६	गडचिरोली	चंद्रपूर- बल्लारपूर	कृषीप्रधान	१८-११-१९९१	०१-०२-१९९२
			नाशिक विभाग		
१	नाशिक	नाशिक सुधारित (संपूर्ण नाशिक जिल्हा)	महानगर/कृषीप्रधान	२१-०६-२०१३	१६-०९-२०१३
२	जळगांव	जळगांव - भुसावळ	कृषीप्रधान	१२-११-१९९१	०१-०१-१९९२
३	अहमदनगर	अहमदनगर	कृषीप्रधान	१४-०७-२००५	०१-१०-२००५
४	धुळे	धुळे	कृषीप्रधान	०१-०१-२०१८	०३-०३-२०१८
५	नंदुरबार	नंदुरबार	कृषीप्रधान	०१-०१-२०१८	०३-०३-२०१८
			छत्रपती संभाजीनगर विभाग		
१	छा.संभाजीनगर	छ.संभाजीनगर	कृषीप्रधान	२४.०७.२०१२	३०.१०.२०१२
२	जालना	जालना	कृषीप्रधान	०२.०१.२०११	०२.०३.२०१८
३	परभणी	परभणी	कृषीप्रधान	०१.०१.२०१८	०१.०२.२०१८
४	हिंगोली	प्रादेशिक योजना हिंगोली	कृषीप्रधान	०१.०१.२०१८	०२.०३.२०१८
		हिंगोली न.प. परिघस्त क्षेत्र व ०२ विकास केंद्र	कृषीप्रधान	१३.१२.२०१९	०१.०३.२०२०
५	नांदेड	नांदेड	कृषीप्रधान	०१.०१.२०१८	०२.०३.२०१८
६	बीड	बीड	कृषीप्रधान	०१.०१.२०१८	२४.०१.२०१८
७	लातूर	लातूर प्रदेश	कृषीप्रधान	०२.०१.२०१८	०३.०३.२०२०
		लातूर महानगरपालिका परिघस्त क्षेत्र	महानगरपालिका परिघस्त क्षेत्र/कृषीप्रधान	२५.११.२०१९	२६.०३.२०२०
८	उस्मानाबाद	उस्मानाबाद प्रदेश	कृषीप्रधान	०१.०१.२०१८	०१.०३.२०१८
			अमरावती विभाग		
१	अमरावती	अमरावती	कृषीप्रधान	२९/०५/१९९३	१५/०८/१९९३
२	अकोला	अकोला वाशिम प्रदेश	कृषीप्रधान	२३/०४/२०१२	१५-०६-२०१२
३	यवतमाळ	यवतमाळ	कृषीप्रधान	०१/०१/२०१८	०३/०३/२०१८
४	बुलडाणा	बुलडाणा प्रदेश	कृषीप्रधान	०१-०१-२०१८	०१/०३/२०१८

अनुबंध

कर्मचारी विषयक गोषवारा

राजपत्रित गट- अ

नियमित पदे :—

अ.क्र.	पदनाम	वेतन स्तर	वेतन संरचना	पदसंख्या २०२३-२०२४	पदसंख्या २०२४-२०२५
(१)	(२)	(३)	(४)	(५)	
१	संचालक, न.र.	एस-२९	१३११००-२१६६००	१	१
२	सह संचालक, न.र.	एस-२७	१२३१००-२१५९००	७	७
३	उप संचालक, न.र.	एस-२५	७८८००-२०९२००	६	६
४	सहायक संचालक,न.र./ लवाद	एस-२३	६७७००-२०८७००	४६	४६
५	भूमि संपादन विशेष अधिकारी/नगर रचनाकार	एस-२०	५६१००-१७७५००	५९	५९
६	कार्यकारी अभियंता	एस-२३	६७७००-२०८७००	२	२
७	उप अभियंता	एस-२०	५६१००-१७७५००	३	३
८	मुख्य प्रशासकीय अधिकारी	एस-२०	५६१००-१७७५००	१	१
९	विधी अधिकारी	एस-२०	५६१००-१७७५००	४	४
			एकूण गट-अ ...	**१२९**	**१२९**
		गट ब राजपत्रित			
१	स्वीय सहायक	एस-१६	४४९००-१४२४००	८	८
२	संशोधन अधिकारी	एस-१५	४१८००-१३२३००	०	०
३	प्रशासकीय अधिकारी	एस-१५	४१८००-१३२३००	६	६
४	सहायक नगर रचनाकार श्रेणी -१	एस-१६	४४९००-१४२४००	१५०	१५०
			एकूण गट-ब राजपत्रित ...	**१६४**	**१६४**
		गट-ब अराजपत्रित			
१	रचना सहायक	एस-१५	४१८००-१३२३००	१२२	१२२
२	लघुलेखक (उच्च श्रेणी)	एस-१६	४४९००-१४२४००	५	५
३	लघुलेखक (निम्न श्रेणी)	एस-१५	४१८००-१३२३००	३८	३८
४	अधीक्षक	एस-१४	३८६००-१२२८००	१४	१४
५	सहायक लेखाधिकारी	एस-१५	४१८००-१३२३००	१	१
६	संशोधन सहायक	एस-१४	३८६००-१२२८००	०	०
७	प्रमुख आरेखक	एस-१५	४१८००-१३२३००	१०	१०
			एकूण गट-ब अराजपत्रित ...	**१९०**	**१९०**

(१)	(२)	(३)	(४)	(५)	
		गट-क			
१	प्रथम लिपिक	एस-१३	३५४००-११२४००	४७	४७
२	वरिष्ठ लिपिक/कनिष्ठ लेखापाल	एस-८	२५५००-८११००	७०	७०
३	कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक	एस-६	१९९००-६३२००	१३६	१३६
	सहायक आरेखक	एस-१०	२९२००-९२३००	४३	४३
		एस-१४	३८६००-१२२८००		
		(After 4 years of qualifying Service)			
४	कनिष्ठ आरेखक	एस-८	२५५००-८११००	६२	६२
		एस-१३	३५४००-११२४००		
		(After 5 years of qualifying Service)			
५	अनुरेखक	एस-७	२१७००-६९१००	१०५	१०५
		एस-८	२५५००-८११००		
		(After 7 years of qualifying Service)			
६	सांख्यिकी सहायक	एस-८	२५५००-८११००	०	०
७	वाहनचालक	एस-६	१९९००-६३२००	०	०
८	मेस्त्री	एस-६	१९९००-६३२००	०	०
			एकूण गट-क ...	**४६३**	**४६३**
		गट-ड			
१	दप्तरबंद	एस-३	१६६००-५२४००	८१	८१
२	शिपाई	एस-१	१५०००-४७६००	१२१	१२१
			एकूण गट-ड ...	**२०२**	**२०२**
			एकूण गट- अ, ब, क, ड ...	**११४८**	**११४८**

नगररचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील विविध संवर्गातील मंजूर पदांचा **सुधारित आकृतीबंध** शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. आढावा-६१२२/१५३२/प्र.क्र.७५/नवि-२७ दि.१० एप्रिल, २०२३ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. त्यामध्ये वरीलप्रमाणे नियमित पदे **११४८** संख्या निश्चित करण्यात आली आहे.

नगररचना विभागा व्यतिरिक्त अन्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक संस्था /महामंडळे /प्राधिकरणे यांचे आस्थापनेवर नगररचना / विकास योजना / मूल्यांकन / भूमिसंपादन विषयक कामकाजाकरिता नगररचना पथक / तांत्रिक संवर्गाची १५२३ पदे सद्यस्थितीत मंजूर असून अशी पदे नगररचना विभागाकडून भरणेबाबतची तरतूद संबंधित कार्यालयांच्या आकृतीबंधात करण्यात आलेली असून अशी पदे ही नगररचना विभागाकडील मूळ पदाव्यतिरिक्त पूरक पदे म्हणून ग्राह्य धरण्यात आली आहेत. विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार माहे ऑक्टोबर २०२५ अखेरपर्यंतच्या पूरक पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पूरक पदे :-

अ.क्र.	पदनाम	वेतन स्तर	वेतन संरचना	पदसंख्या २०२४-२०२५
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	संचालक, न.र.	एस-२९	१३११००-२१६६००	५
२	सह संचालक, न.र.	एस-२७	१२३१००-२१५९००	९
३	उप संचालक, न.र.	एस-२५	७८८००-२०९२००	२३०
४	सहायक संचालक,न.र./ लवाद	एस-२३	६७७००-२०८७००	६६
५	भूमि संपादन विशेष अधिकारी/नगर रचनाकार	एस-२०	५६१००-१७७५००	१७५
६	कार्यकारी अभियंता	एस-२३	६७७००-२०८७००	०
७	उप अभियंता	एस-२०	५६१००-१७७५००	०
८	मुख्य प्रशासकीय अधिकारी	एस-२०	५६१००-१७७५००	०
९	विधी अधिकारी	एस-२०	५६१००-१७७५००	०
			एकूण गट-अ ...	**२८५**
		गट-ब राजपत्रित		
१	स्वीय सहायक	एस-१६	४४९००-१४२४००	१
२	संशोधन अधिकारी	एस-१६	४४९००-१४२४००	३१६
३	प्रशासकीय अधिकारी	एस-१५	४१८००-१३२३००	०
४	सहायक नगर रचनाकार श्रेणी -१	एस-१५	४१८००-१३२३००	०
			एकूण गट-ब राजपत्रित ...	**३१७**
		गट-ब अराजपत्रित		
१	रचना सहायक	एस-१५	४१८००-१३२३००	६४४
२	लघुलेखक (उच्च श्रेणी)	एस-१५	४१८००-१३२३००	१४
३	लघुलेखक (निम्न श्रेणी)	एस-१४	३८६००-१२२८००	०
४	अधीक्षक	एस-१४	३८६००-१२२८००	२
५	सहायक लेखाधिकारी	एस-१५	४१८००-१३२३००	०
६	संशोधन सहायक	एस-१४	३८६००-१२२८००	०
७	प्रमुख आरेखक	एस-१५	४१८००-१३२३००	३
		(After 4 years of qualifying Service)		
			एकूण गट-ब अराजपत्रित ...	**६७४**

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		गट-क		
१	प्रथम लिपिक	एस-१३	३५४००-११२४००	४
२	वरिष्ठ लिपिक/कनिष्ठ लेखापाल	एस-८	२५५००-८११००	२२
३	कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक	एस-६	१९९००-६३२००	४१
४	सहायक आरेखक	एस-१०	२९२००-९२३००	१३
		एस-१४	३८६००-१२२८००	
		(After 4 years of qualifying Service)		
५	कनिष्ठ आरेखक	एस-८	२५५००-८११००	५४
		एस-१३	३५४००-११२४००	
		(After 4 years of qualifying Service)		
६	अनुरेखक	एस-७	२१७००-६९१००	४२
		एस-८	२५५००-८११००	
		(After 7 years of qualifying Service)		
७	सांख्यिकी सहायक	एस-८	२५५००-८११००	०
८	वाहनचालक	एस-६	१९९००-६३२००	०
९	मेस्त्री	एस-६	१९९००-६३२००	०
			एकूण गट-क ...	**१७६**
		गट-ड		
१	दप्तरबंद	एस-३	१६६००-५२४००	८
२	शिपाई	एस-१	१५०००-४७६००	६३
			एकूण गट-ड ...	**७१**
			एकूण गट- अ, ब, क, ड ...	**१५२३**

नगररचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता "स्वराज्य अभियंता हिरोजी इंदुलकर" गुणवंत अधिकारी/कर्मचारी (तांत्रिक/अतांत्रिक) पुरस्कार योजनेबाबत....

शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-५०२२/१७८/प्र.क्र.२६३/ नवि-२७, दि. २२.०२.२०२३ अन्वये, राज्य शासन अधिक गतिमान व लोकाभिमुख होण्यासाठी, राज्य शासकीय अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाचा दर्जा सातत्याने उंचावत ठेवून, बदलत्या काळानुसार आपली कर्तव्ये अधिक कार्यक्षमपणे व गतिमानतेने पार पाडण्यासाठी प्रवृत्त व प्रोत्साहित करण्याकरिता उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी **"स्वराज्य अभियंता हिरोजी इंदुलकर"** गुणवंत अधिकारी / कर्मचारी हा पुरस्कार ही योजना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रतिवर्षी दि. ३१ जानेवारी या नगर रचना दिवशी (Town Planning Day) प्रदान करण्यात येत आहे. सदर पुरस्काराचे स्वरूप पात्र ठरलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह असे आहे.

नागरी संशोधन घटक
कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२६-२७

नगररचना व मूल्यनिर्धारण विभागात उप संचालक, नगररचना यांचे अधिपत्याखाली सन १९७८ मध्ये नागरी संशोधन घटकाची निर्मिती केली गेली. वाढत्या नागरीकरणामुळे उदभवणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्या उदा. शहरांची अनिर्बंध वाढ, घर टंचाई, झोपडपट्टीतील वाढ वगैरे बाबतचे दोष टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या नगर नियोजनाच्या विविध विषयांचा तौलानिक अभ्यास नागरी संशोधन घटक करीत आहे. नागरी आणि प्रादेशिक नियोजनाशी निगडीत असलेल्या विविध विषयातील माहिती संकलित करणे हे या घटकाचे प्रमुख काम आहे.

एकूण अंदाजित खर्चाचा तपशिल पुढील तक्त्यात नमूद आहे.

अ.क्र.	तपशिल	सन	एकूण येणारा अंदाजित खर्च	लेखाशीर्ष
१	नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या रचना सहायकांचे पायाभूत प्रशिक्षण	२०२६-२०२७	२,३२,००,०००/-	[लेखाशीर्ष – मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष ७ (०००३) (००)(०१) ७ अभियांत्रिकी पदवीधरांना नगर रचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) (कार्यक्रम) योजनेंतर्गत १३ – कार्यालयीन खर्च]
२	पदव्युत्तर प्रशिक्षण (अ) वेतन (सहायक संचालक, नगर रचनाकार व सहायक मधील भरण्यात येणाऱ्या एकूण ८ अधिकाऱ्यांच्या २ वर्षांच्या कालावधीचे पदव्युत्तर प्रशिक्षणासाठी अंदाजे खर्च)	२०२६-२०२७	२,०८,८०,०००/-	[लेखाशीर्ष – मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (०००३) (००)(०३) ७ अभियांत्रिकी पदवीधरांना नगर रचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) (कार्यक्रम) अंतर्गत ०१ – वेतन]
	(ब) प्रशिक्षण खर्च (पदव्युत्तर प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी परिक्षा शुल्क व स्टेशनरी)		१७,००,०००/-	[लेखाशीर्ष – मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (०००३) (००)(०३) ७ अभियांत्रिकी पदवीधरांना नगर रचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) (कार्यक्रम) अंतर्गत १३ – कार्यालयीन खर्च]
३	पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण	२०२६-२०२७	२०,००,०००/-	[लेखाशीर्ष – मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (०००३) (००)(०३) ७ अभियांत्रिकी पदवीधरांना नगर रचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) (कार्यक्रम) अंतर्गत १३–कार्यालयीन खर्च]
४	क्षेत्र प्रशिक्षण	२०२६-२०२७	४०,००,०००/-	
५	कायदेविषयक प्रशिक्षण	२०२६-२०२७	९०,००,०००/-	
६	भूमि अभिलेख विषयक प्रशिक्षण	२०२६-२०२७	५०,००,०००/-	
७	परदेश प्रशिक्षण	२०२६-२०२७	५,५६,००,०००/-	
८	प्रादेशिक योजना व सुधारणा	२०२६-२०२७	८०,८२,००,०००/-	-
९	विकास योजना तयार करणे	२०२६-२०२७	९५,५०,००,०००/-	[लेखाशीर्ष – मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (००)(०२) - संचालक नगर रचना, पुणे (२२१७०११८) (अनिवार्य) अंतर्गत १७ –संगणक खर्च]
१०	संचालनालयाचे संगणकीकरण Requirement of Consultant	२०२६-२०२७	२,७१,०२,०००/-	[लेखाशीर्ष - मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (००)(०२) - संचालक नगर रचना, पुणे (२२१७०११८) (अनिवार्य) अंतर्गत १० – कंत्राटी सेवा]
११	संचालनालयाचे संगणकीकरण Computerization Requirements	२०२६-२०२७	११,५०,००,०००/-	[लेखाशीर्ष **७** मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (००)(०२) - संचालक नगर रचना, पुणे (२२१७०११८) (अनिवार्य) अंतर्गत १७ –संगणक खर्च]
	एकूण अंदाजित खर्च	**२०२,६६,८२,०००/-**		

उपरोक्तबाबतची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

१. प्रशिक्षण

(अ) तांत्रिक अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण :—

नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण धोरण राबविण्याबाबत नगरविकास विभाग, मंत्रालय, मुबंई यांनी शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१३/३४०७/प्र.क्र.५३७/१३/नवि-१३, दि. ०८/०५/२०१५ नुसार निर्णय निर्गमित केला आहे, सदर शासन निर्णयानुसार नगर रचना संचालनालयातील रचना सहायक, सहायक नगर रचनाकार, नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, उप संचालक व सहसंचालक नगररचना या पदावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश दिले आहेत. याप्रमाणे या वर्षात धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

(१) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या रचना सहायक/सहायक नगर रचनाकार व वरिष्ठ तांत्रिक या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण :—

राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासनाने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि. २३.०९.२०११ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या 'राज्य प्रशिक्षण धोरण' यास अनुसरून नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचेसाठीचे प्रशिक्षण धोरण नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. टीपीएस-१८१३/३४०७/प्र.क्र.५३७/१३/नवि-१३, दि. ०८.०५.२०१५ मधील शासन निर्णयान्वये निश्चित करणेत आलेले आहे. त्यानुसार नगररचना संचालनालयामध्ये सरळसेवा भरतीने दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना पायाभूत प्रशिक्षण (Induction Training) हे यशदा, पुणे या शिखर संस्थेमार्फत देणेची तरतूद करणेत आलेली आहे. सध्या सन २०२५ मध्ये संचालनालयामध्ये २५८ रचना सहायक यांची सरळसेवेने नियुक्ती बाबतची प्रक्रिया पूर्ण झालेली असून या सर्व २५८ रचना सहायक व सहायक नगर रचनाकार यांना यशदा, पुणे येथे प्रशिक्षण देणेबाबतची कार्यवाही सुरु झालेली आहे.

तसेच सन २०२६-२०२७ मध्ये नव्याने नियुक्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना **पायाभूत प्रशिक्षण** देण्याचे सन २०२६-२०२७ मध्ये नियोजन करण्यात येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे असून, त्याकरिता अंदाजे रु. २.३२ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	भरण्यात येणाऱ्या पदांची संख्या	प्रशिक्षणाचे दिवस	प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिन खर्च (अंदाजे)	एकूण येणारा खर्च (अंदाजे)
१	नगर रचनाकार	६०	१५	रू.४०००/-	६० X १५ X४००० = रू. ३६,००,०००/-
२	सहायक नगर रचनाकार	१४८	३३	रू.४०००/-	१४८ X ३३ X४००० = रू. १,९५,३६,०००/-
	एकूण	**२०८**			**रु. २,३१,३६,०००/- म्हणजेच २.३२ कोटी**

(२) नगर रचना पदव्युत्तर प्रशिक्षण—

नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभागातील अधिकाऱ्यांचे नगररचना विषयातील ज्ञान व कौशल्य वाढविणेसाठी शासनाने नगररचना विषयातील उच्च प्रशिक्षणाची योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपासून अस्तित्वात आणली आहे. या योजनेंतर्गत या विभागातील तांत्रिक अधिकाऱ्यांना नगररचना विषयांतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, विश्वेश्वरया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर आणि योजना स्कूल ऑफ प्लॅनिंग व आर्किटेक्चर, नवी दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी शासन पुरस्कृत उमेदवार म्हणून पाठविणेत येते. तसेच नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-५०२२/४५३/प्र.क्र.१२८/नवि-२७, दि.०९/०६/२०२२ अन्वये इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर, पश्चिम बंगाल व स्कूल ऑफ प्लॅनिंग व आर्किटेक्चर, भोपाळ, मध्य प्रदेश या दोन संस्थाना पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत एकूण ८ अधिकारी दर वर्षी वरील महाविद्यालयात प्रशिक्षणासाठी प्रतिनियुनियुक्तीवर पाठविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच त्यांचे वेतनावरील खर्च मागणी क्र. एफ — २, २२१७ — नगरविकास, ८० सर्वसाधारण, ००१ — संचालन व प्रशासन ००३ (००) (०१) अभियांत्रिकी पदवीधरांना नगररचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) या लेखाशिर्षातून भागविण्यात येतो. शासन निर्णय क्र.-टीपीव्ही-२२०९/१०३१/प्रक.२०९/०९नवि-२७, दि.३/२/२०१० नुसार सहायक नगर रचनाकार या संवर्गातील अधिकाऱ्यांना देखील सेवाजेष्ठतेनुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पुरस्कृत केलेले आहे.

सन २०२५-२६ मध्ये अंदाजे ८ अधिकारी यांना पदव्युत्तर प्रशिक्षणाकरिता पाठविण्याचे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	प्रशिक्षणास पाठविण्यात येणाऱ्या पदांची संख्या	प्रशिक्षणाचे दिवस	प्रती प्रशिक्षणार्थी प्रती खर्च (अंदाजे)	एकूण येणारा खर्च (अंदाजे)
१	सद्यस्थितीत पदव्युत्तर प्रशिक्षण घेणारे स.सं.न.र/न.र.	स.सं.न.र-१, न.र.-३	२ वर्ष असलेतरी सन २०२६-२७ हे एक वर्ष गृहित धरुन	स.सं.न.र.- रु.१,५०,००० X १२ X १ आणि (अ) न.र. रु.१,३०,००० X १२ X ३	(१८,००,००० + ४६,८०,०००) **रु.६४,८०,०००/-**
२	पुढील वर्षी प्रशिक्षण घेणारे स.सं.न.र./ न.र.	स.सं.न.र-१, न.र.-३	२ वर्ष असलेतरी सन २०२६-२७ हे एक वर्ष गृहित धरुन	स.सं.न.र.पदाची वेतनश्रेणी विचारात घेवून, रु.१,५०,००० X १२ X ८	**रु.१,४४,००,०००/-**
				एकूण	**रु. २,०८,८०,०००/-**

प्रशिक्षण व इतर खर्च

अ.क्र.	पदाचे नाव	प्रशिक्षणास पाठविण्यात येणाऱ्या पदांची संख्या	प्रशिक्षणाचे दिवस	प्रती प्रशिक्षणार्थी प्रती खर्च (अंदाजे)	एकूण येणारा खर्च (अंदाजे)
१	सद्यस्थितीत पदव्युत्तर प्रशिक्षण घेणारे स.सं.न.र/न.र.	स.सं.न.र-१, न.र.-३	२ वर्ष असलेतरी सन २०२६-२७ हे एक वर्ष गृहित धरुन	रु.१,२५,०००	४ X १,२५,००० = रु. ५,००,०००/-
२	सहायक संचालक नगर रचना /नगर रचनाकार / सहायक नगर रचनाकार	८	२ वर्ष असलेतरी सन २०२६-२७ हे एक वर्ष गृहित धरुन	रु. १,५०,०००/-	४ X १,५०,००० = रु. १२,००,०००/-
				एकूण	**रु. १७,००,०००/-**

(३) नगररचना संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी यांना विहित संस्थांमार्फत सेवांतर्गत प्रशिक्षण :—

संचालनालयातील तांत्रिक अधिकारी/कर्मचारी व अतांत्रिक कर्मचारी (लिपिक वर्ग) आणि काही प्रमाणात लेखा शाखेतील कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या प्रशिक्षणासाठी पुरस्कृत केले जाते. अशा प्रशिक्षणामुळे अधिकाऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर नगर नियोजनामध्ये निश्चितच लाभदायक ठरतो. वेगवेगळ्या संस्थांमार्फत परिसंवाद कार्यशाळा इत्यादी मध्ये सहभाग घेण्यासाठी अधिकाऱ्यांना पुरस्कृत केले जाते. तांत्रिक स्वरुपाच्या कार्याबरोबरच अधिकाऱ्यांना कार्यालय प्रमुखाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्या दृष्टिने प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय कौशल्य आत्मसात असणे आवश्यक असते. भारतीय लोकप्रशासन संस्था (आय. आय. पी. ए.), नवी दिल्ली यांचेकडील प्रशिक्षणासाठी विभागातील अधिकाऱ्यांना पुरस्कृत केले जाते. या शिवाय विकास योजना आणि त्यांची अंमलबजावणी संदर्भात महाराष्ट्रातील नागरी स्वराज्य संस्थांचा सहभाग असतो. पुणे स्थित यशदा संस्थेकडून काही प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील शहरांचे नागरीकरण झपाट्याने होत असून एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार सुमारे ४५% लोकसंख्या शहरात आहे.त्यामुळे शहरांची अनिर्बंध वाढ होत असून बहुतांशी शहरांना गलिच्छ वस्त्या व झोपडपट्ट्या सारख्या नागरी समस्यांनी ग्रासले आहे. नागरीकरणाच्या समस्या व त्यावर उपाययोजना तसेच नागरीकरणाबाबतच्या, जमिनीच्या मूल्यांकनाबाबत वाहतूक व परिवहन या विषयाबाबत तसेच विविध विषयावर यशवंतराव चव्हाण प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या शिखर संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. त्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना नामनिर्देशित करण्यात येते. सन २०२६-२७ मध्येही याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

नगररचना संचालनालयातील पदोन्नतीने कार्यरत उप संचालक, सहायक संचालक, नगर रचनाकार या संवर्गातील तांत्रिक अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतरचे अल्पकालावधीचे उजळणी प्रशिक्षण देणेबाबत सन २०२६-२७ मध्ये IIHS या संस्थेमार्फत यशदा, पुणे येथे देण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने संचालनालयातील तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील अधिकारी / कर्मचारी (लिपिक वर्ग) अंदाजे ५५ प्रशिक्षणार्थी यांचेसाठी अंदाजे २० लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	अंदाजे पद संख्या	प्रशिक्षणाचे दिवस	प्रती प्रशिक्षणार्थी खर्च	एकूण येणारा खर्च १८ % क्रच्र् सह	प्रस्तावित एकूण खर्च (३० % खर्च वाढ गृहित धरुन)
१	संचालक	१	२०	रु.२३,५००/-	रु.२७,७३०/-	रु.३६,०४९/-
२	सहसंचालक	१	२०	रु.२३,५००/-	रु.२७,७३०/-	रु.३६,०४९/-
३	उपसंचालक	१३	२०	रु.२३,५००/-	रु.३,६०,४९०/-	रु.४,६८,६३७/-
४	सहायक संचालक	२०	२०	रु.२३,५००/-	रु.५,५४,६००/-	रु.७,२०,९८०/-
५	नगर रचनाकार	२०	२०	रु.२३,५००/-	रु.५,५४,६००/-	रु.७,२०,९८०/-
		५५			एकूण अंदाजे खर्च-	रु.१९,८२,६९५/-

(४) GIS प्रशिक्षण :—

नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी /कर्मचारी व रेखाकला शाखेतील कर्मचाऱ्यांना IIRS, Dehradun येथे GIS विषयक प्रशिक्षण देण्याबाबतचे नियोजन आहे.

नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी /कर्मचारी व रेखाकला शाखेतील कर्मचाऱ्यांना IIRS, Dehradun येथे GIS विषयक प्रशिक्षण सन २०२६-२०२७ मध्ये देण्याबाबतचे नियोजन आहे. त्यासाठी एकूण ५० (२ बॅच मध्ये) तांत्रिक अधिकारी /कर्मचारी व रेखाकला शाखेतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्यासाठी प्रत्येकी ४०,०००/- प्रमाणे (१०० × ४०,०००/- = रु. ४०,००,०००/-) रु.४०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

(५) नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांना कायदेविषयक प्रशिक्षण (Law Training) :—

सन २०२५ मध्ये नामनिर्देशनाने नव्याने नियुक्त होणाऱ्या २५८ रचना सहायक आणि उर्वरित सहायक नगर रचनाकार यांचे **कायदेविषयक प्रशिक्षण** यावर्षी आयोजित करण्यात येईल. त्याकरिता अंदाजे रु. ९० लाख (३००*३००००/- प्रति व्यक्ती अंदाजे + १८ टक्के GST सहा) एवढा खर्च अपेक्षित आहे.

(६) भूमि अभिलेख विषयक प्रशिक्षण :—

नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी/कर्मचाऱ्यांना भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद, या संस्थेमार्फत सन २०२६-२०२७ मध्ये भूमि अभिलेख प्रशिक्षण देण्यात येईल. त्याकरिता (५००*८५००/- प्रति व्यक्ती अंदाजे) रु. ४२,५०,०००/- म्हणजेच अंदाजे रु. ५०.०० लाख एवढा खर्च अपेक्षित आहे.

(७) परदेश प्रशिक्षण :—

नगर रचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी यांना परदेश दौरा (इंग्लंड व सिंगापूर / जपान इ.) प्रशिक्षण सन २०२६-२०२७ मध्ये IIHS, Bengaluru अथवा इतर संस्थेमार्फत इंग्लंड, सिंगापूर / जपान इ. आवश्यकतेनुरुप अशा ठिकाणी देण्यात येईल. IIHS, Bengaluru यांचेकडून इंग्लंड प्रशिक्षणाकरिता अंदाजित येणारा खर्च हा प्रति व्यक्ती रु.२०,००,०००/- इतका खर्च कळविलेला असून सदर प्रशिक्षणासाठी २० अधिकारी यांची निवड सेवाजेष्ठतेनुसार करण्यात येईल. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा दोन आठवडयाचा आहे. लंडन परदेश प्रशिक्षणासाठी पुढीलप्रमाणे अंदाजे रु.४.४० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	पद संख्या	प्रशिक्षणाचे दिवस	प्रती प्रशिक्षणार्थी खर्च	एकूण येणारा खर्च १८ % GST सह	प्रस्तावित एकूण खर्च
१	संचालक/सहसंचालक/ उपसंचालक/सहायक संचालक/ नगर रचनाकार	२०	१५	रु.२० X १३,३१,९१६/- = रु.२,६६,३८,४००/-	रु.३,१४,३३,३१२/- अंदाजे (१८ % GST)	**रु.४,४०,०६,७००/- अंदाजे (४० % खर्च वाढ गृहित धरुन)

तसेच Sustainability initiatives यांचेकडील आयोजित सिंगापूर परदेश प्रशिक्षणाचा कालावधी ७ दिवसांचा असून त्यासाठी पुढीलप्रमाणे अंदाजे रु. १.१६ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	पद संख्या	प्रशिक्षणाचे दिवस	प्रती प्रशिक्षणार्थी खर्च	एकूण येणारा खर्च १८ % GST सह	प्रस्तावित एकूण खर्च
१	संचालक/सहसंचालक/ उपसंचालक/सहायक संचालक/ नगर रचनाकार	२०	८	रु.२० X ३,९०,०००/- = रु.७८,००,०००/-	रु.९२,०४,०००/- अंदाजे (१८ % GST)	**रु. १,१५,०५,०००/- अंदाजे (२५ % खर्च वाढ गृहित धरुन)

* * भविष्याकाळात प्रत्यक्ष दौ-यावेळी होणा-या विमान प्रवासाच्या दरातील वाढ, राहण्यासाठी होणा-या खर्चामधील वाढ, भारतीय चलन रुपयाच्या तुलनेने आंतरराष्ट्रीय बाजारानुसार त्यामध्ये होणारी वाढ याबाबी गृहित धरुन सदरची ही अंदाजित रक्कम असून सदर रक्कमेत कमी अथवा जास्त वाढ होण्याची शक्यता आहे.

तांत्रिक प्रकरणे :—

(६) प्रादेशिक योजना सुधारणा :—

संपूर्ण महाराष्ट्र नियोजनबध्द करण्याचे शासनाचे उद्दीष्ट पूर्ण झाले आहे. सर्वसाधारणपणे राज्यांचे ३०% एवढया क्षेत्राचे जमीन वापराचे नियोजन झालेले नव्हते, ते नियोजन पूर्ण झाले आहे. राज्यातील सर्व जिल्ह्याच्या प्रादेशिक योजना, सद्यस्थितीत मंजूर आहेत. सद्यस्थितीत द्रुतगती प्रादेशिक योजना मधील विकास केंद्र व परिघक्षेत्र नकाशे तयार करण्याचे काम पुर्ण झाले आहे

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार "प्रादेशिक योजना" तयार केल्या जातात. राज्यातील सर्व जिल्ह्याच्या प्रादेशिक योजना, सद्यःस्थितीत मंजूर असून त्यापैकी २ प्रादेशिक योजना (रत्नागिरी, सिंधुदूर्ग) सुधारित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन जिल्ह्यांची स्वतंत्र GIS Based द्रुतगती प्रादेशिक योजना करणेकरिता, रु. १५९०/- (GST सह) इतका दर सदर द्रुतगती प्रादेशिक योजनेकरिताच्या RFP मध्ये Base Rate म्हणून अंतर्भूत करणेबाबत प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या २७ व्या बैठकीत तत्वतः मान्यता मिळाली आहे. सदर प्रस्ताव मान्यतेस्तव DIT उच्चाधिकार समिती (HPC) समोर मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

कोकण विभागीय कार्यालयाने नमूद केल्यानुसार रत्नागिरी जिल्ह्याचे अंदाजे क्षेत्र ६ लाख हेक्टर व सिंधुदूर्ग जिल्ह्याचे अंदाजे क्षेत्र ३ लाख हेक्टर असून वरील दरानुसार परिगणित केल्यास या दोन्ही जिल्ह्यांच्या GIS Based प्रादेशिक योजना करणेकरिता अंदाजे एकूण रु. १४३,१०,००,०००/- म्हणजेच रु. १४३.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त तिनही प्रादेशिक योजनांकरिता स्वतंत्र कार्यालय कार्यरत आहेत. सदर कार्यालयांचा सन २०२६-२७ करिताचा अस्थापना खर्च GIS Mapping रु. ५७.२४ (पहिला टप्पा ४० टक्के) कोटी इतका अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनच्या नगरविकास विभागाने राज्यातील सर्व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे, भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System-GIS) वापरुन सर्वेक्षण (GIS Mapping) करणेबाबत शासन निर्णय क्र. टीपीएस-१८२२/१३११/प्र.क्र. १३९/२०२२/नवि-१३, दि.२९/११/२०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ चे तरतुदीन्वये निदेश राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सन २०२३-२४, २०२४-२५,२०२५-२६ या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे नमूद ESZ चे GIS Mapping करण्याची कार्यवाही करणेत येत आहे.

१. डहाणू

२. माथेरान

३. महाबळेश्वर-पाचगणी

वरील नमूद प्रादेशिक योजना क्षेत्रांच्या क्ष्च् ग्ठ्ठद्रद्रत्दढ़ करणेकरिता एकूण २३.५८ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

असा एकूण प्रादेशिक योजनांकरिता ८०.८२ कोटी इतक्या निधी अपेक्षित आहे

(९) विकास योजना तयार करणे :—

महाराष्ट्र राज्यात शासनाने सन २०१५ व २०१६ या कालावधीत विविध शासन निर्णयान्वये नव्याने १६ नगरपरिषदा व १२० नगरपंचायती अशी एकूण १३६ स्थानिक प्राधिकरणे स्थापन केलेली आहेत. तसेच डिसेंबर, २०१८ पर्यंत एकूण अस्तित्वातील ६२ नियोजन प्राधिकरणांच्या (७ महानगरपालिका) विकास योजना सुधारित करावयाच्या आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका वगळून उर्वरित १३६+५५= १९१ नियोजन प्राधिकरणांचे "GIS-Based development plan" २ वर्षांचे कालावधीमध्ये, खाजगी संस्थेच्या सहकार्याने, करण्याचे नियोजन करण्यासाठीची कार्यपद्धती शासनाकडील निर्णय क्र. टीपीएस १८१८/१४८९/प्र.क्र. ३०३/ १८/नवि-१३, दि. २५/०१/२०१९ अन्वये ठरविण्यात आली आहे. सद्यःस्थितीत एकूण ११९ नगरपरिषदा/नगरपंचायती करिता कार्यादेश देण्यात आले आहेत.

या कामाकरिता अंदाजे रू. ४०.०० कोटी इतक्या रक्कमेची प्रलंबित देयके देणे बाकी आहेत. या कामाकरिता रू.४०.०० कोटी इतक्या रक्कमेची प्रलंबित देयके देणे बाकी आहेत. सदर खर्च या वर्षात अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त तसेच या कामाकरिता यापूर्वीच्या, खाजगी संस्थेस मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. तथापि GISI based DP ची RFP PIC क्र. २७ च्या बैठकीतील निर्देशानुसार HPC कडे मान्यतेस्तव सादर करणेबाबत कळविले आहे. त्यामुळे दिल्यास अथवा नवीन खाजगी संस्थेची नियुक्ती झाल्यास अंदाजे ५० कोटी रक्कमेची आवश्यकता लागू शकते. असे एकत्रितपणे रु. ९० कोटी रक्कमेची आवश्यकता लागू शकते.

पारंपारिक पद्धतीने तयार केलेल्या विकास योजनांचे GIS पद्धतीने रूपांतरण करण्याच्या प्रकल्पाच्या प्रस्तावास PIC बैठक क्र.२७ मध्ये मान्यता दिली असून सदर प्रकल्प सन २०२६-२७ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर प्रकल्पांतर्गत ५५ विकास योजनांकरिता (प्रत्येकी रु.१० लक्ष प्रमाणे) अंदाजे रु.५.५० कोटी इतका निधी अपेक्षित आहे.

उक्त नमूदप्रमाणे GIS विषयक कामांकरिता एकूण रु.९५.५० कोटी इतका निधी सन २०२६-२७ मध्ये उपलप्रब्ध होणे अपेक्षित आहे.

PIC बैठक क्र.२४ मधील शासने दिलेल्या निर्देशांनुसार GIS विषयक कामांकरिता निधी उपलब्ध होण्याबाबत नवीन लेखाशीर्ष तयार करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.१०/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावास अनुसरून Special Projects असे नवीन लेखाशीर्ष तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून अशा प्रकारे नवीन लेखाशीर्ष उपलब्ध झाल्यास सन २०२६-२७ करिता आवश्यक असलेला उक्त नमूद रु. **९५.५०** कोटी इतका निधी अशा नवीन लेखाशिर्षामधून देण्यात यावा. तथापि असे नवीन लेखाशीर्ष तयार न झाल्यास सदर निधी खालील नमूद लेखाशिर्षामधून देण्यात यावाः

[लेखाशीर्ष - मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उपलेखाशिर्ष - (००)(०२) - संचालक नगर रचना, पुणे (२२१७०११८) (अनिवार्य) अंतर्गत १७ - संगणक खर्च]

(१)	(२)	(३)	(४)	(५)

(१०) शासन निर्णय व परिपत्रके :-

शासनाकडून नगर रचना विषया संदर्भात प्राप्त होणारी शासनाची परिपत्रके नगर रचना संचालनालयाशी संबंधित सर्व कार्यालयांना पाठविणे विषयाची कार्यवाही नागरी संशोधन घटकामार्फत करण्यात येईल.

(११) संचालनालयाचे संगणकीकरण **:-**

संचालनालयाचे संगणकीकरणासाठी प्रकल्प अंमलप्रजावणी समितीची (PIC) स्थापना मा.प्रधान सचिव (नवि-१) यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली असून मा.संचालक, नगर रचना सदर समितीचे सदस्य सचिव आहेत. PIC च्या वेळोवेळी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे संचालनालयाचे संगणकीकरणांतर्गतची कामे कार्यवाहीत आहेत.

अ) २०२६-२७ मध्ये प्रस्तावित कामांकरिता आवश्यक निधी :

(a) Requirement of Consultant

झ्लेखाशीर्ष - मागणी क्र.एफ-२, प्रधान लेखाशिर्ष - २२१७-नगर विकास, उ{लेखाशिर्ष - (००)(०२) - संचालक नगर रचना, {ुणे (२२१७०११८) (अनिवार्य) अंतर्गत १०-कंत्राटी सेवाट

Sr. No.	Particulars	Q.ty	No of Months	cost per month(Rs. Incl. GST)	Expected Amount (Rs. Incl. GST)	Expected Amount (Rs.Incl. GST)
१	**IT Consultant Payment Oct-२५ to Mar-२६**					
a.	Pr.Consultant	१	६	५३५७२०	३२,१४,३२०	१,३५,५१,१२०
b.	Sr.Consultant	२	६	४५४३००	५४,५१,६००	
c.	Consultant	२	६	४०७१००	४८,८५,२००	
२	**IT Consultant Payment Apr-२६ to Mar-२७**					
a.	Pr.Consultant	१	१२	५,३५,७२०	६४,२८,६४०	२,७१,०२,२४०
b.	Sr.Consultant	२	१२	४,५४,३००	१,०९,०३,२००	
c.	Consultant	२	१२	४,०७,१००	९७,७०,४००	
	Total for FY २०२६-२७ =				**४,०६,५३,३६०**	**४,०६,५३,३६०**
					अंदाजे रु४,०.७,००,००-/	

b) Computerization Requirements :

[**लेखाशीर्ष** — मागणी क्र2-एफ., प्रधान लेखाशिर्ष नगर विकास-2217 -, उपलेखाशिर्ष - (02)(00) - संचालक नगर रचना, पुणे 17 अंतर्गत (अनिवार्य) (22170118) — संगणक खर्च[

Sr. No.	Particulars	Qty.	per unit cost for १ Year (Rs.Incl. GST)	Expected Amount (Rs.Incl. GST)	Expected Amount (Rs.Incl. GST)
३	**Cloud (No of VMs)**				
a.	FY-२५-२६ : Ongling १५ VMs ArcGIS (७) Ceinsys (३) Website (२) Vishwaconnect (२) Autodesk (१)	१५	३,६०,०००	५४,००,०००	६७,६८,०००
b.	SMS Email gateway	१	६,४८,०००	६,४८,०००	
c.	Expected New Clouds	२	३,६०,०००	७,२०,०००	
४	**New Websites-Applications**				

Sr. No.	Particulars	Qty.	per unit cost for १ Year (Rs.Incl. GST)	Expected Amount (Rs.Incl. GST)	Expected Amount (Rs.Incl. GST)
	Development				
	२ Nos	२	१०,००,०००	२०,००,०००	२०,००,०००
५	**Websites-Applications-Maintenance** (GIGW Certificate + VAPT Security Audit/ Testing + Maintenance १ Year)				
	dtp.maharahstra.gov.in	१	४,००,०००	४,००,०००	२०,००,०००
	tpvdmah.in/homepage	१	४,००,०००	४,००,०००	
	rppartplan.maharashtra.gov.in/	१	४,००,०००	४,००,०००	
	2 New Applications	२	४,००,०००	८,००,०००	
६	**Computerization Expenses as per DPC DPR**				
a.	Digital Experience Platform purchase and development	१	५,९०,००,०००	५,९०,००,०००	१०,४०,००,०००
b.	Software Purchase/ AMC Charges, etc.	१	१,००,००,०००	१,००,००,०००	
c.	ESRI Jumpstart	१	५०,००,०००	५०,००,०००	
d.	All-in-one PC	१००	९०,०००	९०,००,०००	
e.	High End Desktop PC	५०	१,३५,०००	६७,५०,०००	
f.	Mid Range Desktop PC	५०	८५,०००	४२,५०,०००	
g.	High End Desktop PC	५०	७०,०००	३५,००,०००	
h.	Printer A४ BW	१००	२०,०००	२०,००,०००	
i.	Printer A३ BW	५०	३०,०००	१५,००,०००	
j.	Printer/ Scanner A४ Colour	२५	४०,०००	१०,००,०००	
k.	Feeder Scanner A४ (For E-Office)	५०	४०,०००	२०,००,०००	
	Total for FY २६-२७ =			११,४७,६८,०००	११,४७,६८,०००
				अंदाजे रु१.१,५०-/००,०००,	

कार्यक्रम अंदाजपत्रक २०२६--२०२७
(अ) विकास योजना (मूळ विकास योजना व सुधारित विकास योजना आणि वाढीव क्षेत्राच्या विकास योजना)
२०२५-२०२६ आणि २०२६-२०२७ मध्ये तयार करुन प्रसिध्द करावयाच्या विकास योजनांचा वार्षिक कार्यक्रम.

	२०२५-२०२६ मधील कार्यक्रम			२०२६-२०२७ मधील कार्यक्रम		
विभाग	**जिल्हा**	**प्राथमिक काम**	**प्रसिध्द करणे**	**जिल्हा**	**प्राथमिक काम**	**प्रसिध्द करणे**
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**
पुणे विभाग	कोल्हापूर	उपसंचालक, नगर रचना, विकास योजना,विशेष घटक, कोल्हापूर :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ नुसार विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करण्यात आला आहे.	महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ नुसार प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार होणे अपेक्षित आहे.	पुणे	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम २६ अन्वये विकास योजना प्रसिध्द करणे.	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम २८(२) अन्वये नियोजन समिती गठीत करणे व विकास योजना शासनास सादर करणे.
	पुणे	उपसंचालक,नगर रचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका नवनगर विकास प्राधिकरण घटक, पिंपरी-पुणे :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम २६ अन्वये विकास योजना प्रसिध्दी झाल्यानंतर प्राप्त झालेल्या हरकती सूचनांबाबत नियोजन समितीकडून सुनावणी आयोजित करुन, प्रारुप विकास योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस कडे अभिप्रायासाठी सादर करणे.	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम २८(४) नंतर अंतर्गत विकास योजनेच्या मसुद्याच्या करण्यात आलेल्या फेरबदलांची किंवा बदलांची सूची प्रसिध्द करणे.	**पुणे**	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम ३० अन्वये प्रारुप विकास योजना शासनास सादर करणे.	महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये शासनाकडून मंजूरी मिळणे अपेक्षित आहे.
		सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे :- मंचर नगरपंचायतीचा PLU तयार करणे व प्रसिध्द करणे.	PLU प्रसिध्द करणे.		प्रारूप विकास योजना शासनास मंजूरीस्तव सादर करणे	महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये शासनाकडून मंजूरी मिळणे अपेक्षित आहे.
	२) शहरातील विद्यमान रस्त्यावरील वाहतुकीच्या समास्यांचे निराकरण करणेसाठी वाहतुक व परिवहन योजना तयार करणे शहरातील चौकातील वाहतूक विनाअडथळा सुरळीत होणेसाठी संकल्पनाचित्र तयार करणे	४) नागपूर जिल्ह्यातील कटोल नगरपरिषद हद्दीतील १ चौकाचे संकल्पाना चित्र तयार करुन मंजूरी देण्यात आली आहे.		२)देगलूर नगरपरिषदेच्या विकास योजनेस मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने देगलुर नगरपरिषदेने सादर केलेल्या प्रस्तावातील चौकाबाबत कोणतेही E.P. नसल्याबाबत खात्री करुन चौकाचे संकल्पाना चित्र तयार करुन त्यास मंजूरी देणे.	प्राप्त होत नाहीत. ही बाब विचारात घेता छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अमरावती या विभागातील महानगरपालिका नगरपरिषदा व नगरपंचायत यांना चौक सुधार योजनेचे प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात येऊन त्याबाबत पाठपुरावा करण्यात आला.	२) देगलुर नगरपरिषदेच्या विकास योजनेस मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने देगलुर नगररिषदेने सादर केलेल्या प्रस्तावातील चौकाबाबत कोणतेही E.P. नसल्याबाबत खात्री करुन चौकांचे संकल्पना चित्र तयार करुन त्यास मंजूरी देणे.	प्राप्त होणारे प्रसिध्दीपूर्व विकास योजना नकाशे या कार्यालयास प्राप्त झाल्यास सदर विकास योजनेमधील रस्त्यांचे जाळे व चौकांची स्थितीबाबत या कार्यालयामार्फत तपासणी करता येऊ शकेल.
	३) वाहतुक व परिवहन ट्रक टर्मिनस चे रेखांकन तयार करणे तसेच वाहतूक व परिवहन संदर्भात इतर कामे करणे	५) नंदूरबार जिल्ह्यातील शहदा नगरपरिषद हद्दीतील ७ चौकाचे संकल्पाना चित्र तयार करुन मंजूरी देण्यात आली आहे.		३) हदगांव नगरपरिषदेच्या विकास योजनेस मंजूरी प्राप्त झाल्यानंतर हदगांव नगरपरिषद हद्दीतील चौकांचे संकल्पना चित्र तयार करुन त्यास मंजूरी देणे		३) हदगांव नगरपरिषदेच्या विकास योजनेस मंजूरी प्राप्त झाल्यानंतर हदगांव नगरपरिषद हद्दीतील चौकांचे संकल्पना चित्र तयार करुन त्यास मंजूरी देणे	

प्रपत्र - अ

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, वाहतूक व परिवहन, पुणे

कार्यक्रम अंदाजपत्रक-२०२६-२०२७

अ.क्र.	विषय	सन २०२३-२४ या वर्षात पुर्ण केलेली कामे	सन २०२४-२५ या वर्षात पुर्ण केलेली कामे	सन २०२५-२६ या वर्षात प्रस्तावित केलेली कामे	दि.०१ एप्रिल २०२५ ते दि.३० सप्टेंबर २०२५ या वर्षात साध्य केलेली उद्दिष्टे	दि.०१ ऑक्टोंबर २०२५ ते दि.३१ मार्च २०२६ या कालावधीत प्रस्तावित उद्दिष्टे	सन २०२६-२७ करिता प्रस्तावित उद्दिष्टे
१	२	३	४	५	६	७	८
	पुणे, कोकण व नाशिक विभागातील छोटया शहरांच्या वाहतूक व परिवहन योजना तयार करणे, लहान व मध्यम चौकांची संकल्पना चित्रे तयार करणे,मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.५.१.१ अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) चे तरतूदीन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, नगर पंचायती हद्दीलगतच्या रस्त्यांच्या जाळयांच्या प्रारुप नकाशांची छाननी करणे, वाहतूक परिवहनाशी संबंधित इतर कामे, तसेच नगरपरिषदांच्या विकास योजनांच्या प्रस्तावित बाबींचा वाहतूक व परिवहनाच्या दृष्टीने	१) वाहतूक सुलभ होंण्याच्या दृष्टीकोनातून उमरी नगरपरिषद हद्दीतील चौकांच्या संकल्पना चित्रास मंजूरी देणेबाबत.	१) वाहतूक सुलभ होंण्याच्या दृष्टीकोनातून उमरी नगरपरिषद हद्दीतील चौकांच्या संकल्पना चित्रास त्रुटी पूर्तता करण्यासंदर्भात कळविले आहे.	१) पुणे, कोकण व नाशिक विभागातील महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायत हद्दीतील चौकांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी तसेच शहरातील वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातून नगर परिषद / नगर पंचायत हद्दीतील महत्वाच्या चौकांमध्ये नियोजनात्मक उपाय सुचविणेबाबत मार्गदर्शनासाठी पत्र व्यवहार करणे व त्याबाबत पाठपुरावा करणे.	१) पुणे, कोकण व नाशिक विभागातील महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायत हद्दीतील चौकांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी तसेच शहरातील वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातून नगर परिषद / नगर पंचायत हद्दीतील महत्वाच्या चौकांमध्ये नियोजनात्मक उपाय सुचविणेबाबत मार्गदर्शनासाठी पत्र व्यवहार केले व त्याबाबत पाठपुरावा केला. तसेच, कार्यालयास ई-मेलद्वारे प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने त्रुटी पत्राद्वारे संबंधित नगर परिषदा, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांना विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन प्रस्ताव फेरसादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.	१) पुणे, कोकण व नाशिक विभागातील महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायत हद्दीतील चौक सुधारणा बाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी तसेच शहरातील वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातून नगर परिषद / नगर पंचायत हद्दीतील महत्वाच्या चौकांमध्ये नियोजनात्मक उपाय सुचविणेबाबत मार्गदर्शनासाठी पत्र व्यवहार करणे व त्याबाबत पाठपुरावा करणे.	१) पुणे, कोकण व नाशिक विभागातील महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायत हद्दीतील चौक सुधारणा बाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी तसेच शहरातील वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातून नगर परिषद / नगर पंचायत हद्दीतील महत्वाच्या चौकांमध्ये नियोजनात्मक उपाय सुचविणेबाबत मार्गदर्शनासाठी पत्र व्यवहार करणे व त्याबाबत पाठपुरावा करणे.

छाननी करुन अहवाल सादर करणे	२) इचलकंरजी शहरातील महत्वाच्या चौकांमध्ये चौक सुधारणा योजना राबविणेबाबत	२) इचलकंरजी शहरातील महत्वाच्या चौकांमध्ये चौक सुधारणा योजना राबविणेबाबतचे प्रस्ताव सादर केले असता, प्रस्तावामध्ये त्रुटी पूर्तता करण्यासंदर्भात कळविले आहे.	२) मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.५.१.१ अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) चे तरतूदीन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती हद्दीलगतच्या रस्त्यांच्या जाळयांच्या प्रारुप नकाशांची छाननी करणे.	२) मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.५.१.१ अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) चे तरतूदीन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती हद्दीलगतच्या रस्त्यांच्या जाळयांच्या प्रारुप नकाशांची छाननी सुरु आहे.	२) मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.५.१.१ अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) चे तरतूदीन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा , नगर पंचायती हद्दीलगतच्या रस्त्यांच्या जाळयांच्या प्रारुप नकाशांची छाननी सुरु आहे.	२) मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.५.१.१ अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) चे तरतूदीन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा , नगर पंचायती हद्दीलगतच्या रस्त्यांच्या जाळयांच्या प्रारुप नकाशांची छाननी सुरु आहे.
	३) वाहतूक सुलभ होंण्याच्या दृष्टीकोनातून शहादा नगरपरिषद हद्दीतील चौकांच्या संकल्पना चित्रास मंजूरी देणेबाबत.	३) वाहतूक सुलभ होंण्याच्या दृष्टीकोनातून शहादा नगरपरिषद हद्दीतील चौकांच्या संकल्पना चित्रास त्रुटी पूर्तता करण्यासंदर्भात कळविले आहे.		३) सिन्नर शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील बारगाव-पिंप्री या रस्त्याच्या रुंदीमध्ये दुरुस्ती व सेवा रस्ता रद्द करणेबाबतचा प्रस्तावाअनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद, सिन्नर यांना सविस्तर अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणेबाबत कळविले आहे.	३) सिन्नर शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील बारगाव-पिंप्री या रस्त्याच्या रुंदीमध्ये दुरुस्ती व सेवा रस्ता रद्द करणेबाबतचा प्रस्तावाअनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद, सिन्नर यांना पत्रव्यवहार करुन त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन योग्य कार्यवाही करणे.	

	४) भुसावळ नगरपरिषद हद्दीतील चौकांच्या संकल्पना चित्रास मंजूरी देणेबाबत.	४) मुख्य कार्यालयाकडील दि.२८/८/२०२३ रोजीच्या तोंडी सूचनेनुसार Transit Oriented Development (TOD)ची online meeting attend करण्यात आली.		४) माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त माहिती अधिकार अर्जांच्या अनुषंगाने अर्जदार यांना माहिती पुरविण्यात आली.		४) माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त माहिती अधिकार अर्जांच्या अनुषंगाने अर्जदार यांना माहिती पुरविणे.
	५) मुदखेड नगरपरिषद हद्दीतील चौकांच्या संकल्पना चित्रास मंजूरी देणेबाबत ६) BPMS संगणक प्रणालीमध्ये विकास / बांधकाम परवानगी देताना गती येण्याच्या दृष्टीने व प्रलंबित online tickets चे निराकरण तातडीने करण्यासाठी मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.सहसंचालक, नगर रचना, डिजीटल प्लॅनिंग सेल, पुणे यांचे देखरेखीखाली BPMS Control Team नेमण्याच्या सूचना मा.प्रधान सचिव (१) यांनी दिल्या आहेत. त्यानुसार मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील कार्यालयीन आदेश दि.२१/८/२०२३ अन्वये उपसंचालक, नगर रचना वाहतूक व परिवहन पुणे कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.	५) Reforming Parking in the cities of Maharashtra या विषयाची मिटिंग Urban Works या संस्थेद्वारे दि.१५/३/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती ती attend करण्यात आली. ६)BPMS Control Team नुसार कामकाज केले आहे.				

	७) अर्जदार श्री.किरण माणिकराव यादव आम आदमी पार्टी तुळजापूर शहर अध्यक्ष यांनी विचारणा केलेल्या माहिती अनुषंगाने पत्रव्यवहार करण्यात आले.	७) करमाळा नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चे तरतूदीन्वये पाठविलेल्या प्रस्तावानुषंगाने वाहतुकीची सुलभता विचारात घेऊन, सदर चौकाचे संकल्पचित्र तयार करण्यात आले.				

(मूळ मसुदा मा.संचालक,नगर रचना यांनी मान्य केला असे)

(र.ना. बालमवार)
प्र. मुख्य प्रशासकीय अधिकारी
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.

नवीन नगरांचा विकास
Development of New Towns

प्रकरण ४ (१)

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प

१. प्रकल्प पार्श्वभूमी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प

सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ हे जगातील सर्वांत मोठ्या ग्रीनफिल्ड विमानतळांपैकी एक आणि देशातील पहिले अर्बन मल्टि एअरपोर्ट सिस्टीम ठरणार आहे. सिडकोच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेले हे विमानतळ नवी मुंबईला थेट जगाशी जोडणार असून नवी मुंबईबरोबरच राज्याच्या विकासासही गती देणारे ठरणार आहे.

प्रकल्प पार्श्वभूमी :

- मुंबई विमानतळाची सध्या ४८ दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष (एमपीपीए) इतकी क्षमता असून वर्ष २०३४ पर्यंत मुंबई महानगर प्रदेशातील अपेक्षित असलेल्या १०० दशलक्ष प्रवासी प्रती वर्ष हवाई प्रवास मागणीची पूर्तता करण्यासाठी नागरी विमान चालन मंत्रालयाने नवी मुंबईमध्ये ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यासाठी मंजुरी दिलेली आहे.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे या देशामध्ये विकसित करण्यास प्रस्तावित केलेल्या विमानतळांपैकी सर्वात मोठे ग्रीनफिल्ड विमानतळ असून ते प्रती वर्षी किमान ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२५ दशलक्ष टन माल वाहून नेण्यासाठी नियोजित केलेले आहे.
- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भारतातील पहिल्या बहु विमानतळ शहर पध्दतीचा एक भाग बनेल. सिडकोच्या इक्विटी अंशदानासह विशेष उद्देश कंपनीची उभारणी करुन सार्वजनिक खाजगी भागिदारीतून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्यात येत आहे. ११६० हेक्टर क्षेत्रामध्ये पसरलेल्या या विमानतळामध्ये दोन स्वतंत्र आणि समांतर धावपट्टया असतील, ज्यावरुन एकाचवेळी आणि स्वतंत्रपणे प्रवर्तन सुरु राहील तसेच धावपट्टयांच्या दोन्ही बाजूला पूर्ण लांबीचे समांतर टॅक्सी वे असतील. प्रकल्पाला पर्यावरण आणि वन व हवामान बदल मंत्रालयाकडून पर्यावरण आणि सीआरझेड निपटा-याविषयक मान्यता आणि वन/वन्य जीव निपटा-याविषयक मान्यता मिळालेली आहे आणि संरक्षण मंत्रालयाकडून संरक्षण विषयक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये

- मुंबई महानगर प्रदेशातील मध्यवर्ती ठिकाणी स्थित
- एकूण क्षेत्रफळ ११६० हे.
- प्रती वर्ष प्रवासी वाहतूक क्षमता - ९० दशलक्ष प्रवासी प्रतीवर्ष
- प्रती वर्ष एकूण विमानांचे परिचालन (मालवाहू विमानांसह) - ४,७९,०००
- गर्दीच्या वेळेतील एकूण विमान वाहतूक - १३,३००
- प्रतीवर्ष एकूण मालवाहू क्षमता (टन) ८ ३.२५ दशलक्ष
- दोन समांतर धावपट्ट्यांसह चार टॅक्सी वे

परिवहन जोडणी

वर्तमानातील परिवहन जोडणी

- शीव-पनवेल द्रुतगती महामार्ग
- राष्ट्रीय महामार्ग ४ (मुंबई पुणे महामार्ग)
- मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग
- आम्र मार्ग
- पाम बीच मार्ग
- ठाणे-बेलापूर मार्ग
- अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक)

वर्तमानातील रस्ते जोडणी

- सांताक्रूझ चेंबूर जोड मार्ग व शीव-पनवेल द्रुतगती महामार्ग
  - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि पश्चिम पनगरांदरम्यान जोडणी
- पूर्व उन्नत मुक्त मार्ग व अटल सेतू
  - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि दक्षिण मुंबई दरम्यान जोडणी

प्रस्तावित परिवहन जोडणी

- जलवाहतूक टर्मिनल
- अटल सेतू (एम.टी.एच.एल.) ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे किनारी मार्ग
- ठाणे ते नवी मुंबई विमानतळ उन्नत मार्ग
- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रो मार्ग क्र. ८
- नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र.२ : तळोजा - कळंबोली - खांदेश्वर - एन. एम. आय. ऐ. पूर्व बाजू
- एन. एम. आय. ऐ. पश्चिम परीघ रोड

प्रकल्पाची सद्यस्थिती

- आजतागायत सिडकोतर्फे ११६० हेक्टर क्षेत्र प्रवेश आणि मार्गाधिकारासाठी अनुज्ञप्ती एनएमआयएएलला प्रदान करण्यात आली आहे.
- सिडकोतर्फे ५.५ मीटरपर्यंत भूविकास, उलवे नदीचा प्रवाह वळविणे आणि उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थानंतरण, ही विकासपूर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
- ८ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे उद्घाटन झाले.
- २५ डिसेंबर, २०२५ पासून देशांतर्गत विमान सेवा सुरु झाली आहे.

*****

नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

कार्यक्रम अंदाजपत्रक

२०२६-२०२७

प्रकरण ४ (३)

नागपूर सुधार प्रन्यास

नागपूर सुधार प्रन्यासाची कार्यपद्धती व कार्यवृत्तांत

नागपूर सुधार प्रन्यासाची स्थापना :

नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) हि संस्था तत्कालीन मध्यप्रांत आणि वऱ्हाड राज्याच्या नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, १९३६ अन्वये १ जानेवारी, १९३७ ला अधिस्थापित झाली. तेव्हाच्या नागपूर शहराचा आणि तद्नंतर नागपुर महानगराचा विस्तार आणि विकास सुसंबद्ध रीतीने व्हावा हा नासुप्रचे निर्मितीचा मूळ उद्देश आहे. नागपुर सुधार प्रन्यास अधिनियम, १९३६ चे प्रमुख वैशिष्टय हे आहे की, त्या अंतर्गत हाती घेऊन पार पाडावयाच्या विविध योजनांनुसार नागपूर महानगरपालिकेच्या सीमेतील अथवा शासनाने ही सीमा वाढवून दिल्यास त्या सीमेतील जमिनीचे संपादन करणे, त्यात रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या वाहिका, मलवाहिका, स्टॉर्म वॉटर, ड्रेन्स आदी नागरी सुविधांची निर्मिती करून विविध उपयोगासाठीचे भूखंड पाडून त्यांचे वाटप करणे हे काम प्रथमच एका वैधानिक सार्वजनिक संस्थेला सोपविण्यात आले. जेव्हा नागपूर सुधार प्रन्यासची स्थापना झाली तेव्हा नागपूर शहरामध्ये नगरपालिका अस्तित्वात होती. स्थापनेच्यावेळी नागपूर ही तत्कालीन मध्यप्रांत आणि बऱ्हाड या राज्याची राजधानी होती. नागपुर शहरामध्ये नागपुर महानगर पालिकेची स्थापना नागपुर महानगरपालिका अधिनियम १९४८ अन्वये जरी झाली असली तरी हा अधिनियम दिनांक २ मार्च, १९५१ साली लागू झाला. नागपूर हे राजधानीचे शहर असल्यामुळे त्याचा विकास सुसंबद्ध रीतीने व्हावा व तेथे रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मलवाहिका, इत्यादी व्यवस्था दर्जेदार व्हावी हा नागपूर सुधार प्रन्यासचा स्थापनेचा मुख्य उद्देश हाता.

नागपूर महानगरपालिकेचे मुख्य कार्य म्हणजे नागपूर शहरामध्ये नागरी सुविधांचे व्यवस्थापन करणे, मुख्यत्वेकरून सार्वजनिक आरोग्य जोपासणे, स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, स्वच्छता ठेवणे, सांडपाण्याची व्यवस्था ठेवणे अशी कामे नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमाच्या धारा १ (२) अन्वये नागपुर सुधार प्रन्यासचे कार्यक्षेत्र नागपूर शहराच्या बाहेर देखील शासनाच्या मंजुरीने वाढविता येते, म्हणजे नागपुर सुधार प्रन्यास के कार्यक्षेत्र नागपुर महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रा पुरते मर्यादित नसून विस्तारित अशी व्यवस्था आहे. या प्रावधानाचा उपयोग प्रथमतः नागपूर शहरामध्ये ड्रेनेज अँड डिस्पोजल योजना १९४८ साली करण्यात आला. नागपुर सुधार प्रन्यासने या प्रवधाना अंतर्गत नासुप्रचे कार्यक्षेत्र त्या वेळेच्या शहराच्या कार्यक्षेत्राबाहेर वाढवून घेतले व ही योजना कार्यान्वित होण्यासाठी शासनाने अमरावती रोडवर नागपूर महानगरपालिकेचे अधिकार क्षेत्राबाहेर नासुप्रचे अधिकार क्षेत्र वाढवून दिले.

व्यवस्थापन मंडळ

नागपूर सुधार प्रन्यासचे व्यवस्थापन व कार्य करण्याचे दृष्टीने नासुप्र अधिनियमामध्ये विश्वस्त मंडळ स्थापन करण्याचे प्रावधान आहे. विश्वस्त मंडळाचे सभापती या पदावर शासनाच्या सचिव किंवा आयुक्त या श्रेणीच्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनाद्वारे केली जाते इतर सदस्य पुढीलप्रमाणे असतात :—

(१) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपुर - पदसिद्ध सदस्य,

(२) उप संचालक, नगर रचना, नागपुर विभाग नागपुर - पदसिद्ध सदस्य,

(३) अध्यक्ष, स्थायी समिती, नागपुर महानगरपालिका, नागपुर पदसिद्ध सदस्य,

(४) नागपूर महानगरपालिकेकडून निवडलेला एक नगरसेवक,

(५) नागपूरचा नागरिक असलेला विधानसभेद्वारे एक निर्वाचित आमदार सदस्य,

(६) शामनाद्वारे नियुक्त तीन सदस्य.

यावरून असे दिसून येईल की, नासुप्रला लोकाभिमुख करण्यासाठी पुरेसे जनप्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

नागपूर सुधार प्रन्यासचे कार्यक्षेत्र :

शासनाच्या दि. २७.०२.२००२च्या (क्र. टीपीएस २४०१-८४४- सिआर-७६-यूडी ९) अधिसूचनेप्रमाणे नागपूर शहरातील अंदाजे ७२०८.७६ हेक्टर क्षेत्र नियोजन प्राधिकरण म्हणून नासुप्रकडे आहे.

योजनेचे नांव	क्षेत्र (हेक्टर)
(१) इस्टर्न इंडस्ट्रियल एरिया स्ट्रीट स्किम	३२०.६० हेक्टर
(२) इतवारा स्टेशनरोड स्ट्रीट स्किम	४.७७ हेक्टर
(३) सीताबर्डी इम्प्रूव्हमेंट स्किम	६.१५ हेक्टर
(४) अभ्यंकर रोड वृटीमहल स्ट्रीट स्किम	३.२४ हेक्टर
(५) वाठोडा एक्सटेंशन हौ. अकोमोडेशन स्किम	१७०.०० हेक्टर
(६) शिवणगाव जयताळा टाऊनशिप	०५७.०० हेक्टर
(७) ग्रिनबेल्ट कंट्रोल स्किम	६४४६ हेक्टर
एकूण :—	७२०८. ७६ हेक्टर

कार्यपद्धती :

नासुप्र अधिनियम, १९३६ च्या धारा २७ मध्ये नागपूर सुधार प्रन्यासला खालील योजना घेण्याचे प्रावधान होते :-

(अ) सर्वसाधारण विकास योजना (जनरल इम्प्रोवमेंट स्कीम),

(ब) पुननिर्माण योजना (रि बिल्डिंग स्कीम),

(क) पुनर्बांधणी योजना (रि- हाऊसिंग स्कीम),

(ड) रस्ते योजना (स्ट्रीट स्कीम),

(ई) डेफर्ड रस्ते योजना (डेफर्ड स्ट्रीट स्कीम),

(फ) विकास योजना (डेव्हलोपमेंट स्कीम),

(ग) निवास योजना (हाऊसिंग अकोमोडेशन स्कीम),

(घ) भावी विस्तार अथवा सुधार योजना (फ्युचर एक्सपोशन और इम्प्रोवमेंट स्कीम)

(च) जल व मल निम्मा:रण योजना (ड्रेनेज अँड ड्रेनेज इनकॅल्युडिंग मेवरेज डिस्पोजल स्कीम), वरील योजना स्वतंत्रपणे अथवा दोन किंवा तीन योजनांचा संगम करून कार्यन्वित करण्यात येतात. या प्रावधानाअंतर्गत नासुप्रने विविध प्रकारच्या एकूण ५२ विकास योजना राबवल्या आहेत.

नागपूर सुधार प्रन्यासाद्वारे भूमी संपादन व विकासाचा तपशील :

वरील विविध योजनांद्वारे नासुप्रने ७,९९० हेक्टर एवढी जमीन संपादित करून त्यात रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या वाहिका, मलवाहिका, पावसाळी पाणीवाहिका, आदि विकासाची कामे करून २३८ अभिन्यासाची (लेआऊट) निर्मिती केली आहे. या अभिनयसातील एकूण ५८,३५४ भूखंडाचे वाटप विविध योजनांतर्गत विविध उपयोगासाठी नासुप्रने केले आहे. वरील ५२ योजना या सर्वथा नागपूर सुधार प्रन्यासच्या निधीमधूनच कार्यान्वित केल्या आहेत. नागपुर सुधार प्रन्यास अधिनियमांचे प्रावधानानुसार भूसंपादन अधिनियम तरतुदीनुसार भूसंपादन करण्यात येते.

अभिन्यासाचा विकास करण्यासाठी त्यामध्ये रस्ते, पिण्याचा पाण्याच्या वाहिका, मलवाहिका, पावसाळी पाणीवाहिका, आदी विकासाची कामे नासुप्रने स्वतःच्या निधीतून केली आहेत. नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमाच्या धारा ५७ च्या प्रावधानानुसार मूलभूत सुविधा उपलब्ध करून विक्रमीन अभिन्यास नागपूर महानगपालिकेला देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरित करावयाची असते. वेळोवेळी नासुप्रने असे हस्तांतर केले आहे.

नासुप्र जमीन विनियोग नियम, १९८३ अंतर्गत भूखंडाचे वाटप करण्यात येते. यामध्ये सर्व गरजू लोकांना समान संधी मिळून भूखंड प्राप्त करता आले आहेत. नासुप्रद्वारे मोठ्या प्रमाणावर सर्व नागरी सोयीयुक्त भूखंड उपलब्ध झाल्यामुळे नागपूर शहरात रुंद रस्ते, सांडपाण्याची उत्तम व्यवस्था ठेवणे शक्य झाले आहे. तसेच जमीन वाटपाचा व्यवहार शासनाद्वारे नियंत्रीत नागपुर सुधार प्रन्यास सारख्या संस्थेकडे असल्यामुळे वैयक्तिक लोकांना जमिनी गोठविता येणे शक्य झाले नाही.

नासुप्रद्वारे खुल्या जागा, खेळाची मैदाने व उद्यानांचा विकास :

नासुप्रने विकसीत केलेल्या अभिन्यासांमध्ये नियमाप्रमाणे खुल्या जागा, खेळाची मैदाने, सार्वजनिक उपयोगाच्या जागा व प्राथमिक शाळांसाठी जागेचे प्रावधान देखील आहे. प्राथमिक शाळांसाठी असलेल्या जागा जमीन विनियोग नियम, १९८३ नुसार नागपुर महानगरपालिका विना मोबदला हस्तांतरित करण्यात येतात. तसेच खुल्या जागा आणि खेळांची मैदाने देखील नागपुर महानगरपालिकेला विनामूल्य हस्तांतरित करण्याचे प्रावधान आहे. नासुप्रने ६० उद्याने विकसित केली आहेत. उदा. महात्मा फुले उद्यान, संत ज्ञानेश्वर उद्यान, सुवर्ण जयंती उद्यान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची कामे पूर्ण झालेले आहेत. याशिवाय महाराष्ट्र भूषण स्वरसम्राज्ञानी लता मंगेशकर, सक्करदरा तलाव उद्यान इ. महत्वाकांक्षी उद्यानाचे काम पूर्ण केलेले आहे. याशिवाय शहरामध्ये नासुप्रने वर्धा रोड व कामठी रोड वर लँड स्केपिंगची कामे देखील केली आहेत व या कामाची नागपूरकरांनी प्रशंसा केली आहे.

नागपुर शहरासाठी ड्रेनेज अँड सेवरेज डिस्पोजल स्कीम, १९४५-५० या दरम्यान तयार करून नासुप्रने कार्यान्वित केली आहे. त्याचप्रमाणे १९५३ साली सेवरेज अँड ड्रेनेज डिस्पोजल स्कीम पार्ट २ व १९५५ मामी पार्ट ३ शासनाकडून मंजूर करून या दोन्ही योजना १९५३ ते १९६५ पर्यंत नासुप्रने कार्यान्वित केल्या आहेत. भांडेवाडी येथे मलशुद्धीकरण योजना, सन १९५० मध्ये सुरु करून १९६५ पर्यंत कार्यान्वित केली व त्याद्वारे ५००० एकरमध्ये शेतीला सेवरेज डिस्पोजल आणि मलनिस्सारण योजनेमुळेच नागपूर शहरामध्य नागपुरकरांचे आरोग्य नागपूर महानगरपालिकेला सांभाळता आले.

नागपूर शहराची विकास योजना (डेव्हलपमेंट प्लॅन)

नागपूर शहराची सुधारीत प्रारूप विकास योजना नासुप्रने तयार करून ही प्रारूप विकास योजना म. प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २९ अन्वये दि. १७.०३.१९९४ ला जनतेकडून आक्षेप / सूचना / हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यात आली. आक्षेप / सूचना / हरकती यावर नियोजन समितीने सुचविलेले बदल विकास योजनेत दर्शवून ही प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलाम - ३० अन्वये शासनास मंजुरी करीता दि. ०९.०९.१९९३ ला सादर करण्यात आली. तद्नंतर शासनाने या विकास योजनेस उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये दि. ०७.०१.२००० रोजी भागशः व उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) अन्व्ये दि. १०.०९.२००१ ला अंतीम मंजूरी प्रदान केली व ही सुधारीत विकास योजना दि २१.०९.२००१ पासून अमलात आली. जनतेला आवश्यक मूलभुत सुविधा पुरविण्याच्या तसेच शहराच्या विकासाच्या दृष्टीने या मंजूर विकास योजनेत मिहान, एअरपोर्ट, कंपोस्ट डेपो, झोनल स्तरावरील बगीचे, शाळा, बाजार, दवाखाने इ. आरक्षणे प्रस्तावित केली आहे. त्यामुळे नागपूर शहराच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली.

नागपुर शहराचा अनधिकृत विकास झपाट्याने वाढत असल्याने यावर नियंत्रण आणण्याकरीता शासनाने दि. ३०.०४.२००१ रोजी प्रथम महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम (नियमितीकरण, श्रेणीवाढ व नियंत्रण) कायदा अंमलात आणला व या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने नागपूर सुधार प्रन्यासला नियुक्त केले. सदर कायदा नागपूर शहरात प्रभाविपणे राबविण्यात आला असून यामुळे नागपूर शहराचा विकास झपाट्याने झाला. यामध्ये सुधार प्रन्यासचा सिहांचा वाटा आहे.

महाराष्ट्र शासनाने नागपूर शहराची सुधारीत विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्याकरिता शासनाच्या नगर विकास विभागाने दि ०८.११.२०१६ रोजी मान्यता प्रदान केली आहे. या करीता नागपूर महानगरपालिकेद्वारे सर्वसाधारण सभेत दि २०.०६.२०१७ रोजी मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे संपूर्ण शहाराची विकास योजना सुधारीत करण्याकरिता नागपुर सुधार प्रन्यासने देखील सहमती कळवली आहे. शासनाच्या निर्देशानुसार नागपुर महानगरपालिकेकडून नागपूर शहरातील सुधारित विकास योजना दुसऱ्यांदा सुधारीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

नागपूर सुधार प्रन्यासच्या उत्पन्नाची साधने

नासुप्र अधिनियमामध्ये नागपूर सुधार प्रन्यास ही संस्था आत्मनिर्भर रहावी म्हणून उत्पन्नाची साधने निर्देशित केली आहेत ती येणेप्रमाणे :

(१) नासुप्र अधिनियम, १९३६ च्या धरा ८३ अंतर्गत नागपुर महानगरपालिकेतील मालमत्तांच्या १/२ ट एवढी रक्कम दर तिमाहीला (वार्षिक २ टक्के) वैधानिक अंशदान म्हणून देय आहे. यानुसार मनपा कडून मार्च २०२५ पर्यंत खालीलप्रमाणे रक्कम घेणे आहे.

वैधानिक अंशदान	९०३८.७७
पाचपावली उड्डाण पूल	६६.००
एजन्सी तत्वावर केलेली कामे	४०५, ६०

एकूण रु. ९५१०.३७ देय झालेली असून यापैकी रु. ७९३७.८९ लक्षत्रे समायोजन नासुप्रला घेणे असलेल्या राशीमधून करण्यात आलेले आहे.

(२) या समायोजनांतर नागपुर सुधार प्रन्यासला नागपुर महानगरपालिकेकडून रु. १५७२.४८ लक्ष घेणे आहे.

(३) नासुप्र अधिनियम १९३६ च्या धारा ७७ अंतर्गत नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील मालमत्तेच्या विक्री आदि व्यवहारावर भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ द्वारे आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क त्या व्यवहाराच्या मूल्यावर १/२ टक्के ने वाढविण्यात येऊन ते नासुप्रला देय आहे. शासनाद्वारे देय रक्कम सन ९७१-७२ ते २०२४- २०२५ पर्यंत रु. ४६३.३९ कोटी होते. या पैकी शासनाकडून रु. ३३१.९७ कोटी प्राप्त झाली आहे. आता शासनाकडे रु. १३१.४२ कोटी एवढी राशी देय झाली आहे.

(४) नासुप्रने वाटप केलेल्या भूखंडाच्या किंमतीवर (प्रव्याजीच्या २ टक्के) वार्षिक भुभाटक नासुप्रला देय आहे.

नागपूर सुधार प्रन्यासचे आस्थापनेवर असलेला तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्ग :

नागपुर सुधार प्रन्यासकडे प्रशासकीय बाबीसाठी कार्यकारी अधिकारी असतो. त्यांच्या अधिपत्याखाली ०० आस्थापना अधिकारी, ०१ विधी अधिकारी, वर्ग १ व १ प्रशासकीय अधिकारी वर्ग - २ मध्ये ०३ कर्मचारी व शाखा अधिकारी ११ इत्यादी नासुप्रच्या सर्व संपत्ती व व्यवस्थापनामध्ये कार्यरत आहे. विकास कामासाठी तांत्रिक विभाग असून या विभागाचे प्रमुख मुख्य अभियंता आहेत. त्यांचे अधिपत्याखाली अधिक्षक अभियंता -०१, ०२-कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व ०० यांत्रिकी कार्यकारी अभियंता असून सहाय्यक अभियंता श्रेणी - १, सहाय्यक अभियंता श्रेणी (स्थाप.) - १३, नगर रचनाकार- ०१, सहाय्यक अभियंता श्रेणी (२) - १३, शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता ३५, स्थापत्य अभियांत्रिकी महाय्यक - ५२, सन २०२५-२०२६ मध्ये नागपूर सुधार प्रन्यासमध्ये एकूण अधिकारी व कर्मचारी कार्यरत संख्या २६७ व मंजूर संख्या ६४६ आहे. याव्यतिरिक्त मेट्रो विकासाच्या कामाकरिता आस्थापनेवर कार्यकारी अभियंता यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी - ०, लेखा अधिकारी १ यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. नासुप्रमध्ये उच्च पदवी विभूषित व कार्यक्षम अधिकारी वर्ग कार्यरत आहे.

नागपूर सुधार प्रन्यासच्या अंदाजपत्रकातील खालील सर्व प्रकल्प वगळण्यात आलेले असुन नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकात घेण्यात आलेले आहे :

- शांतीवन, चिचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैयक्तिक वापराच्या वस्तूंचे जतन व संरक्षण/संवर्धन करणे कामी संग्रहालयाचे आधुनिकीकरण करणे व परिसराचे सुशोभीकरण.
- उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्रातील कामठी रोड लगत ग्रेन गोडाऊन चे जागेवर "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्व्हशन सेन्टर" चे बांधकाम.
- श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी ता. कामठी, जिल्हा नागपूर या तीर्थस्थळाचा विकास प्रकल्प.
- नागपूर शहरात गरीब लोकांकरिता प्रधानमंत्री आवास योजना (सर्वांना घरे २०२२) अंतर्गत परवडणारी घरे (Affordable Housing) बांधण्याबाबत.
- विभागीय क्रिडा संकुलाची उर्वरित कामे नागपूर सुधार प्रन्यासद्वारे करण्याबाबत.
- मेयो सर्वोपचार रुग्णालय, नागपुर या संस्थेसाठी यंत्रसामुग्री खरेदी करण्याबाबत.
- आदिवासी मुलांचे वस्तीगृह, मौजा चिखली (देव), खसरा क्र. ४०३/१, १०३ /२ आणि मौजा पारडी खसरा क्र. १४/३, भूखंड क्र. पी येथे बांधकामाबाबत.
- मोठा ताजबाग, नागपूर येथील हजरतबाबा ताजुद्दिन दर्गा परिसराचे विकास आराखड्यांच्या कामाबाबत.
- मौजा चिखली (देवस्थान) येथिल उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर (पूर्व) चे बांधकाम करण्याबाबत.
- नागपूर येथील लकडगंज पोलीस स्टेशन परिसरात प्रस्तावित पोलीस स्टेशन व पोलीस कर्मचान्यांकरिता ३४८ निवासी गाळ्यांच्या प्रकल्पाबाबत.
- मौजा वाठोडा येथील सर्व सामान्य लोकांना परवडणाऱ्या घरकुल योजनेबाबत.
- नागपूर शहरात १० एस.टी.पी. ने बांधकाम.
- दिक्षाभूमी चौकातील मौजा लेंडरा ख. क्र. २५७/१ येथील अस्तित्वातील संत चोखामेळा वस्तीगृहाच्या १००३०.५० चौ. मी. जागेत १००० मुलांचे वस्तीगृहांच्या प्रस्तावित बांधकामाबाबत.
- शांतीवन चिचोली खसरा क्र. १२८ येथील ११.५० एकर जागेवर अस्तित्वात असलेल्या वस्तुसंग्रहालयाचे नुतनीकरण व सभोवतालच्या परिसराचे सौदर्यीकरण व उर्वरित बांधकाम.
- स्व. वंसतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजना अंतर्गत नागपुर येथे २००० आसन क्षमतंत्र सभागृह बांधकाम.
- पर्यटन विकास योजने अंतर्गत "मी प्लेन" प्रकल्प.
- स्वदेश दर्शन योजने अंतर्गत धापेवाडा पारडसिंगा आदासा (Religious Circuit) च्या विकासआराखड्यास मंजूरी प्रदान करण्याबाबत.
- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने (National Lake Conservation Plan) अंतर्गत कोराडी तलाव संवर्धन प्रकल्प.

- दिक्षाभूमी स्तुपाचे नूतनीकरण व मजबुतीकरणाच्या कामाबाबत.
- बुद्धिस्ट सर्कीट अंतर्गत दिक्षाभूमी नागपूर, शांतीवन चित्रोली व ड्रॅगन पॅलेस कामठी जिल्हा नागपूरच्या विकास कामाबाबत.
- नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस टेम्पल या पर्यटन स्थळ परिसरात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयासमोरील प्रांगणात संविधान प्रस्ताविका पार्कची उभारणी करण्याबाबत.
- फुटाळा तलाव येथे संगीत कारंजे, लाईट व लेझर मल्टीमीडिया शो तसेच अंबाझरी उद्यान येथे स्वामी विवेकानंद यांचे जीवनावर आधारित लाईट, साऊंड व मल्टीमीडिया शो.
- सक्करदरा तलाव सौदर्यीकरण, इत्यादी प्रकल्प नामप्रविप्रा ला वळती करण्यात आलेले आहे.

अंदाजपत्रकामधील ठळक वैशिष्टये

नागपूर सुधार प्रन्यासचे सन २०२५-२०२६ या वर्षाचे अर्थसंकल अंदाजपत्रकानुसार सुरवातीची शिल्लक धरून एकूण जमा रु. १५०७.७९ कोटी अपेक्षीत आहे. यात भांडवली जमा रु. ९७५.१७ कोटी, महसुली जमा रु. १५३.२२ कोटी आणि अग्रिम व ठेवी जमा रु. ५८.६१ कोटींचा समावेश आहे.

नागपुर सुधार प्रन्यासधारे सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात भांडवली खर्च रु. ६४५.०४ कोटी, महसूली खर्च रु. २०९.९१ कोटी आणि अग्रिम व ठेवी रु. ९२.१५ कोटी असे एकूण रु. १४०५.१३ कोटी विविध विकास कामावर खर्च करण्यात येणार आहे.

(१) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात नासुप्र निधीतून घर बांधणी कार्यक्रम अंतर्गत रु. १० कोटी व भूखंड व दुकानाच्या भाडेपट्याद्वारे प्रत्याजी रु. ८० कोटी जमा अपेक्षीत आहे.

(२) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांमध्ये ५७२ आणि १९०० अभिन्यासामध्ये एकंदर रु. ६६.५० कोटी प्राप्त होणे अक्षेपित असून ५७२ आणि १९०० अभिन्यासामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रु. १५६.०० कोटी खर्च करण्यात येत आहे.

(३) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांमध्ये नासुप्र निधीतून विकासाची विविध कामे व रस्त्यांचे डांबरीकरण या शीर्षा अंतर्गत रु.७०.०० कोटी खर्च करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.

(४) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांमध्ये दलित वस्ती सुधार योजना आमदार निधी, खासदार निधी, मौजा मानेवाडा येथील ई- लायब्ररी, इस्लामिक कल्चरल सेंटरचे बांधकामाकरीता व इतर शासकिय निधीचे कामाकरीता रु. ७९१.२६ कोटी चे प्रावधान केलेले आहे.

(१०) आस्थापनीय खर्च

- सर्व कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते (७ व्या वेतन आयोगाच्या अतिरीक्त तरतुदीचा समावेश) (आस्थापना खर्च) रु. ७२.१३ कोटी.
- कार्यालयीन खर्च करीता रु. २.२३ कोटी तरतूद आहे.
- आकस्मिक खर्च करीता रु. १५.५५ कोटी ची तरतूद आहे.

नागरी परिवहन
Urban Transport

प्रकरण-५

नागरी परिवहन प्रकल्प

राज्यातील मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक व पुणे या शहरांमध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प ही नवीन सार्वजनिक वाहतूक प्रणाली विकसित करण्याचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या शहरामधील रेल आधारीत मेट्रो रेल्वे प्रकल्पास राज्य शासनाने वेगवेगळ्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

(१) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP-2) :

मुंबईमधील उपनगरीय रेल्वे सेवांमध्ये आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीने मुंबई रेल्वे विकास महामंडळाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ (MUTP-2) चा आराखडा तयार केला आहे. महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांनी या प्रकल्पास मान्यता दिली आहे. भारत सरकार व जागतिक बँक यांच्यामध्ये दिनांक २३ जुलै २०१० रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या प्रकल्पाचा खर्च राज्य शासन व केंद्र शासन ५०:५० या प्रमाणात करणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ५३०० कोटी (एमयुटीपी-२अ रु.३६६१ कोटी व एमयुटीपी-२ब - रु.१६६९ कोटी) इतका आहे. एमयुटीपी-२अ प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून रु. १९१० कोटी कर्ज घेण्यात आले आहे. एमयुटीपी-२अ प्रकल्पामध्ये रेल्वे डब्यांची खरेदी, रेल्वे गाड्यांची देखभाल व्यवस्था, ट्रिसपास कंट्रोल उपाययोजना, तांत्रिक सहाय्य, इत्यादी घटक प्रकल्पांचा समावेश असून एमयुटीपी-२ब मध्ये सीएसएमटी-कुर्ला दरम्यान ५ वी व ६ वी मार्गिका, ठाणे-दिवा दरम्यान ५ वी व ६ वी मार्गिका, हार्बर लाईनचा विस्तार, रेल्वे स्थानकांची सुधारणा, ट्रेसपास कंट्रोल उपाययोजना इत्यादी घटक प्रकल्पांचा समावेश आहे. एमयुटीपी-२अ अंतर्गत घटक प्रकल्पांची अमंलबजावणी कार्यवाही पूर्ण झाली असून एमयुटीपी-२ब मधील काही घटक प्रकल्प पूर्ण झाले आहेत तर काही अंमलबजावणीच्या विविध टप्यात आहेत. सदर प्रकल्पावर प्रकल्प अंमलबजावणी संस्था, मुंबई रेल्वे विकास महामंडळ प्रथम खर्च करते, झालेल्या खर्चाच्या ५० टक्के खर्च महाराष्ट्र शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबई रेल्वे विकास महामंडळास अदा करण्यात येतो व मुंबई रेल्वे विकास महामंडळ केलेल्या खर्चाचे प्रतिपूर्ती दावे जागतिक बँकेस खर्च केल्यानंतर सादर करते. जागतिक बँकेने सदर प्रतिपूर्ती दावे मंजूर केल्यानंतर तेवढीच रक्कम जागतिक बँकेकडून केंद्र शासनास वितरित केली जाते. तद्नंतर, त्यामधील राज्य शासनाच्या हिश्श्याची म्हणजेच ५० टक्के रक्कम अतिरिनियुक्त केंद्रीय सहाय्य म्हणून राज्य शासनास वितरित केली जाते व सदर रक्कम अर्थसंकल्पीत करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला वितरित करण्यात येते. सदर प्रकल्पाची आतापर्यंत एकूण ८७ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(२) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ (MUTP-3) :

मुंबई उपनगरी रेल्वे सेवामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१ व टप्पा-२ च्या धर्तीवर रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांचा ५०:५० टक्के आर्थिक सहभाग तत्त्वावर मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ (MUTP-3) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पात विरार-डहाणू दरम्यान रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण करणे, कर्जत-पनवेल मार्गाचे दुपदरीकरण करणे, ऐरोली-कळवा दरम्यान उन्नत रेल्वे मार्ग बांधणे. नवीन रेल्वे गाड्या खरेदी करणे, पश्चिम रेल्वे मार्गाच्या मध्य विभागात ट्रेस पास कंट्रोल बांधणे, तसेच तांत्रिक सहाय्य अशा कामांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांनी या प्रकल्पास मान्यता दिली आहे. या प्रकल्पाचा खर्च केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत ५०:५० टक्के या प्रमाणात करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. १०९४८ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पासाठी रू.३५०० कोटी रक्कमेचे एआयआयबी बँकेचे केंद्र व राज्य शासनाकडून समप्रमाणात कर्ज घेण्यात आले आहे व उर्वरित रु. ७४४७ कोटी रक्कम राज्य व केंद्र शासनाने वहन करावयाची आहेत. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक हिश्श्याचा भार काही प्रमाणात सिडको तर उर्वरित मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मार्फत सोसावयाचा आहे. सदर प्रकल्पाची आतापर्यंत एकूण ६५ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(३) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3A) :

मुंबई उपनगरी रेल्वे सेवामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीने भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१, २, ३ च्या धर्तीवर रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांचा ५०:५० टक्के आर्थिक सहभाग तत्त्वावर मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3A) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाच्या अंलबजावणीस राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने काही घटक प्रकल्प वगळून माहे मार्च, २०१९ मध्ये प्रकल्पास मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पात सीएसएमटी-पनवेल, सीएसएमटी-कल्याण व चर्चगेट-विरार रेल्वे मार्गिकेवर सीबीटीसी प्रणाली लागू करणे, रेल्वे स्थानकांचा विकास व नव्या रेल्वे गाड्या खरेदी करणे, रेल्वे गाड्यांची देखभाल सुविधा, तांत्रिक सहाय्य, कल्याण-बदलापूर दरम्यान ३री व ४ थी मार्गिका टाकणे, बोरीवली-विरार दरम्यान ५वी व ६वी मार्गिका टाकणे, कल्याण व आसनगाव दरम्यान ४ थी मार्गिका टाकणे, गोरेगाव ते बोरिवली हार्बर मार्गिकेचा विस्तार, कल्याण जंकशन येथे लांब पल्ल्याच्या व उपनगरीय रेल्वे मार्गिकांचे विभाजण करणे इ. महत्वाच्या कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा खर्च केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत ५०:५० टक्के या प्रमाणात करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.३३६९० कोटी इतका आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक हिश्श्याचा भार काही प्रमाणात सिडको, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका यांनी सोसावयाचा आहे. सदर प्रकल्पास राज्य शासनाने दि. ११ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत मान्यता प्राप्त केली आहे. सदर प्रकल्पाची आतापर्यंत एकुण १६ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(४) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3B) :

मुंबई उपनगरी रेल्वे सेवामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीने भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१, २, ३ च्या धर्तीवर रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांचा ५०:५० टक्के आर्थिक सहभाग तत्त्वावर मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3B) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाच्या अंलबजावणीस राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पात बदलापूर-कर्जत दरम्यान ३री व ४ थी रेल्वे मार्गिकांची उभारणी (३२.४३ किमी) आसनगाव ते कसारा दरम्यान चौथी रेल्वे मार्गिका (३४.९६६ किमी) व पनवेल ते वसई दरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर (६९.२२६

किमी) उभारणी इ. महत्त्वाच्या कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा खर्च केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत ५०:५० टक्के या प्रमाणात करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. १४९०७.४७ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पामध्ये राज्य शासनाच्या हिश्याची ५० टक्के रक्कम रु, ७४५३.७३ कोटी थेट राज्य शासनामार्फत अर्थसंकल्पाद्वारे देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो रेल्वे प्रकल्प

(१) मुंबई मेट्रो मार्ग -१ :

वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा मेट्रो प्रकल्प ११.४० कि.मी. लांवी व १२ स्थानके असलेला उन्नत मार्ग प्रकल्प आहे. सदर प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येत आहे. सदरहू प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, रिलायन्स् एनर्जी लिमिटेड व व्हेवोलिया ट्रान्सपोर्ट, फ्रान्स् यांच्या संयुक्त् विद्यमाने मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड या विशेष उद्देश वहन (च्ज्) ची स्थापना करण्यात आली. या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. २३५६.०० कोटी आहे. सदरहू मार्गिका दि.०८ जून, २०१४ पासून प्रवाशी वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पूर्व व पश्चिम उपनगरांचा भाग पश्चिम व मध्य रेल्वे यांना जोडला गेला आहे. तसेच उपनगरीय पश्चिम व मध्य रेल्वे सेवेच्या अनुक्रमे अंधेरी व घाटकोपर स्थानकावर अदलाबदल करण्याची सुविधा उपल्ब्ध झाली असून एम. आय. डी. सी., सीप्स् व इतर परिसरात असलेल्या उद्योजकांना या मेट्रो प्रकल्पामुळे वाहतुक सेवेची व्यवस्था उपलब्ध झाली आहे.

(२) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-२अ :

मुंबई मेट्रो मार्ग-२अ [दहीसर चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा-अ दहीसर(पू.) डी. एन. नगर] या (लांबी १८.६ कि.मी. स्थानके-१७) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ६४१० कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबवणार आहे. या प्रकल्पासाठी एडीबी व एनडीबी या आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी एमएमआरडीएने स्वनिधीतून रु. १८९२ कोटी उपलब्ध करावयाचे आहेत. केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/स्थानिक करांसाठी मिळून प्रकल्प रु.७५७.५० कोटी राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदरहू मार्गिका दि. १९ जानेवारी २०२३ पासून प्रवाशी वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे.

(३) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-२ब :

मुंबई मेट्रो मार्ग-२ब (डी.एन.नगर-मंडाळे) (लांबी २३.६ कि.मी. स्थानके-२०) या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १०९८६ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. या प्रकल्पासाठी एडीबी व एनडीबी या आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणाने स्वनिधीतून रु. ३७११ कोटी उपलब्ध करावयाचे आहेत. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. १२९० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ८९.३० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(४) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन ३ :

मुंबई मेट्रो लाईन- ३ (कुलाबा-बांद्रा-सिप्झ) या (लांबी ३३.५ कि.मी. स्थानके-२७) प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. २३१३६ कोटी आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० टक्के समभाग असलेल्या संयुनियुक्त मालकीच्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वाहन (एसपीव्ही) कंपनीकडून राबविण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो-३ प्रकल्पातील केंद्र शासनाचा आर्थिक सहभाग (इक्विटी) हा समभाग व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरूपात राहणार आहे. तसेच राज्य शासनाचा सहभाग देखील हा बिनव्याजी दुय्यम कर्ज स्वरूपात राहणार आहे. या प्रकल्पातील राज्य शासनाच्या समभागाची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वहन करावयाची आहे. सदर प्रकल्पासाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून कर्ज सहाय्य घेण्यात आले आहे. असा प्रकल्पाचा सर्व निधी हा सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनीकडे सुपूर्द करावयाचा आहे. कर्जाची परतफेड या विशेष हेतू वाहन कंपनीने करावयाची आहे.सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील राज्य शासनाचा समभाग रु. २४०२.७ कोटी शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असून केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच खाजगी जमीन संपादन व पुनर्वसन याकरिता एकूण रु. २४२१.१० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहे. जपान अंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून रु. १३२३५ कोटी इतके कर्ज सहाय्य घेण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाच्या कामास केंद्र शासनाने जुलै, २०१३ व राज्य शासनाने जुलै, २०१४ मध्ये रु. २३,१३६ कोटी खर्चाच्या प्रकल्पास मान्यता प्रदान केली होती. सदरहु प्रकल्प डिसेंबर, २०२१ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजित होते. तथापि, मुंबईची स्थानिक व भौगोलिक परिस्थिती पाहता प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान आलेल्या तांत्रिक अडचणी, जमीन अधिग्रहणामधील किंमतवाढ, पुनर्वसन तसेच कोविड-२०१९ व कारशेडच्या जागा निश्चितीबाबतचे असलेले प्रश्न विचारात घेऊन मूळ प्रकल्प किंमत रु. २३,१३६ कोटीमध्ये रु. १०,२६९.८२ कोटी इतक्या रक्कमेने वाढ झाल्याने प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास रु.३३,४०५.८२ कोटी खर्चाच्या सुधारीत वित्तीय सहभाग आराखड्यासह राज्य शासनाने दि. २५ ऑगस्ट, २०२२ रोजी तत्वतः मान्यता दिली आहे. यामध्ये Japan International Cooperation Agency वित्तीय संस्थेकडून अतिरिनियुक्त कर्ज घेण्यास तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वाढीव वित्तीय हिश्शास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या सुधारीत प्रकल्प किंमतीस केंद्र शासनाने दि. २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

दि. ०८ ऑक्टोबर, २०२५ पासून सदरहू संपूर्ण मार्गिका प्रवाशी वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे.

(५) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन ४ :

मुंबई मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) (लांबी ३२.५ कि.मी. स्थानके-३०) या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १४५४९

कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी केएफडब्ल्यु या आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ५९६१ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु.३६९३ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ८६.४० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(६) मुंबई मेट्रो मार्ग ४अ :

मुंबई मेट्रो मार्ग-४अ (कासारवडवली-गायमुख) (मेट्रो लाईन-४अ चा विस्तार) या (लांबी २.७ कि.मी. स्थानके-२) मेट्रो प्रकल्पास मा. मंत्रिमंडळाने दिनांक २७ नोव्हेंबर २०१८ रोजी मान्यता दिली आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य व उर्वरित निधी वित्तिय संस्थेकडून कर्ज सहाय्य या माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ९४९ कोटी इतका आहे. या प्रकल्पासाठी केएफडब्ल्यू या आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ५१७.५१ कोटी, राज्य शासनामार्फत केंद्रीय कराच्या (५० टक्के) आणि राज्य शासनाच्या कराच्या (१०० टक्के रक्कम व जमिनीचा खर्च याकरिता रु. १५७.७७ कोटी इतके दुय्यम कर्ज व उर्वरित आंतरराष्ट्रीय बँकेचे कर्ज अशा प्रकारे निधी उभारावयाचा आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ९५.४० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(७) मुंबई मेट्रो मार्ग-५ :

मुंबई मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या (लांबी २४.९ कि.मी. स्थानके-१५) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ८४१६.५१ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ४७०७ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच जमिनीची किंमत याकरिता एकूण रु. १३५२.२५ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून राज्य शासनाकडून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून ठाणे-भिवंडी या टप्पा-१ मध्ये आतापर्यंत ९६.५० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(८) मुंबई मेट्रो मार्ग-६ :

मुंबई मेट्रो मार्ग ६ (स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-विक्रोळी) (लांबी १४.५ कि.मी. स्थानके-१३) या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ६७१६ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्र शासनाचे कर ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच जमिनीची किंमत याकरिता राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ३१९५.०२ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच जमिनीची किंमत याकरिता एकूण रु. १८२०.५९ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून राज्य शासनाकडून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ८०.३० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(९) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-७ :

मुंबई मेट्रो मार्ग- ७, अंधेरी (पूर्व)-दहिसर (पूर्व) या (लांबी १६.५ कि.मी. स्थानके-१३) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ६२०८ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/स्थानिक करांसाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्जे या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी एडीबी व एनडीबी या आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु.२३२० कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. ७३३.५० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून राज्य शासनाकडून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ पासून कार्यान्वयन सुरु करण्यात आले आहे.

(१०) मुंबई मेट्रो मार्ग ९ व ७अ :

मेट्रो मार्ग ९ (दहिसर ते मिरा-भाईंदर) पूर्णतः उन्नत (लांबी १०.४० कि.मी.) व मेट्रो मार्ग ७अ (अंधेरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) (मेट्रो मार्ग ७ चा विस्तार) (लांबी ३.१७ कि.मी.) या प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य व उर्वरित निधी वित्तिय संस्थेकडून कर्ज सहाय्य या माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ६६०७ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ३३३६.५१ कोटी राज्य शासनामार्फत केंद्रीय कराच्या (५० टक्के) आणि राज्य शासनाच्या कराच्या (१०० टक्के रक्कम व जमिनीचा

खर्च याकरीता रु. १६३१.२४ कोटी इतके बिनव्याजी दुय्यम कर्ज व वित्तीय संस्थेकडून रु. १६३९.२५ कोटीचे कर्ज प्राप्त होणार आहे. सदर प्रकल्पातील मेट्रो मार्ग ९ व मार्ग ७अ प्रकल्पांचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत अनुक्रमे ९८.७० आणि ६२.८० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(११) मुंबई मेट्रो मार्ग - १०:

मुंबई मेट्रो मार्ग- १० गायमुख ते शिवाजी चौक (मिरा रोड) या मार्गिकेची एकूण लांबी ९.२०९ कि.मी.(उन्नत - ८.५२९, भुयारी - ०.६८) असून यामध्ये एकूण ४ उन्नत मेट्रो स्थानके प्रस्तावित आहेत. प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ४४७६ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. या प्रकल्पासाठी बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यात येणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ३५४.७७ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर तसेच जमिनीची किंमत याकरिता एकूण रु. ७७६.७१ कोटी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पासाठी सामान्य सल्लागार नियुक्ती करण्यात आली आहे.

(१२) मुंबई मेट्रो मार्ग-११ :

मुंबई मेट्रो मार्गिका-११ ही मुळतः मुंबई मेट्रो मार्गिका-४ (वडाळा-ठाणे-कासारवाडवली) चा विस्तार म्हणून वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अशी नियोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) मार्फत मुंबई मेट्रो मार्गिका- ११ चा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला होता. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मुंबई मेट्रो मार्गिका-११ (वडाळा-सीएसएमटी) या प्रकल्पास मान्यता दिली होती.

तथापि, मुंबई मेट्रो मार्गिका-११ हा प्रकल्प लवकरात लवकर सार्वजनिक वाहतुकीसाठी उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाकडील इतर अनुभवी अशा संस्थेकडे काही प्रकल्पांच्या उभारणीच्या व अंमलबजावणीचे नियंत्रण देण्याच्या अनुषंगाने राज्यात सद्यस्थितीत मेट्रोसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणातील गुंतवणुकीचा भुयारी मेट्रो मार्ग उभारण्याबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ला अनुभव असल्याने व मुंबई मेट्रो मार्ग-११ च्या मार्गामधील ७० टक्के भाग हा भुयारी मार्गाचा असल्याने मुंबई मेट्रो मार्गिका- ११ हा प्रकल्प मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्यामार्फत उभारण्याबाबत दि. २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्य शासनाची मान्यता देण्यात आली. त्यानुसार, सदर प्रकल्पाच्या मार्गिकेचे पुनर्निरीक्षण करुन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फ़त मार्गिकेचे आणिक डेपो, वडाळा ते गेट वे ऑफ़ इंडीया असे सुधारीत संरेखन करुन सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) कडून तयार करुन घेतला आहे. त्यानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्यामार्फत मुंबई मेट्रो मार्गिका-११ (आणिक डेपो, वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया) या १३ भूमिगत आणि १ भू-समतल स्थानकाचा समावेश असलेल्या एकूण १७.५१ कि.मी. लांबी व १४ स्थानके असलेल्या रु. २३४८७.५१ कोटी किंमतीच्या पूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. द्वारे करण्यास राज्य शासनाद्वारे दि.११/०९/२०२५ रोजी मान्यता प्रदान केली असून प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

(१३) मुंबई मेट्रो मार्ग-१२ :

मेट्रो मार्ग १२ (कल्याण ते तळोजा) याची लांबी २०.७५६ कि.मी. (उन्ना) असून त्यामध्ये १७ स्थानकांचा समावेश केला आहे. या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, केंद्र शासनाचा सहभाग, राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य सिडको, एमआयडीसी यांचा आर्थिक सहभाग राहणार असून उर्वरित निधी आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थेकडून कर्ज सहाय्य या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ५८६५ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ७९८.३८ कोटी (५०% केंद्र शासनाच्या करांकरिताच्या रक्कमेसह), सिडको मार्फत रु. ७०८.१२ कोटी एमआयडीसी कडून रु. २४८ कोटी, राज्य शासनामार्फत बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य रु. २६८ कोटी, केंद्र शासनाचा सहभाग रु. ७६५.५० कोटी व बाह्य वित्तीय संस्थेकडून रु. ३०७७ कोटीचे कर्ज असा आर्थिक सहभाग राहणार आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणीसाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत १८.९५ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(१४) ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प :

ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या ठाणे शहरांतर्गत २९.०० कि.मी. लांबी व २२ स्थानके असलेल्या रु.१३,०९५ कोटी किंमतीच्या वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास राज्य शासनाद्वारे दि.०८ मार्च, २०१९ रोजी मान्यता देण्यात आली आहे. ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे (लांबी २९ कि.मी. व २२ स्थानके) या प्रकल्पाची अंमलबजावणी महामेट्रो या विशेष उद्देश वाहन कंपनीमार्फत करण्यास शासनाने मान्यता दिली होती. केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाने गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाने सदर प्रकल्पाबाबत केलेल्या सूचना विचारात घेऊन प्रकल्पाच्या मूळ मंजूर रु.१३,०९५ कोटी खर्चाच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये आर्थिक खर्चाचे अवलोकन करण्यात आले व रु. १०४१२.६१ कोटी किंमतीचा अद्ययावत सविस्तर प्रकल्प अहवालाचा प्रस्ताव राज्य शासनाकडून दि.११.०८.२०२१ रोजी केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार केंद्र शासनाने दि.०४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्राद्वारे रू.१२२००.१० कोटी प्रकल्प किंमतीच्या वित्तीय आराखड्यासह ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता प्रदान केली आहे. ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पास केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेच्या पार्श्वभूमीवर सदर प्रकल्पाच्या सुधारीत किंमत व सुधारीत वित्तीय आराखड्यास मा.मंत्रिमंडळाने दि.३०/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार दि.०७/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पात राज्य शासनाकडून केंद्र शासनाच्या कराच्या ५०ऽ खर्चासाठी रू. ३५४.११ कोटी आणि राज्य शासनाचे कर व शुल्क यांवरील खर्चासाठी रू. ६१५.६४ कोटी इतकी रक्कम अशी एकूण रू. ९६९.७५ कोटी देण्यात

येणार आहे. तसेच केंद्र शासनाचा सहभाग हा रु. ११५१.१३ कोटी समभाग व रू. ३५४.११ कोटी दुय्यम कर्ज असा राहणार आहे. सदर प्रकल्पासाठी रु. ४५१५.७३ कोटी चे बाह्य कर्ज घेण्यात येणार आहे. राज्य शासनाचे समभाग, ठाणे महानगरपालिकेचे प्रकल्पासाठीचे अनुदान, भूसंपादन, पूनर्वसन व पुनर्वसाहत व बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज याकरिता एकूण रु. ५०७८.०४ कोटी रक्कम ठाणे महानगरपालिकेकडून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ६ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(१५) स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक :

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथील महापौर निवास स्थान परिसरातील जागेवर स्व.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी शासनाने दि. २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी सुधारित मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या सुधारित आराखड्याप्रमाणे स्मारकासाठी प्रत्यक्ष करावयाचे बांधकाम व पुरविण्यात येणारी सोयी-सुविधा यांनुसार कामाचे टप्पा-१ व टप्पा-२ असे वर्गिकरण करण्यात आले आहे. टप्पा-१ मधील कामासाठी रु.२५० कोटी व टप्पा-२ मधील कामासाठी रु. १५० कोटी असे एकूण रु. ४०० कोटी (सर्व करांसहीत) इतक्या रक्कमेचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर प्रकल्पाच्या टप्पा १ मध्ये सर्व इमारतींची बांधकामे करणे प्रस्तावित असून, यामध्ये स्थापत्य, विद्युत, वातानुकुलितयंत्रणा उभारणी, इमारतीच्या अंतर्गत व बाह्य सजावट, वाहनतळ उभारणी, बागबगीचा तयार करणे, रेनवॉटर हार्वेस्टिंग इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाच्या टप्पा २ मध्ये तंत्रज्ञान, लेझर शो, डिजिटल मॅपिंग प्रोजेक्शन, कथा/गोष्टी सांगणे, चित्रपट, व्हर्च्युअल रियालिटी, ऑडिओ व्हिज्युअल आणि तांत्रिक घटक इत्यादी कामे इमारतीचे बांधकामाचे काम पूर्णत्वास येत असताना हाती घ्यावयाचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या उभारणीकरिता एमएमआरडीएने सुरूवातीस खर्च करावयाचा असून अशा खर्चाची प्रतिपुर्ती शासनाच्या नगर विकास विभागामार्फत करण्यात येणार आहे. स्मारक प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ९५ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

नागपूर महानगर प्रदेशातील मेट्रो रेल्वे प्रकल्प

(१) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-१:

ागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत मार्गिका क्र. १ ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) व मार्गिका क्र. २ प्रजापती नगर ते लोकमान्य नगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) अशा दोन मेट्रो मार्गिकांचा समावेश आहे. सदर प्रकल्प पूर्णत्वासाठीचा अपेक्षित खर्च रु. ८६८० कोटी आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) या विशेष हेतू वहन कंपनीकडून राबविण्यात येत आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा गुंतवणूक/समभाग (क्द्वद्वत्द्यन्) व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरूपात राहणार आहे. तसेच या प्रकल्पात नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांचे अनुदान देखील उपलप्रब्ध होणार आहे. सदर प्रकल्पासाठी केएफड्प्रल्यु व एफडी, जर्मनी या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घेण्यात आले आहे. सदरचे बाह्य कर्ज केंद्र शासनामार्फत घेण्यात आले असून थेट महामेट्रोला वितरीत करण्यात येत आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण ३८.२१५ कि.मी. लांबीपैकी दिनांक ०८.०३.२०१९ रोजी १३.७० कि.मी. आणि दिनांक २८.०८.२०२१ रोजी आणखी १.६० कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गिकेचे कार्यान्वयन सुरू केले आहे. प्रकल्पाची उर्वरित ११.९ कि.मी. मार्गिका दि.११ डिसेंबर, २०२३ रोजीपासून वाहतुकीस खुली करण्यात आली आहे.

(१७) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२:

सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) या विशेष हेतू वहन कंपनीकडून राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ६७०८ कोटी इतका आहे. त्यामध्ये राज्य शासनाचा सहभाग हा समभाग रु.९९८.२ कोटी व दुय्यम कर्ज सहाय्य रु. २१२ कोटी असा असून केंद्र शासनाचा सहभाग हा समभाग रु. ९९८.२ कोटी व दुय्यम कर्ज सहाय्य रु.१९७ कोटी असा राहणार आहे. इतर भागधारकांकडून रु. ७१७ कोटी उपलब्ध होणार आहेत. तसेच, एफडी, जर्मनी या बाह्य वित्तीय सहाय्य संस्थेकडून रु.३५८५.६ कोटी कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाची एकूण लांबी ४३.८० कि.मी. इतकी असून त्यामध्ये कॉरिडोर १A-मिहान ते एमआयडीसी ईएसआर, कॉरिडोर २A-ऑटोमेटीव्ह स्केअर ते कन्हान नदी, कॉरिडोर ३A-लोकमान्य नगर ते हिंगणा व कॉरिडोर ४A-प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्ट नगर यांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत २७ टक्के भौतिक प्रगती सध्या झाली आहे.

पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प

(१) पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा १ :

पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्र. १ (पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट) व मार्गिका क्र. २ (वनाझ ते रामवाडी) या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ११४२० कोटी आहे. सदर प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. या केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० संयुनियुक्त सहभाग असलेली विशेष हेतू वाहन कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून समभाग स्वरूपात तसेच केंद्रीय कराच्या ५० टक्के खर्चासाठी केंद्र शासनाकडून दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पात केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा समभाग (इक्विटी) व दुय्यम कर्ज स्वरूपात आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड प्रकल्पाच्या विशेष हेतू कंपनीकडून करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून समभाग स्वरूपात रु. १३१० कोटी व केंद्रीय कराच्या ५० टक्के खर्चासाठी केंद्र शासनाकडून रु. ६४४ कोटी दुय्यम कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य शासनाकडून समभाग स्वरूपात रु. १३१० कोटी व प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. ९४६.२० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहेत. तसेच, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून रु. ५८३१.५ कोटी कर्जरूपाने उपलब्ध होणार आहे. सदरहू प्रकल्पातील वनाज ते रामवाडी ही मार्गिका दि. ६ मार्च, २०२४ व पीसीएमसी ते स्वारगेट ही मार्गिक दि. २९ सप्टेंबर, २०२४ पासून संपूर्णपणे प्रवाशी वाहतुकीसाठी पूर्णपणे खुल्या करण्यात आल्या आहेत.

(२) पिंपरी-चिंचवड (पी.सी.एम.सी.) ते निगडी कॉरीडॉर क्र. १ए :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रस्तावित केल्यानुसार पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्रमांक-१ (पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट) च्या विस्तारीत डपिंपरी-चिंचवड (पी.सी.एम.सी.) ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए " उन्नत मेट्रो मार्गीकेची महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत

अंमलबजावणी करण्याबाबतच्या रु.९४६.७३ कोटी प्रकल्प पुर्णत्व खर्चाच्या सुधारित प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने दि.१७.०२.२०२१ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. सुधारित मान्यतेनुसार माहे मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयास मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यानुसार, केंद्र शासनाने दिनांक २३.१०.२०२३ रोजी सदर प्रकल्पाच्या रू.९१०.१८ कोटी प्रकल्प खर्चासह अंमलबजावणीस मंजूरी प्रदान केली आहे. केंद्र शासनाच्या मान्यतेस अनुसरून राज्य शासनाद्वारे दि.१६ मार्च, २०२४ रोजी सुधारीत मान्यता देण्यात आली आहे.

सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून अनुदान स्वरूपात रु. ६७.०२ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य शासनाकडून अनुदान स्वरूपात रु. ७९.०८ कोटी व प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. ९०.६३ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलप्रध्ध करावयाचे आहेत. तसेच पिंपरी-चिंचवड मनपाकडून अनुदान स्वरूपात रू.१२१.९७ कोटी व भुसंपादन, क्क्स्त्र व पुर्नवसन व पुर्नवसाहतीकरण आणि बांधकाम कालावधीतील व्याज इत्यादी करीता रु. १३७.८८ कोटी अशी एकूण रु. २५९.८५ कोटी रक्कम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेकडून रु. ४०२.११ कोटी कर्जरूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ३५.५१ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(३) स्वारगेट ते कात्रज (कॉरिडॉर क्र. २ए) :

पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत पुणे मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ ची विस्तारीत मार्गिका स्वारगेट ते कात्रज (कॉरिडोर-२ए) या ५.४६४ कि.मी. लांबी, ३ स्थानके असलेल्या रु. ३६६८.०४ कोटी प्रकल्प पूर्णत्व खर्चाच्या पूर्णतः भूयारी मेट्रो रेल्वे प्रकल्पाची महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत अंमलबजावणी करण्यास दि. २०.०४.२०२२ रोजी राज्य शासनाने मान्यता दिली आहे. राज्य शासनाकडून प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने केलेल्या सुचनांस अनुसरून दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. २९५४.५३ कोटी या सुधारीत किंमतीस राज्य शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिनांक ०४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प अंमलबजावणीस मंजूरी प्रदान केली आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ४.४३ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(४) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे प्रकल्प :

हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची सार्वजनिक खाजगी सहभागाने संकल्पना करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, वापरा व हस्तांतरित करा (DBFOT) तत्त्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्याकरिता मा. मंत्रिमंडळाने दिनांक ०२ जानेवारी २०१८ रोजीच्या बैठकीमध्ये तत्त्वतः मान्यता दिली आहे. सदर बैठकीमध्ये मा. मंत्रिमंडळाने या प्रकल्पाची २३.३ कि.मी. छन्न मार्गावर संकल्पना करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, चालवा व हस्तांतरित करा DBFOT तत्त्वावर सार्वजनिक खाजगी सहभागाने (PPP) उभारणी करण्यास मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ८३१३ कोटी इतका आहे. पीएमआरडीए व सवलतकार कंपनी, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल मर्यादित (Consortium of TRIL Urban Transport Pvt. Ltd. And Siemens Project Ventures GmbH, Siemens AG, Germany) यांच्या दरम्यान दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी सवलत करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला आहे. सध्यस्थितीत सदर प्रकल्पाची ८९.८१ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(५) पुणे मेट्रो मार्ग-४ (खडकवासला - स्वारगेट - हडपसर - खराडी) व नळ स्टॉप - वारजे - माणिकबाग (मार्ग-४ ची उपमार्गिका)

पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-२ मधील खडकवासला - स्वारगेट - हडपसर - खराडी (२५.५१८ किमी व २२ स्थानके) (पुणे मेट्रो मार्ग-४) व नळ स्टॉप - वारजे - माणिकप्राग (मार्ग-४ ची स्पर लाईन) (६.११८ किमी व ६ स्थानके) या दोन मार्गिकांचा एकूण ३१.६३६ कि.मी लांप्री, २८ उन्नत स्थानके असलेल्या एकूण रू. ९८९७.१९ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या पूर्णतः उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पांची महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत अंमलप्राजावणी करण्यास विभागाच्या दिनांक १८/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा प्रस्ताव दि.१८/१०/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाकडे वित्तीय व तांत्रिक मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने दि.१६/१२/२०२५ रोजी मान्यता प्रदान केली आहे. सद्यस्थितीत प्रकल्प बांधकामाच्या अनुषंगाने प्राथमिक कामे सुरू आहेत.

(६) पुणे मेट्रो मार्ग-४अ (हडपसर ते लोणी काळभोर) व पुणे मेट्रो मार्ग-४ब (हडपसर ते सासवड रोड) -

पुणे शहराला दक्षिण दिशेकडील बाजूने खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी या रहदारीच्या भागाला मेट्रो रेल्वे मार्गिकेने जोडण्याकरीता मेट्रो मार्गिकेचे काम हाती घेण्यात आले होते. सदर मार्गिकेवरून पुणे शहराच्या विस्तारीत भागात वाढ होत असलेल्या लोणी-काळभोर व सासवड या भागाला जोडण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने दि.०५/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत हडपसर ते लोणी काळभोर (११.१०२ कि.मी.) व हडपसर ते सासवड रोड (५.५६३ कि.मी.) या दोन मार्गिकांचा एकूण १६.६७५ कि.मी लांबी, १४ उन्नत स्थानके असलेल्या एकूण रू. १७०४.४० कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या पूर्णतः उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पाची महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. प्रस्तावित मेट्रो मार्ग हे पुणे-सोलापूर महामार्ग आणि सासवड रोडवरील प्रमुख निवासी क्षेत्रे, औद्योगिक पट्टे आणि नवीन विकसित होणाऱ्या टाऊनशिप्सना जोडून, पुण्याच्या पूर्व आणि दक्षिण-पूर्व भागांना एकमेकांशी जोडण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तावित करण्यात आले आहेत. हे मार्ग वेगाने विकसित होणाऱ्या अशा उपनगरांतून जातात जिथे माहिती तंत्रज्ञान (क्ष्ट्र), वाणिज्य, शिक्षण आणि निवासी क्षेत्रांचा मोठा विस्तार झाला आहे. या मार्गिकांमुळे हडपसर, शेवाळवाडी, मांजरी, लोणी काळभोर, फुरसुंगी, भेकराई नगर, मंतरवाडी, वडकी आणि आसपासच्या वाढत्या भागांना महत्त्वाची दळणवळण सेवा उपलब्ध होईल.

सदर प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आला असून प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्यात येईल.

नागरी जमीन कमाल मर्यादा
Urban Land Ceiling

प्रकरण ६

नागरी जमीन कमाल धारणा

राज्यात नागरी क्षेत्रातील जमीन गृहनिर्माणाकरिता उपलब्ध व्हावी या दृष्टीने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसित करून नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ दिनांक २९ नोव्हेंबर २००७ पासून अंगीकृत केला आहे.

निरसन अधिनियम, १९९९ च्या तरतुदी अन्वये सदर अधिनियम अंमलात येण्यापूर्वी शासन ताब्यात घेण्यात आलेल्या जमिनीचे व्यवस्थापन करण्याची तसेच नाजकधा अधिनियम, १९७६ चे कलम २०(१) अन्वये अतिरिक्त जमिनीस विविध प्रयोजनांसाठी सूट दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरू आहे.

मंत्रालय (नगरविकास विभाग)

Mantralaya (Urban Development Department)

प्रकरण ७

नगरविकास विभाग

नगरविकास विभागामध्ये महानगरपालिका व नगरपालिका, नगररचना, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको इ. महत्त्वाचे विषय असून विभागाचे कामकाज ३६ कार्यासनात विभागले आहे. विभागात १ अपर मुख्य सचिव व १ प्रधान सचिव असून त्यांना त्यांच्या कामात १ सहसचिव, १ संचालक नगररचना तथा सहसचिव, ७ उप सचिव, उप संचालक नगररचना तथा पदसिद्ध उप सचिव-१, ११ अवर सचिव, सहायक संचालक, नगररचना तथा अवर सचिव-२, १ अवर सचिव (विधि), १ लेखा अधिकारी, २४ कक्ष अधिकारी व २ नगररचनाकार सहाय्य करीत असतात. विभागात कार्यासनांच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम सहसचिव/उप सचिव या दर्जाचे पर्यवेक्षीय अधिकारी करतात. या विभागात **राजपत्रित** अधिकारी व **अराजपत्रित** कर्मचारी मिळून २२७ असा कर्मचारीवृंद आहे.

नगरविकास विभागातील कामकाजाची विभागणी अपर मुख्य सचिव (नवि-१), व प्रधान सचिव (नवि-२) यांच्यामध्ये खालीलप्रमाणे करण्यात आली आहे :—

अपर मुख्य सचिव (नवि-१)

(१) नगररचनाविषयक सर्व बाबी.

(२) संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांच्या आस्थापनाविषयक बाबी.

(३) शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या बाबी.

(४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाविषयक बाबी.

(५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पी.एम.आर.डी.ए.)

(६) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(७) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(८) औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(९) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण

(१०) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, नागपूर

(११) मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई

(१२) मुंबई रेल्वे विकास महामंडळ, मुंबई

(१३) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ व निरसन अधिनियम, १९९९ अंतर्गत सर्व बाबी.

(१४) विभागाची आस्थापना.

प्रधान सचिव (नवि-२)

(१) राज्यातील सर्व महानगरपालिकेच्या प्रशासकीय बाबी.

(२) राज्यातील सर्व नगरपरिषदेच्या प्रशासकीय बाबी.

(३) नगरविकास विभागाशी संबंधित अर्थसंकल्पविषयक सर्व बाबी.

(४) महानगरपालिका, नगरपालिका व नगरपालिका संबंधित अधिनियम, अधिनियमातील सुधारणाविषयक बाबी.

(५) विधानमंडळाशी संबंधित सर्व बाबी.

(६) अग्निशामक सल्लागार आस्थापना.

(७) संचालक, नगरपालिका प्रशासन आस्थापना.

(८) केंद्र शासन पुरस्कृत विविध अभियान.

नगरविकास विभाग

अपर मुख्य सचिव (नवि-१)

सह सचिव १

संचालक, नगररचना तथा सहसचिव-१

उप सचिव १

उप संचालक, नगररचना तथा उपसचिव-१

अवर सचिव ६

सहायक संचालक, नगररचना तथा अवरसचिव-२

कक्ष अधिकारी १०

नगररचनाकार-६

प्रधान सचिव (नवि-२)

उप सचिव ०६

अवर सचिव ६

कक्ष अधिकारी २०

(१) नगररचनाविषयक सर्व बाबी

(२) संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, पुणे

(३) शहर व औद्योगिक विकास महामंडळ

(४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पी.एम.आर.डी.ए.)

(६) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(७) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(८) औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(९) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण

(१०) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, नागपूर

(११) मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई

(१२) मुंबई रेल्वे विकास महामंडळ, मुंबई

(१३) सक्षम प्राधिकारी (ULC)

(१४) विभागातील (खुद्द) ची आस्थापना

(१) महानगरपालिका (सर्व)

(२) नगरपालिका/नगरपंचायती (सर्व)

(३) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

(४) नागपूर सुधार प्रन्यास

(५) नगरपालिका प्रशासन संचालनालय

(६) अग्निशमन सल्लागार कार्यालय

अ.क्र. (१)	गट (२)	मंजूर पदे (३)	भरलेली पदे (४)	रिक्त पदे (५)
१	अ	३५	३०	५
२	ब	१०३	९२	११
३	क	७४	४४	३०
४	ड	२४	२४	००
	एकूण...	२३६	१९०	४६

नगर विकास विभागाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारित आकृतीबंध....

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: नविवि-२०२२/प्र.क्र.१४४/नवि-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३ सप्टेंबर, २०२५.

वाचा : १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : इएसटी-२५०१/३३५२/प्र.क्र.४३६/०१/नवि-३ (आस्था), दिनांक १० नोव्हेंबर,२००३.

२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : रासांसं-२०१२/प्र.क्र.२७८/१२/का-१४१७, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१२.

३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :इएसटी-२०१२/पुनर्बांधनी-३/प्र.क्र.२५/नवि-३, दिनांक ०५ नोव्हेंबर,२०१२.

४) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : नविवि-१०१२/प्र.क्र.४१५/नवि-३, दिनांक ०८ फेब्रुवारी,२०१३.

५) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : नविवि-१०१२/प्र.क्र.१५०/नवि-३, दिनांक ०४ जुलै,२०१६.

६) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.१०/का.१२, दिनांक ऑगस्ट,२०१६ (मा.प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६.०८.२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त).

७) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्रमांक –पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दिनांक २९ जून, २०१७.

८) नगर विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक नविवि-१०१२/प्र.क्र.१५०/नवि-३, दिनांक १९ मार्च, २०२०.

९) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि-१०२१/प्र.क्र.२३४/नवि-३, दिनांक ०६ जानेवारी,२०२२.

प्रस्तावना :-

नगर विकास विभाग (खुद्द) मधील २२७ पदांचा आढावा घेऊन उच्चस्तरीय सचिव समितीसमोर दिनांक १३ जुलै,२०२३ रोजी (चौथी बैठक) प्रस्ताव सादर केला होता. या २२७ पदांपैकी २ पदे निरसित/ रद्द करण्यात येऊन ११ पदे नव्याने निर्माण करुन एकूण २०९ नियमित पदे व २७ पदांचे बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे मनुष्यबळ अशा एकूण २३६ पदांच्या सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे. या सुधारित आकृतीबंधास मान्यतेचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नगर विकास विभाग (खुद्द) मधील पदांचा आढावा घेऊन विभागाचा एकूण १९७ पदांचा आकृतीबंध यापूर्वी दिनांक १० नोव्हेंबर, २००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला होता. तद्नंतर आतापर्यंत नगर विकास विभागाच्या आस्थापनेवर काही पदे नव्याने निर्माण/ इतर विभागाकडून हस्तांतरीत करण्यात आल्यामुळे पदांमध्ये वाढ झाली, तर काही पदे निरसित झाल्याने उपलब्ध पदांमध्ये घट झाली आहे. याबाबतचा तपशिल सोबतच्या विवरणपत्र-१ मध्ये दर्शविला आहे.

२. उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिल्यानुसार नगर विकास विभागाच्या (खुद्द) आस्थापनेवरील विविध संवर्गातील २०९ नियमित पदे (११ नवीन पदांसह) व २७ बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा अशा एकूण २३६ पदांच्या सुधारित आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात येत आहे. सुधारित आकृतीबंधातील पदांचा तपशील सोबतच्या विवरणपत्र-२ मध्ये दर्शविला आहे.

३. नगर विकास विभागातील नाईक संवर्गातील १ पद व उप संचालक (सांख्यिकी) (नियोजन विभाग) १ पद अशी एकूण २ पदे निरसित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	पदनाम	वेतन संरचना	निरसित करावयाची पदे
१	उप संचालक (सांख्यिकी)	S-२० : ५६१००-१७७५००	१
२	नाईक	S-३:१६६००-५२४००	१
		एकूण	२

४. नगर विकास विभाग (खुद्द) आस्थापनेवरील नियमित पदांमधील गट-क (वाहनचालक) संवर्गातील ३ व गट-ड (बहुउद्देशीय कर्मचारी) संवर्गातील २४ अशी २७ पदे उच्चस्तरीय सचिव समितीने मृत ठरविली आहेत. सुधारित आकृतीबंधानुसार वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील सद्यस्थितीत रिक्त असलेली पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात यावीत. बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दिनांक २७ एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

मृत संवर्ग ठरविण्यात आलेली पदे त्या संवर्गात कार्यरत असलेले कर्मचारी यांची पदोन्नती/ सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्यु इत्यादी अथवा अन्य कारणाने ही पदे जसजशी रिक्त होतील तशी आपोआप रद्द होतील. त्यानंतर त्या संवर्गात नविन पदभरती करता येणार नाही. तथापि सदर मृत होणाऱ्या संवर्गातील सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची वेतनाची गैरसोय होऊ नये याकरीता अशा पदांचा स्वतंत्र तक्ता दर्शविण्यात आला आहे.

नगर विकास विभाग-बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे मनुष्यबळ		
अ.क्र.	पदनाम	बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे मनुष्यबळ
१	वाहनचालक (बहुउद्देशीय)	०३
२	गट-ड कर्मचारी (बहुउद्देशीय)	२४
एकूण		२७

५. हा शासन निर्णय, उप समितीच्या दिनांक ७ जुन, २०२३ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीत तसेच उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३ जुलै, २०२३ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीत दिलेल्या मान्यतेने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४१३/आ.पु.क., दिनांक २८.०८.२०२५ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०९२३१७३६२०३५२५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUBRAO NARAYAN SHINDE

Digitally signed by SUBRAO NARAYAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ffa7b5a2ffa0df3601940627933c9a00dca1eb8ab54859ea07920c3d0d1f5c2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E5E596620E31A274D92F7A1ACEF953E31301C1B0FB615CACCE61280DD257, cn=SUBRAO NARAYAN SHINDE
Date: 2025.09.23 17:37:06 +05'30'

(सु.ना.शिंदे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, नगर विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
८. अपर मुख्य सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (वि. सु.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरीक्षा), मुंबई.
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१६. वित्त विभाग (कार्या.आ.पु.क./व्यय-३/ व्यय-८/सेवा-९), मंत्रालय, मुंबई.
१७. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व) नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१८. आहरण व संवितरण अधिकारी, (रोखशाखा), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. निवडनस्ती/नवि-३, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्रमांक :नविवि-२०२२/प्र.क्र.१४४/नवि-३, दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ सोबतचे
(शासन निर्णय दिनांक १०.११.२००३ अन्वये मंजूर पदे)
विवरणपत्र-१

अ.क्र.	पदनाम	७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रुपये)	शासन निर्णय दिनांक १०.११.२००३ अन्वये मंजूर पदे	आकृतीबंधानंतर विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेली पदे	आकृतीबंधानंतर निरसित करण्यात आलेली पदे/ व्यपगत झालेली पदे	एकूण मंजूर पदे
१	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव	संवर्ग पद	१	०	०	१
२	प्रधान सचिव	संवर्ग पद	१	०	०	१
३	सह सचिव	S-२७: १२३१००-२१५९००	१	०	०	१
४	संचालक, नगर रचना तथा सह सचिव	S-२९:१३११००-२१६६००	०	१	०	१
५	उप सचिव	S-२५:७८८००-२०९२००	७	०	०	७
६	उप संचालक, नगर रचना तथा उप सचिव	S-२५:७८८००-२०९२००	०	१	०	१
७	उप संचालक (सांख्यिकी)	S-२०:५६१००-१७७५००	०	१	०	१
८	अवर सचिव	S-२३:६७७००-२०८७००	११	०	०	११
९	सहायक संचालक, नगर रचना तथा अवर सचिव	S-२३:६७७००-२०८७००	०	२	०	२
१०	अवर सचिव (विधी)	S-२३:६७७००-२०८७००	०	१	०	१
११	कक्ष अधिकारी	S-१७:४७६००-१५११००	२४	०	०	२४
		S-२०:५६१००-१७७५०० (४ वर्षानंतर अकार्यात्मक वेतनस्तर)				
१२	नगर रचनाकार	S-२०:५६१००-१७७५००	२	०	०	२
१३	सहायक नगर रचनाकार (गट-ब)	S-१६:४४९००-१४२४००	२	२	०	४
१४	लेखाधिकारी	S-१६:४४९००-१४२४००	१	०	०	१
१५	सहा.लेखाधिकारी	S-१५:४१८००-१३२३००	१	०	०	१
१६	सहायक कक्ष अधिकारी	S-१६:४४९००-१४२४००	३५	१५	०	५०
१७	सहायक कक्ष अधिकारी (विधी)	S-१५:४१८००-१३२३००	०	१	०	१
१८	वरिष्ठ स्वीय सहायक	S-२४:७११००-२११९००	२	०	०	२
१९	लघुलेखक (निवडश्रेणी)	S-१७:४७६००-१५११००	१	१	०	२
२०	लघुलेखक (उच्चश्रेणी)	S-१६:४४९००-१४२४००	६	०	१	५
२१	लघुलेखक (निम्नश्रेणी)	S-१५:४१८००-१३२३००	८	१	०	९
२२	लघु टंकलेखक	S-८:२५५०० ८११००	२	१	०	३
२३	लिपिक-टंकलेखक	S-६:१९९००-६३२००	५९	९	०	६८
२४	वाहन चालक	S-६:१९९००-६३२००	४	०	१	३
२५	हवालदार	S-३:१६६००-५२४००	१	०	०	१
२६	नाईक	S-३:१६६००-५२४००	३	०	०	३
२७	चक्रमुद्रक	S-३:१६६००-५२४००	२	०	०	२
२८	झेरॉक्स मशिन चालक	S-३:१६६००-५२४००	२	०	०	२
२९	शिपाई	S-१:१५०००-४७६००	२१	२	६	१७
एकूण			**१९७**	**३८**	**८**	**२२७**

SUBRAO NARAYAN SHINDE

Digitally signed by SUBRAO NARAYAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ffa7a5a27fecd7569194e6272933cfa60dca1eb8ab54859ee7939b4bfd11f67, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E5885862DCE131A2/4D92F7A1ACEF953E013013C180FB615DC6CCE4812BDED257, cn=SUBRAO NARAYAN SHINDE
Date: 2025.09.23 17:37:31 +05'30'

शासन निर्णय क्रमांक : नविवि-२०२२/प्र.क्र.१४४/नवि-३, दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ सोबतचे

(सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे)

विवरणपत्र-२

अ.क्र.	पदनाम	७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रुपये)	आकृतीबंधानुसार मंजूर पदे	सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे		
				सुधारित आकृतीबंधात वाढ करण्यात आलेली पदे	निरसित पदे	एकूण मंजूर पदे
१	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव	संवर्ग पद	१	०	०	१
२	प्रधान सचिव	संवर्ग पद	१	०	०	१
३	सह सचिव	S-२७: १२३१००-२१५९००	१	०	०	१
४	संचालक, नगर रचना तथा सह सचिव	S-२९:१३११००-२१६६००	१	०	०	१
५	उप सचिव	S-२५:७८८००-२०९२००	७	०	०	७
६	उप संचालक, नगर रचना तथा उप सचिव	S-२५:७८८००-२०९२००	१	०	०	१
७	उप संचालक (सांख्यिकी)	S-२०:५६१००-१७७५००	१	०	१	०
८	**अवर सचिव**	S-२३:६७७००-२०८७००	११	१	०	१२
९	सहायक संचालक, नगर रचना तथा अवर सचिव	S-२३:६७७००-२०८७००	२	०	०	२
१०	अवर सचिव (विधी)	S-२३:६७७००-२०८७००	१	०	०	१
११	**कक्ष अधिकारी**	S-१७:४७६००-१५११००	२४	६	०	२०
		S-२०:५६१००-१७७५०० (४ वर्षानंतर अकार्यामत्मक वेतनस्तर)				
१२	**नगर रचनाकार**	S-२०:५६१००-१७७५००	२	४	०	६
१३	सहायक नगर रचनाकार (गट-ब)	S-१६:४४९००-१४२४००	४	०	०	४
१४	लेखाधिकारी	S-१६:४४९००-१४२४००	१	०	०	१
१५	सहा.लेखाधिकारी	S-१५:४१८००-१३२३००	१	०	०	१
१६	सहायक कक्ष अधिकारी	S-१६:४४९००-१४२४००	५०	०	०	५०
१७	सहायक कक्ष अधिकारी (विधी)	S-१५:४१८००-१३२३००	१	०	०	१
१८	वरिष्ठ स्वीय सहायक	S-२४:७११००-२११९००	२	०	०	२
१९	लघुलेखक (निवडश्रेणी)	S-१७:४७६००-१५११००	२	०	०	२
२०	लघुलेखक (उच्चश्रेणी)	S-१६:४४९००-१४२४००	५	०	०	५
२१	लघुलेखक (निम्नश्रेणी)	S-१५:४१८००-१३२३००	९	०	०	९
२२	लघु टंकलेखक	S-८:२५५००-८११००	३	०	०	३
२३	लिपिक-टंकलेखक	S-६:१९९००-६३२००	६८	०	०	६८
२४	वाहन चालक *	S-६:१९९००-६३२००	३	०	०	(०)मृत संवर्ग
२५	हवालदार *	S-३:१६६००-५२४००	१	०	०	(०)मृत संवर्ग
२६	नाईक *	S-३:१६६००-५२४००	३	०	१	(०)मृत संवर्ग
२७	चक्रमुद्रक *	S-३:१६६००-५२४००	२	०	०	(०)मृत संवर्ग
२८	झेरॉक्स मशिन चालक *	S-३:१६६००-५२४००	२	०	०	(०)मृत संवर्ग
२९	शिपाई *	S-१:१५०००-४७६००	१७	०	०	(०)मृत संवर्ग
	एकूण		**२२७**	**११**	**२**	**२०९**

बाहययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा

३०	वाहनचालक (बहुउद्देशीय			०	०	३
३१	गट-ड (बहुउद्देशीय)			०	०	२४
	एकूण					२७
	एकूण					**२३६**

*मृत संवर्गातील पदे से.नि./पदोन्नती/निधन इ. कारणारे रिक्त झाल्यावर नियमितपणे भरण्यात येणार नाहीत.

SUBRAO NARAYAN SHINDE

Digitally signed by SUBRAO NARAYAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=1fa1b5a27fae01b60194e6272933cfa60dca1eb8a0b54859e8e7920c5d0d1f622, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9B9586710CF131A274D92F7A1ACEF953C01301C130FB61BD6CCC48120ED257, cn=SUBRAO NARAYAN SHINDE
Date: 2025.09.23 17:37:42 +05'30'

नगरविकास विभाग
कार्यक्रम खर्च २०२६-२७ मागणी

अ.क्र.	योजनेचे नाव	२०२६-२०२७ (रु.कोटीत)
(१)	(२)	(३)
१	अमृत अभियान	२१६९
२	स्वच्छ भारत अभियान	१२५०
३.	पीएम ई बस सेवा	३७९.७५
४	स्मार्ट सिटी अभियान	०.००४८
५	भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ अंतर्गत कार्यरत महिलांसाठी वसतीगृह बांधणे (योजना भाग-१०)	०.०००१
६	नागरी पायाभूत विकास निधी अंतर्गत राष्ट्रीय आवास बैंकेकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज	२००
७	सिंहस्थ कुंभमेळयाचे नियोजन व अमलबजावणी यावरील खर्चाकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम)	४००
८	तेजस्विनी महिला बस सेवा चालविण्यासाठी महानगरपालिकांना अनुदाने	०.०००१
९	राज्यातील नगरपरिषदांना अग्निशमन व अणिबाणीच्या सेवाचे बळकटीकरणासाठी सहाय्य	७०
१०	राज्यातील महानगपालिकांना अग्निशमन व अणिबाणीच्या सेवांचे बळकटीकरणासाठी सहाय्य	१०
११	नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान	७००
१२	महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत सुखसोयीच्या विकासासाठी विशेष तरतूद	१५४०
१३	हद्दवाढ झालेल्या महानगरपालिकांना नव्याने समाविष्ट क्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य	३०
१४	नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांसाठी नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य	५
१५	महानगरपालिका क्षेत्रातील यात्रास्थळासाठी विशेष तरतूद	५
१६	नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान	५
१७	पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील गिरीस्थान नगरपरिषदांना विशेष पर्यटन विकास अनुदान	१२
१८	नव्याने स्थापन केलेल्या नगरपालिका/नगरपरिषदांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय	२५
१९	नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतीना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य	२५
२०	पैठण आपेगाव शहर विकास प्राधिकरणाला सहाय्य	०.०००१
२१	तुळजापूर शहर विकास प्राधिकरणाला सहाय्य	०,०००१
२२	श्रीक्षेत्र महालक्ष्मी (करवीर निवासिनी, अंबाबाई) मंदिर कोल्हापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा	५
२३	श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी जि नागपूर या तीर्थस्थळ विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी नागपूर सुधार प्रन्यासला सहाय्य	२०
२७	नगरविकास विभागाच्या प्रशासकीय कामकाजासाठी पायाभूत सोयी सुविधा	५
२८	पंढरपूर शहर विकास प्राधिकरणाला सहाय्य	०.०००१
२९	नागपूर हे उप राजधानीचे शहर असल्यामुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष अनुदान	०.०००१
३०	रामटेक तीर्थक्षेत्र विकास आराखडा कार्यक्रमाअंतर्गत तीर्थक्षेत्र विकास	०.०००१
३१.	स्मारकांच्या बांधकामासाठी महागनरपालिकांना सहायक अनुदाने	२०
३२	स्मारकांच्या बांधकामासाठी नगरपरिषदांना सहायक अनुदान	०.०००१
३३	स्मारकांच्या बांधकामासाठी नगरपंचायतींना सहायक अनुदान	०.०००१
३४	शासकीय कर्मचाऱ्याऱ्यांना प्रशिक्षण	०.९९७
३५	महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत राज्यातील नगरपरिषदांना अनुदान	२८००
३६	महाराष्ट्र नगरोत्थान महाभियांनातर्गत महानगरपालिकांसाठी अनुदान	४००
३७	स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कंपोस्ट खत निर्मितीला चालना देण्यासाठी प्रोत्साहन अनुदान	२०
३८	कारंजा लाड येथील गुरु मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विकास कामासाठी सहायक अनुदान	२
४०	मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी अतिरिक्त केंद्रीय सहाय	१८
४१	मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प २ अ, २५ व ७ करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला एमएमआरडीए एशियन डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज	५००
४२	मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प २ अ, २६ व ७ करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला एमएमआरडीए न्यू डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज	१००

अ.क्र.	योजनेचे नाव	२०२६-२०२७ (रु.कोटीत)
(१)	(२)	(३)
४३	मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प ४ प्रकल्पांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला इंटीग्रेटड ग्रीन अर्बन माबिलिटी करित केएफडब्ल्युचे कर्ज आरआयएल	२५
४४	मुंबई मेट्रो रेल्वे ४ व ४अ प्रकल्पांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला इंटीग्रेटेड ग्रीन अर्बन मोबिलिटी करिता केएफब्ल्युचे कर्ज ओडीए प्लस	२५
४५	मुंबई प्रादेशिक नागरी पायाभूत सुविधा सुधार कार्यक्रमासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) केएफडब्ल्यु बँकेचे अनुदान	०.०००९
४६	मुंबई प्रादेशिक नागरी पायाभूत सुविधा सुधार कार्यक्रमासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) केएफडब्ल्यु बँकेचे कर्ज	१
४७	मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका १० प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	०.०००१
४८	मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका १२ प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	२०
४९	मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पा ५ करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) एशियन इन्फास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बैंक आणि ओपेक फंड फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (ओएफआयडी) चे कर्ज	१
५०	मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प ६ करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) न्यु डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज,	१
५१	मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका ३ प्रकल्पाकरिता राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	२७१.२३५५
५२	मुंबई मेट्रो रेल्वे ४ व ४अ प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	२००
५३	मुंबई मेट्रो रेल्वे २व प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	१४७
५४	मुंबई मेट्रो रेल्वे २अ प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	७५
५५	मुंबई मेट्रो रेल्वे ७ प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	७५
५६	मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका ९ व ७अ प्रकल्पाकरिता एमएमआरडीएला दुय्यम कर्ज (कार्यक्रम)	६०
५७	मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका ५ प्रकल्पाकरिता एमएमआरडीएला दुय्यम कर्ज	६५
५८	मुंबई मेट्रो रेल्वे मार्गिका ५ प्रकल्पाकरिता एमएमआरडीएला दुय्यम कर्ज	१००
५९	नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता राज्य शासनाचे दुष्यम कर्ज	०.०००१
६०	पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	२००
६१	मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ३ ए प्रकल्पासाठी मुंबई रेल्वे विकास महामंडळास राज्या शासनाचे अर्थसहाय्य	४७१
६२	मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पातील राज्यशासनाचे समभाग	०.०००१
६४	पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पातील राज्यशासनाचे समभाग	३००
६५	मेट्रो रेल्वे प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी संस्थांना सहायक अनुदान	०.०००१
६६	नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पात राज्य शासनाचा समभाग	१५०
६७	ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता महा मेट्रोला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	६०
६८	ठाणे ते बोरीतली दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम या प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला एमएमआरडीए राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	७५
६९	मुंबई शहरातील पूर्व मुक्तमार्गाजवळील ऑरेज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यान वाहतुकीसाठी भुयारी मार्गाचे बांधकाम करणे या प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	७५
७०	केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज भाग-१	०.०००१
७१	भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत औद्योगिक वाढीसाठी चालना या योजनेतर्गत प्रोत्साहन रक्कम (योजना भाग-५)	०.०००१
७२	नागरी सुधारणा (योजना भाग-६)	१०००
७३	भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या विविध योजना/कार्यक्रमांतर्गत प्रमुख शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्याचा हिस्सा (योजना भाग-९)	१५००
७४	नगरविकास विभाग ई गव्हर्नस प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद	१०
७५	अभियांत्रिकी पदवीधरांना नगररचना या विषयातील प्रशिक्षण	१२
७६	बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सहाय्यक अनुदान	४५
	एकूण	**१७६८२**